१९३३
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १८३१

जीवन आर्य समाज

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
संग्रहालय/वाचनालय शाखा.
अनुक्रम नं. | विभाग निबंध | क्रमांक ९०९
पुस्तकाचें नांव जीवन आर्य समाज.
लेखक काळेलकर काका.
सूचना—पुस्तक आठ दिवसांवर ठेवूं नका. पुस्तकाची खराबी करूं नका.

REFBK-0006370

—आचार्य काका कालेलकर

निबंध ३८१

दा. मु.
~~६२१०~~
६३७०

...राज्य ग्रंथ संग्रहालय
...मुख्य...
...2639... निबंध
...१६४५०

कॉन्टिनेन्टल प्रकाशन १६

जीवन आणि समाज

लेखक
आचार्य काका कालेलकर

अनुवादक : श्रीपाद जोशी

REFBK-0006370

ऑक्टोबर १९४३

प्रकाशक :
अ. अं. कुलकर्णी
कॉन्टिनेन्टल प्रकाशन
१९६/१९ सदाशिव, पुर्णे २

मुद्रक :
स. रा. सरदेसाई, बी.ए.,एल्एल्.बी.,
नवीन समर्थ विद्यालयाचा
'समर्थ भारत' छापखाना,
४१ बुधवार, पुर्णे २



माझ्या प्रेमळ मातेस

परिचय

'जीवन आणि समाज' हा पू. काकासाहेब कालेलकर यांच्या जीवन संस्कृति नामक गुजराती लेखसंग्रहांतील कांहीं लेखांचा अनुवाद आहे. पू. काकासाहेबांचें लिखाण हें जीवन जगतां जगतां आणि अन्यायाशीं व संकटांशीं झगडत असतां लिहिलेलें असल्यामुळें तें सदैव ताजें व उपयोगी असतें; हेंच त्याचें वैशिष्ट्य होय.

सदर अनुवाद कृष्णमंदिरांत बसून केला गेला आहे. यामुळें यांत बऱ्याच उणीवा राहून गेल्या असण्याचा संभव आहे. माझी भाषा माझ्यासारखीच अपरिपक्व व लेचीपेची आहे याची मला जाणीव आहे. पण या भाषांतरांत भाषेपेक्षां त्यांतील विचारांनाच जास्त महत्त्व असल्यामुळें लेखकाच्या मनोगताला कोणत्याहि प्रकारें अन्याय होऊं नये याचीच विशेष खबरदारी घेतली गेली आहे.

इतर भारतीय भाषांतून मराठींत येणाऱ्या ग्रंथांची संख्या माझ्या कल्पनेप्रमाणें फारच थोडी आहे. यामुळें भाषांतराचे योग्यायोग्य नमुने तपासून भाषांतराची कला विकसित करण्याची संधि माझ्यासारख्या नवख्या अनुवादकाला मिळत नाहीं ही खरोखरीच दुर्दैवाची गोष्ट आहे. आपल्या साहित्यांतील ही उणीव प्रथितयश साहित्यिकांनीं दूर करावयाचा प्रयत्न करावयास नको काय ?

पुस्तकाची मुद्रणप्रत तयार करण्याचे कामीं साहाय्य केल्याबद्दल माझे मित्र श्री. शान्तिलाल शहा यांचे आभार मानण्यास मला खूप आनन्द वाटतो. असल्या या महागाईच्या काळांत पुस्तक-प्रकाशनाचें धैर्य दाखविल्याबद्दल प्रकाशकांचे आभार मानावयाचे कीं अभिनंदन करावयाचें हें वाचकांनींच ठरवावयाचें आहे.

माझे मित्र श्री. रघुनाथ जोशी यांच्या अमूल्य मदतीशिवाय हें पुस्तक प्रकाशित झालेंच नसतें हें येथें मुद्दाम नमूद करावेंसें वाटतें.

कृष्णमंदिर, यरवडा,
गणेश चतुर्थी, १८६५

श्रीपाद जोशी

जीवन आणि समाज

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना
अनुक्रम ..... दि: निबंध
क्रमांक ..... ९८३९ ..... दि: २६।६।६०

—आचार्य काका कालेलकर

कॉन्टिनेन्टल प्रकाशन

जीवन आणि समाज

आपली समाजव्यवस्था

संयमामध्यें संस्कृति

पंचमहापातक

निश्चिंतता आणि ऐषाराम

पुनर्घटना

मत्सर

सुधारणेची खरी दिशा

अशांतीची भीति ?

समाज-जीवनाचा पाया

सुधारणांचें मूळ

जीवन-चक्र

आचार्य काका कालेलकर



आपली समाजव्यवस्था : : : १

प्रास्ताविक :

हिंदु सामाजिक जीवनाचा खूप खोल अभ्यास झाला पाहिजे. सत्य, अहिंसा इत्यादि यमांचें आणि शौच, स्वाध्याय, संतोष इत्यादि नियमांचें ज्यांनीं थोडेंबहुत पालन केलें होतें, जे तप आणि योग यांनीं संपन्न होते अशा लोकांनीं आपली समाजरचना सुचविलेली आहे; व अनेक ठिकाणीं तिच्या बाबतींत आपल्या लोकांनीं अनेक प्रयोग केले आहेत. आजच्या आपल्या समाजशास्त्रज्ञांनीं त्या जुन्या प्रयोगांचीं वर्णनें गोळा करून त्यांचा अभ्यास करावयास हवा. आजचे प्रश्न जुन्या काळच्या समाजधुरीणांनीं कशा प्रकारें सोडविले होते, त्यांचा परिणाम काय झाला, त्यांपैकीं काय काय राखण्यालायक आहे, काय काय बदलण्याजोगें आहे, अशा तऱ्हेचे फेरफार आपल्या पूर्वजांनीं कोणत्या पद्धतीनें केले आणि

त्यामागें कोणती दृष्टि होती, हें सर्व आपण आजच्या दृष्टीनें पाहिलें पाहिजे. आपले पूर्वज शहाणे होते, सर्वज्ञ होते म्हणून आपण शहाणपण वापरण्याची जरूर नाहीं, आपण अल्पज्ञ किंवा अज्ञ राहिलों तरी तें परवडण्यासारखें आहे, असें मानून आपण आपल्या पूर्वजांचा आणि समाजप्रभु ईश्वराचा अपमान करतां कामा नये. घोड्याचे वंशज जसे घोडेच असणार, खेचरें किंवा गाढवें असणार नाहींत, त्याप्रमाणें आपण ऋषिमुनींच्या वंशजांनीं देखील त्यांच्याइतकीच संस्कारिता, जबाबदारी आणि हिम्मत बाळगिली पाहिजे.

आपण आपल्या ऋषिमुनींना त्रिकालदर्शी किंवा त्रिकालज्ञ असें म्हणतों. त्रिकालज्ञ म्हणजे 'भूतकालांतील अनंत वर्षांत प्रत्येक ठिकाणीं काय काय घडलें, भविष्यामध्यें प्रत्येक मनुष्य कसा वागणार आहे, आणि काय काय होणार आहे, तसेंच आज साऱ्या विश्वांत व प्रत्येक हृदयांत काय काय चाललें आहे हें जाणण्याची शक्ति', असा अर्थ आपण करूं नये. असाच अर्थ करणाऱ्या लोकांना इस्लामच्या पैगंबरानें सांगितलें होतें कीं, 'यानंतर काय होणार आहे याचें ज्ञान अल्लानें आपल्या नबीला (प्रेषिताला) किंवा दूतालाहि दिलेलें नाहीं. तें फक्त ईश्वरालाच माहीत असतें'. गीतेमध्यें भगवानांनीं देखील अर्जुनाच्या मिषानें मनुष्यमात्राला सांगितलें आहे कीं, 'पूर्वजन्मांची व भावी जन्मांची माहिती फक्त भगवानांनाच असते.माणूस त्या बाबतींत अंधारांत असतो.'

तर मग त्रिकालज्ञ याचा अर्थ काय? .याचा अर्थ एवढाच कीं, ज्याप्रमाणें विज्ञानशास्त्रज्ञ प्रकृतीचे नियम जाणून हें विश्वचक्र कसें चालतें हें समजून घेतात आणि शास्त्राच्या जोरावर घटनांचें स्वरूप ओळखतात, त्याचप्रमाणें निर्मळ हृदयाचे आणि दीर्घदर्शी शास्त्रज्ञ व्यापक समाजशास्त्र जाणत असल्यामुळें भूतकाळची परिस्थिति जाणून घेऊन, वर्तमान-काळच्या शक्ति ओळखून, अजमावून, भविष्यकाळ कसें वळण घेईल यांची अटकळ बांधूं शकतात. आणि जो मनुष्य सत्य, अहिंसा, शौच,

संतोष इत्यादि गुण अंगीं बाणवून निःस्पृह व तटस्थ बनला आहे तो सर्वांच्या हिताचा विचार करून जुनें सांभाळलें जाईल, आजचें साधेल व भविष्यांतील कल्याणमार्गानें विकसित होईल अशा तऱ्हेची व्यवस्था घाटून देतो. ज्याप्रमाणें राष्ट्रपुरुष हा देशाची नौक हांकारतो त्याचप्रमाणें समाजशास्त्रज्ञ धर्मकार तिन्ही पिढ्यांचा विचार करून समाजाला कर्तव्याची दिशा दाखवितो.

अशा धर्मकारांचीं त्या त्या वेळचीं वचनें हेंच शास्त्र होय. जें शासन करतें तें शास्त्र ! जो कायदा आज चालतो त्याच कायद्याचा अधिकार चालत असतो. जुने झालेले कायदे अभ्यासासाठीं उपयोगी असतात. जुना अनुभव नेहमीं किंमती असतो. आज जर आपण चूक करीत असलों तर जुने कायदे वडीलधाऱ्या माणसाप्रमाणें आपल्याला शिकवण देतात. पण निर्णय करण्याची सत्ता त्यांची नव्हे. रोमन लॉ, जर्मन लॉ, डच लॉ, इत्यादि अनेक कायद्यांचा आपण ज्ञानासाठीं, शिक्षणासाठीं जो अभ्यास करतों तो त्यांच्यापासून शहाणपण शिकण्यासाठीं करीत असतों; त्यांचीं वचनें प्रमाण मानण्यासाठीं नव्हे !

शास्त्रांचेंहि असेंच आहे. कित्येक धर्मसूत्रें होऊन गेलीं. कित्येक स्मृति झाल्या. हे सगळे ग्रंथ आपल्या दृष्टीनें आदरणीय आहेत. आपल्या समाजाचें अनुभवरूपी भांडवल त्यांत सामावलेलें आहे. पण आजचे धर्मनिष्ठ समाजपुरुषच समाजाचें नियमन करूं शकतील. तो अधिकार जुन्या ग्रंथांना नाहीं. आपल्या धर्मधुरीणांना सल्ला देण्याचें काम त्यांनीं खुशाल करावें, पण ते आमचे शासक होऊं शकणार नाहींत. सारांश, या धर्मग्रंथांचें काम शिक्षणशास्त्रज्ञाचें आहे, शासनकर्त्याचें नव्हे.

आतां आपण एकदां हें स्पष्ट समजून घेतलें पाहिजे कीं, प्राचीन काळापासून धर्मतंत्रानें राज्यतंत्राचें अनुकरण करून धर्माचें सारें वातावरण कलुषित करून टाकिलें आहे. पोप, खलीफा किंवा शंकराचार्य जेव्हां गादी बनवून बसतात आणि लोकांच्या बाह्य जीवनावर हुकमत

चालवितात तेव्हां खरा धर्म अपमानितच होतो. संतांनीं हा मार्ग पसंत केला नाहीं. त्यांनीं बाह्यतंत्राविषयीं उपेक्षाभाव बाळगून केवळ हृदय-तंत्रावरच परिणाम करणें पसंत केलें.

धर्माची प्रेरणा हृदयस्थ भगवानच देत असतो. साऱ्या विश्वाचें हित पाहणारे निःस्पृह, तटस्थ, निःपक्षपाती पुण्यपुरुषच ही प्रेरणा झेलूं शकतात. पण मनुष्य हा अखेर मनुष्यच आहे. आकाशांतील शुद्ध पाणी जमिनीवर पडतांच ज्याप्रमाणें त्यामध्यें जमिनीचा गुण प्रवेश करतो त्याप्रमाणें मनुष्यहृदयानें ईश्वरी प्रेरणा झेलली रे झेलली कीं लागलीच तिच्यांत मनुष्याची अपूर्णता घुसते. कोणताहि धर्म या गोष्टीस अपवाद नाहीं. तर मग हिन्दुधर्मच कसा अपवाद असूं शकणार ?

आपल्या धर्मांत असें स्पष्ट सांगितलें आहे कीं, धर्मशास्त्र हें महर्षींच्या अन्तःकरणांत संभृत होत असतें. महर्षी हे आपल्या काळचे सर्वोत्तम पुरुष असतात. पण म्हणून कांहीं ते काळाच्या अपूर्णतेहून पूर्णपणें पार असूं शकत नाहींत. महाभारतकालीन सर्व धर्मज्ञान ब्रह्मचारी नि धर्मनिष्ठ भीष्माचार्यांमध्यें सामावलेलें होतें तरी देखील ते कौरव व पांडव यांच्यामध्यें तटस्थपणें न्याय देऊं शकले नाहींत. द्रौपदीवस्त्र-हरणाच्या वेळीं भेदरलेल्या द्रौपदीनें जेव्हां त्यांच्याकडे धर्माची मदत मागितली तेव्हां आपलें धर्मतेज प्रगट करून ते द्रौपदीच्या मदतीस जाऊं शकले नाहींत. अशा तऱ्हेच्या मोठमोठ्या राजकीय गोष्टी सोडून देऊं. पण माणसानें मांसाहाराचा त्याग करावा किंवा नाहीं, यासारख्या भूतदयेच्या साध्या प्रश्नाचें उत्तर देखील महाभारताचे भीष्माचार्य स्वच्छपणें देऊं शकले नाहींत.

हिन्दुधर्माचे मूळ सिद्धांत अत्यंत न्यायशुद्ध आणि सर्वहितकारी आहेत. पण ते आचरणांत आणते वेळीं त्या त्या काळाची अपूर्णता त्यांत आली आहे आणि हिंदुधर्मी ऋषिमुनींना व साधुसंतांना त्यांमधून कसाबसा मार्ग काढावा लागला आहे. अमेरिकेचे राष्ट्रपति अब्राहम

लिंकन जेव्हां गुलामीच्या प्रथेविरुद्ध अमेरिकेंतील दाक्षिणी संस्थानांबरोबर लढले तेव्हां देखील त्यांची भूमिका दास्य-विमोचनाची नसून अमेरिकेची राज्यघटना टिकविण्याची होती. मी मी म्हणणारे वीर देखील समाजाच्या जुन्या चौकटी संभाळूनच सुधारणा करण्याची खटपट करीत असतात. आज देखील गांधीजी अस्पृश्यतेशीं लढते वेळीं 'आज आपल्या हृदयांत जो धर्म स्फुरतो त्याप्रमाणें चालावयाचें आहे—' असें थोडक्यांत सांगून मोकळे होण्याऐवजीं 'माझा शास्त्रांवर विश्वास आहे, आज समाजांत चालू असलेल्या अस्पृश्यतेचा बचाव त्या शास्त्रांनीं केलेला नाहीं' वगैरे मुद्दे मांडून शास्त्रार्थांत उतरतात आणि जुन्या शास्त्रांचा समाजावरून निघून गेलेला अधिकार पुन्हां प्रस्थापित करण्यास कारणीभूत होतात.

हिंदुधर्माचा असा स्पष्ट सिद्धांत आहे कीं, दुनियेमध्यें सर्वत्र समानताच असली पाहिजे. उच्चनीच भाव हें पापाचें कारण आहे. उपनिषदांत अगदीं येथपर्यंत सांगितलें आहे कीं, सगळें विश्व हें एक इवलेंसें घरटें आहे. आपण सर्व परम अमृत-तत्त्वाचे पुत्र आहोंत. 'विद्याविनयसंपन्न ब्राह्मण, गाय, हत्ती, कुत्रें आणि कुत्रें खाणारा चांडाळ वगैरे सर्वांच्याविषयीं मनुष्यानें समान भाव राखावयाचा असतो. परब्रह्म हें जसें निर्दोष आहे तसें तें समहि आहे. ज्याच्यांत समबुद्धि असेल तोच तरून जाईल. ऋषि आणि व्याध हे स्वधर्माचें पालन करीत असतां समान कोटीचे आहेत,' इत्यादि अनेक वचनांमध्यें धर्मसिद्धांत प्रगट झाला आहे. पण वेगवेगळ्या जातींना चार वर्णांत घेत असतां मनुष्य आपल्या जातीचा व कुळाचा अभिमान सोडूं शकला नाहीं. याचा परिणाम असा झाला कीं, ज्या धर्माच्या पायामध्यें समानतेचा सिद्धांत दृढपणें बसलेला आहे त्याच धर्माच्या आश्रमव्यवस्थेंत उच्चनीच भाव खोलवर घुसून बसला. नंतरच्या कांहीं धर्मकारांनीं आपापल्या शक्तीप्रमाणें उच्चनीच भावनेची कटुता कमी करण्याचा थोडाबहुत

प्रयत्न केला. साधुसंतांनीं तर आपल्या सात्त्विक वाणीनें अभिमान व उच्चनीच भावना यांचे सतत वाभाडे काढले आहेत. पण अभिमानी समाजानें संतांना नमस्कार करून, त्यांना शेंदूर फांसून उंच स्थानीं ठेवून दिलें; आणि धर्माच्या नांवावर अभिमानाचा परिपोष केला. अशा प्रकारें हिंदुसमाजव्यवस्थेनें हिंदु सिद्धान्तांशीं द्रोह केला आणि समाजाला कमजोर, शिथिल व संकुचित दृष्टीचा बनविलें.

म्हणून आपण आपल्या धर्म-ग्रंथांतील भिन्न भिन्न काळचे आचार-नियम आणि समाजव्यवस्थेच्या रचना तपासल्या पाहिजेत; व त्यांपैकीं कोणतीं तत्त्वें समाजहिताचीं म्हणजे धर्मास अनुकूल आहेत आणि कोणते रिवाज समाजाला खालीं ओढणारे म्हणजे पातकी आहेत हें शुद्ध धर्मदृष्टीनें तपासलें पाहिजे. याच दृष्टीनें आपण आपले आदर्श-संस्कार व वर्णव्यवस्था या सर्वांची तपासणी केली पाहिजे.

आठ गुण :

ज्या लोकांनीं हिंदुसमाजव्यवस्था नक्की करून दिली त्यांना आपण 'ऋषि' असें म्हणतों. सत्य, अहिंसा इत्यादि यमांचें आणि शौच, स्वाध्याय, संतोष वगैरे नियमांचें ज्यांनीं पालन केलें आहे व जे तप आणि योग यांनीं सम्पन्न आहेत ते ऋषी, अशी ऋषींची एक व्याख्या आहे. आजच्या भाषेंत हाच विचार व्यक्त करावयाचा असेल तर ज्यांचें जीवन शुद्ध, संस्कारी आणि निष्पाप आहे, जे सामाजिक परंपरा योग्य प्रकारें जाणतात व ज्यांच्या हृदयामधून समाजविरोधी अशा सर्व वृत्ती व वासना नष्ट झाल्या आहेत असे समाजपुरुष म्हणजेच ऋषि होत. त्यांनीं वर्णाश्रमपद्धतीची समाजव्यवस्था मुकर केली. यांपैकीं आश्रमव्यवस्था ही व्यक्तीच्या क्रमानुसारी उन्नतीसाठीं रचिली गेली व वर्णव्यवस्था ही सामाजिक सुस्थिति व उत्कर्ष यांसाठीं रचिली गेली. समाजपरायण व नारायणपरायण अशा ऋषिमुनींनीं पाहिलें कीं, समाजव्यवस्था ही केवळ

बाह्यव्यवस्था होऊं शकणार नाहीं. समाजव्यवस्था जर बाह्य म्हणजे कृत्रिम असेल तर ती टिकणार नाहीं. आणि टिकली तरी विकृत झाल्याशिवाय राहणार नाहीं. असें पाहून सामाजिक जीवनाचा जणूं काय प्राणच असे कांहीं सद्‌गुण त्यांनीं समाजासमोर ठेवले आणि सांगितलें कीं, जोंपर्यंत तुम्ही हे सद्गुण अंगीं बाणीत राहाल तोंपर्यंतच तुम्ही आणि तुमचा समाज टिकावयाचा आहे. आणि ते सद्‌गुण उत्तम प्रकारें अंगीं बाणले जावेत, स्वभावरूप व्हावेत, त्यांची विस्मृति होऊं नये यासाठीं जीवनाच्या विशिष्ट प्रसंगीं त्यांचें स्मरण करविणारे आणि त्यांची संवय लावणारे अनेक संस्कार रूढ केले. सद्‌गुणांशिवाय समाजव्यवस्था टिकावयाची नाहीं आणि संस्काराशिवाय सद्‌गुण अंगीं यावयाचे नाहींत, ही गोष्ट आपल्या समाजशास्त्रानें–समाजशास्त्रज्ञांनीं पहिल्यापासूनच ओळखली आहे.

अशा तऱ्हेचें संस्कारांचें शिक्षण प्रत्येकाला मिळालेंच पाहिजे असा जुना आग्रह देखील असावा. हें शिक्षण ज्याला मिळालेलें नाहीं त्याला व्रात्य म्हणत. आणि ज्यानें शिक्षण घेऊन सोडून दिलें असेल त्याला पतित असें म्हणत. प्रथम सांगितल्याप्रमाणें कालांतरानें जेव्हां हें शिक्षण सर्व लोकांना न देतां कांहीं विविक्षित लोकांनाच देण्यांत यावें अशी संकुचित दशा सुरू झाली तेव्हां सुशिक्षित तो द्विज व अशिक्षित तो शूद्र असा अनिष्ट भेद पडला. जेव्हां मनुष्य मातापितरांकडून जन्म प्राप्त करतो तेव्हांचा तो त्याचा प्रथम जन्म आणि संस्कार देणाऱ्या आचार्य-समाजपुरुषाच्या द्वारें धर्मशास्त्राच्या मदतीनें त्याला संस्कारांचें जें शिक्षण मिळतें तो त्याचा दुसरा जन्म होय. आचार्य हा पिता आणि धर्मविद्या सावित्री ही माता होय. जेव्हां आपण यांच्या पोटीं जन्म घेतों तेव्हां द्विज होतों–म्हणजे समाजजीवनांत आपला प्रवेश होतो.

मनुष्य जेव्हां जन्मतो तेव्हां फक्त त्याचा देहधर्मच जोरदार असतो. म्हणजे भूक लागली कीं खावें, तहान लागली कीं पाणी प्यावें, थकून

गेल्यावर झोंपीं जावें, सुखाकडे धांव घ्यावी, आणि दुःख दिसलें कीं तेथून काढता पाय घ्यावा, हा त्याचा स्वभावधर्म असतो.

पण एवढ्यानें समाज चालूं शकणार नाहीं. समाजजीवनासाठीं माणसाच्या वृत्तींवर खूप काबू असण्याची जरूर आहे. सगळ्या वृत्ती पूर्णपणें विकसित झालेल्या नसतील तर त्यांना उत्तेजन देऊन विकसित केलें पाहिजे आणि निरर्थक वृत्ती जोरदार झाल्या असतील तर युक्तिप्रयुक्तीनें आणि दृढतेनें त्यांना ताब्यांत आणलें पाहिजे. आणि कांहीं वृत्तींचा तर समूळ नाशच केला पाहिजे. जेव्हां इतकें होईल तेव्हांच मनुष्य समाजाशीं पूर्णपणें एकरूप होऊं शकेल. हृदयाच्या पूर्ण विकासानें मनुष्यानें विराट् समाजाशीं एकरूप होऊन जावें, समष्टीच्या हितास विरोधी असे विचार किंवा विकार त्याच्या मनांत उत्पन्नच होऊं नयेत, स्वार्थ आणि सर्वार्थ यांमध्यें न्याच्या हृदयांत द्वंद्व निर्माणच होऊं नये, अशी स्थिति जेव्हां निर्माण होते तेव्हां तिला सायुज्य असें म्हणतात. सायुज्य म्हणजे विराट् समाजाशीं एकरूप होणें.

भूत, भविष्य, वर्तमान नरनारींचा समुदाय म्हणजे 'नार' होय. या 'नारा'मध्यें म्हणजे त्रिकालव्यापी मनुष्यसमाजामध्यें व्यापून राहिलेलें चैतन्य तत्त्व म्हणजे नारायण—The God of Humanity! या नारायणाची जो अखंड उपासना करतो तो मुनि, अशी जुनी व्याख्या आहे. (नारायणपरो निर्द्वंद्वो मुनिः।) निर्द्वंद्व म्हणजे ज्याच्या हृदयांत आपलें व परकें असा भेद उरलेला नाहीं, जो सर्वांसाठीं समान आहे व सगळ्यांकडे मित्राच्या दृष्टीनें पाहतो तो.

शास्त्रामध्यें सांगितलें आहे कीं 'यस्य ते चत्वारिंशत् संस्काराः अष्टावात्मगुणाश्च स ब्रह्मणः सायुज्यमाप्नोति' (गौतमधर्मसूत्र प्र. २ अ. ८). ज्या माणसावर असे चाळीस संस्कार झाले आहेत आणि ज्यानें आठ आत्मगुण बाणविले आहेत तो मनुष्य ब्रह्मासंगें सायुज्य प्राप्त करतो. ब्रह्म शब्द बृहत् वरून आलेला आहे. बृहत् म्हणजे मोठें,

विशाळ–विराट्. विराट् समाजांत किंवा विश्वांत जें तत्त्व राहिलेलें आहे तेंच ब्रह्म होय. आठ आत्मगुण ज्यानें आत्मसात् केले आहेत तो या विराट् विश्वसमाजाशीं कधींहि द्रोह करणार नाहीं. हे आठ गुण चांगल्या प्रकारें अंगीं यावेत यासाठीं त्या वेळच्या कल्पनेप्रमाणें चाळीस संस्कार योजले गेले होते.

वर सांगितल्याप्रमाणें जेव्हां समाजांत द्विज आणि शूद्र असे दोन भाग पडले आणि संस्कार हे द्विजासाठींच असावेत असें निश्चित् ठरविण्यांत आलें तेव्हां शूद्रांचें काय होणार हा प्रश्न उद्भवला. शूद्र जर सुशिक्षित न होतील तर समाजावरील त्यांचा भार वाढून समाज बुडूनच जावयाचा. एकीकडे द्विज लोक आपला वर्णाभिमान सोडीत नाहींत आणि दुसरीकडे शूद्र लोक शिक्षणाशिवाय राहतील तर तें परवडणार नाहीं हें पाहून एका समाजहितैषी ऋषीनें मधला रस्ता काढला. 'शूद्रोप्येवंविधः कार्यो विनामंत्रेण संस्कृतः।' म्हणजे द्विजांच्या पद्धतीनेंच परंतु वेदमंत्र म्हटल्याशिवाय शूद्रांना संस्कार द्यावयाचे. तुम्ही तुमचे मंत्र खुशाल तुमच्याजवळच ठेवा, पण शूद्रांना (आणि स्त्रियांनाहि) तूष्णीम् म्हणजे चुपचाप, मंत्राशिवाय संस्कार हे द्याच. 'मंत्र न बोलण्यानें लोकांचें काय बिघडणार?' असा विचार त्या ऋषीनें केला असेल. आज आपण अशा तऱ्हेच्या चालढकलीवर संतोष मानणार नाहीं.

आतां या संस्कारांचें स्वरूप तपासण्यापूर्वी मुख्य गोष्ट, आत्म्याचे जे आठ गुण तेच आपण समाजधर्माच्या दृष्टीनें तपासले पाहिजेत. गौतमधर्मसूत्रांत हे गुण खालीलप्रमाणें दिले आहेत : अथ अष्टौ आत्मगुणाः (१) दया सर्वभूतेषु (२) क्षांतिः (३) अनसूयता (४) शौचम् (५) अनायासः (६) मांगल्यम् (७) अकार्पण्यम् (८) अस्पृहा इति। सर्व प्राण्यांविषयीं दयाभाव बाळगणें, जो आपलें नुकसान करील त्याचेविषयीं देखील क्षमा धारण करणें, कोणाचाहि उत्कर्ष पाहून मनामध्यें हेवा न करणें, शरीर आणि मन यांची स्वच्छता ठेवणें,

वासनेमध्यें वाहवून जाऊन प्रमाणाबाहेर धांवपळ न करणें, सर्वांचें भलें इच्छिणें व प्रसन्न राहणें, चिक्कूपणा किंवा हलकें मन न करणें, आणि परक्याच्या वस्तूचा लोभ न राखणें हे आत्म्याचे खास आठ गुण ज्यानें अंगीं बाणविले असतील त्याचा आत्मा जागृत आहे, तो सामाजिक पुरुष आहे, त्याच्या हातून समाजाचें अनहित व्हावयाचें नाहीं. त्याच्यामुळें सामाजिक जीवनाचा उत्कर्षच होईल. हें आपल्या धर्मकारांनीं पहिल्यापासून पाहून ठेविलें आहे. आतां हे आठ गुण समाजाचा उत्कर्ष कसा साधतात हें पाहावयाचें आहे.

भूतदया :

समाजव्यवस्था म्हटली कीं, समाजांतील भिन्न भिन्न कार्यें करणारे वर्ग, या वर्गांमधील संबंध, प्रत्येक वर्गाचा अधिकार आणि त्याचीं कर्तव्यें एवढ्याच गोष्टी प्रथम ध्यानांत येतात. याच्यापुढें जाऊन विचार केल्यास सामाजिक पुरुषार्थामुळें जी कांहीं फलप्राप्ति होते, तिच्या वांटणीचे नियम आणि ती वांटणी बरोबर व्हावी म्हणून सामाजिक-राजकीय अधिकार कोणाच्या हातीं असावेत, ते कशा प्रकारें विभागले जावेत याची मीमांसा म्हणजे समाजव्यवस्था, असा विचार निर्माण होतो. या दोन्ही बाजू महत्त्वाच्या आहेत, याविषयीं कांहीं शंका नाहीं.

समाजाचें अस्तित्व कशासाठीं आहे, सामाजिक जीवनामधून मनुष्याला काय मिळवावयाचें किंवा अंगीं बाणवावयाचें असतें, सामाजिक जीवनाची सुरुवात कशांत आहे, याविषयीं आजकाल फारशी चर्चा चालत असेल असें वाटत नाहीं. जीवनाचीं साधनें निर्माण करणें, जगणें, आपल्या अपत्यांनाहि जगण्याचा मार्ग शोधून देणें, एकमेकांवर अधिकार गाजविणें, शारीरिक, बौद्धिक आणि भावनाविषयक आनंदाचीं साधनें निर्माण करणें आणि मजा करणें एवढाच जीवनाचा सामान्य उद्देश समजला जातो.

या विषयाचें रहस्य जाणावें, प्राणिमात्राचें दुःख नि अज्ञान दूर करावीं, लोकभ्रम आणि अज्ञान टाळावेत, सर्वांनीं प्रेमानें राहावें, स्वार्थ-त्यागामध्यें आनंद अनुभवावा, आणि आपल्याच जीवनाचा फक्त विचार न करतां सर्वांच्या जीवनासाठीं बलिदानास तयार व्हावें अशा तऱ्हेचा सामाजिक आदर्श आजच्या जनतेसमोर नाहीं असें नाहीं, पण हा प्रत्येक व्यक्तीच्या अभिरुचीचा प्रश्न आहे. त्याचा रीतसर उपदेश किंवा आग्रह करतां यावयाचा नाहीं. अशा तऱ्हेची विचारसरणी आजकाल स्वीकारली गेली आहे. यामुळें सामाजिक जीवनासाठीं स्वार्थाला ज्या मर्यादा घालाव्या लागतात तेवढ्याच स्वीकारून माणसानें स्वहित साधलें कीं पुरे, असेंच सामान्यपणें समजलें जातें.

आपल्या येथें अशा तऱ्हेचा सर्वसामान्य आदर्श लोकांसमोर ठेवला जात नसे. पण माणसामाणसांमधील शक्तींचा भेद स्वीकारून प्रत्येकाकडून त्याच्या लायकीप्रमाणें अपेक्षा राखली जाई. ज्याप्रमाणें आज आपण वयस्क लोकांकडून जी आदर्शाची अपेक्षा करतों ती तरुणांकडून करीत नाहीं, आणि त्या तरुणांकडून जी उत्साहाची व बलिदानाची अपेक्षा बाळगतों ती किशोर वयाच्या मुलांकडून बाळगीत नाहीं; व अगदीं लहान अज्ञानी मुलांकडून तर कसल्याच प्रकारच्या जबाबदारीची अपेक्षा नसते, त्याचप्रमाणें हिंदुसमाजव्यवस्थेनुसार ज्याची योग्यता जितकी अधिक असेल तितका त्याचा सामाजिक आदर्श अधिक उंच व कठिण असतो. युरोपांत असा एक सिद्धांत आहे कीं, राजाच्या हातून गुन्हा होत नसतो. यांचें कारण असें सांगण्यांत येई कीं, 'जेव्हां आपण असें मानतों कीं, राजा करील तो कायदा, तेव्हां राजा जें कांहीं करील तें कायद्याच्या विरुद्ध कसें होऊं शकेल?' आपल्या येथील शास्त्र याहून वेगळें होतें. आपल्या येथें मनस्वी (स्वच्छंदी, लहरी) किंवा असंस्कारी, अशिक्षित, अज्ञानी मनुष्य गुन्हा करूं शकत नाहीं. त्याच्या हातून समाजाचें नुकसान होऊं शकणार नाहीं

असें नाहीं, पण त्याला तो जबाबदार नाहीं. कारण, ज्याप्रमाणें लहान मुलांच्या हातून कोणाचा अपमान होत नाहीं, त्याचप्रमाणें, संस्कारशून्य, मागासलेल्या लोकांच्या हातून कसल्याहि प्रकारचा गुन्हा होत नाहीं. त्यांच्या हातून नुकसान होऊं नये म्हणून त्यांना काबूंत ठेवावें, पण त्यांच्या कोणत्याहि आचरणाबद्दल त्यांना शिक्षा देतां यावयाची नाहीं. जर कुणाला शिक्षा द्यावयाचीच असेल तर त्यांना संस्कार देण्याची, त्यांना सुशिक्षित करण्याची आणि त्यांना समाजाचे जबाबदार घटक बनविण्याची जबाबदारी ज्यांच्यावर होती त्यांनीं ती पार पाडली नाहीं म्हणून त्यांनाच शिक्षा देण्यांत येत असे. पुष्कळ वेळां प्रजेच्या गुन्ह्यास राजाचा गुन्हा मानण्यांत येई, शिष्याच्या अपराधासाठीं गुरूस दंडिलें जाई. आजच्या युगांत हें सर्व विचित्र वाटेल. कारण आज सामाजिक जबाबदारीची कल्पनाच वेगळी आहे.

ज्यांच्यांत कौशल्य थोडें, ज्यांची बुद्धि कच्ची, आणि ज्यांची नीतिमत्ता ढिली असेल, त्यांना अधिकारहि थोडे व त्यांची जबाबदारीहि कमी. त्यांच्या हातून झालेल्या गुन्ह्यांची गंभीरताहि तितक्या प्रमाणांत कमीच समजली पाहिजे.

हा झाला फक्त जबाबदारीचा दृष्टि-बिन्दु. पण प्रत्येकाला शिक्षण देऊन त्यांच्यांत सामाजिक जबाबदारी आणण्याची जबाबदारी समाजनेत्यांवर असल्यामुळें समाजांत सामाजिक सद्गुण आणण्याची व त्यासाठीं आवश्यक समजले जाणारे संस्कार चालू राखण्याची जबाबदारी ते खूप काळजीपूर्वक पार पाडीत.

* * *

आज आपण मनुष्यस्वभाव आणि नैसर्गिक वृत्ति यांविषयीं पुष्कळ ऐकतों. अमुक वस्तु मनुष्यस्वभावाविरुद्ध आहे, बलिदान हें नैसर्गिक वृत्तीस अनुकूल नाहीं वगैरे मुद्दे पुढें करून प्रत्येक उच्च आदर्शास खालीं ओढण्याचा प्रयत्न आज होत असतो. पण कांहीं सामाजिक

सद्‌गुणांशिवाय माणसाचें एक दिवसहि चालूं शकणार नाहीं. अशा सद्‌गुणांना मनुष्यस्वभाव समजण्याऐवजीं त्यांना समाजाचा अधिकार म्हणून ओळखण्यांत येतें, आणि समाजनियंत्रणानें त्यांचें वातावरण समाजांत कायम ठेवण्याचा प्रयत्न होत असतो. पण खरें पाहिल्यास आज ज्याला नैसर्गिक वृत्ति अथवा मनुष्यस्वभाव म्हणून स्वीकारण्यांत येतो तो मध्यम कोटीच्या व मध्यम वर्गाच्या लोकांच्या रूढ स्वभावाचा आदर्श आहे. आपल्या लोकांनीं मनुष्य म्हणजे आत्मा व त्याचा अभ्रा असा भेद पाडलेला आहे. आणि म्हणून शरीराचा धर्म वेगळा नि आत्म्याचा धर्म वेगळा, शरीराचे गुण वेगळे नि आत्म्याचे गुण वेगळे ही गोष्ट पाहून ठेविली आहे. आपण जे स्वातंत्र्यासाठीं झगडत असतों ते फक्त शरीरगुणांना मोकळीक मिळविण्यासाठीं नसून आत्म्याच्या गुणांना अनियंत्रित वाव मिळावा यासाठीं लढत असतों. आत्म्याचे गुण हा देखील मनुष्याचा स्वभावच आहे. आत्मरक्षण ही जशी नैसर्गिक प्रवृत्ति समजली जाईल तशी आत्मबलिदानाची वृत्ति देखील नैसर्गिक प्रवृत्तिच होय. एक प्रवृत्ति सामान्य आहे, प्राकृत आहे; दुसरी उच्च आहे. आत्म्याचे गुण हा देखील मनुष्यस्वभावच आहे, आणि ते जसजसे विकसित होतील तसतसे सामाजिक जीवनांत न्याय, शांति, समता, प्रेम आणि उदारता या गुणांचा परिपोष होईल.

ऋषिमुनींनीं आत्म्याचे जे हे आठ गुण कल्पिले आहेत त्यांत गौतम-धर्मसूत्रानें भूतदयेला प्रथम स्थान दिलें आहे. भूतदया म्हणजे प्राणिमात्राविषयींचें प्रेम. आपल्याकडे सज्जनता घेऊन दुसऱ्याविषयींचा तिरस्कार झांकण्यासाठीं जी वृत्ति बाळगिली जाते तिला पुष्कळ वेळां समाज-दया या नांवानें ओळखतों. अशा तऱ्हेच्या दयेच्या किंवा कृपेच्या मागें वृत्तीची कृपणताच असते. या कार्पण्यदोषाला आपण आत्म्याचा गुण समजतां कामा नये. पण खऱ्या म्हणजे मूळ अर्थानें दया म्हणजे कोमलता. आई, बहीण, मुलगी, मुलें, वृद्ध आणि आजारी यांची

लाचार स्थिति पाहून आपल्या मनांत त्यांचेविषयीं तिरस्कार उत्पन्न होत नाहीं तर त्यांच्याविषयींची श्रद्धा, आदर, प्रेम आणि अभिमुखता व्यक्त करण्याची आपल्याला संधि मिळाली असें समजून आपलें हृदय त्यांच्याकडे आकर्षित होतें ही खरी दया होय.

ही दया फक्त माणसांतच नव्हे तर सर्व प्राण्यांमध्यें कमीअधिक प्रमाणांत दिसून येते आणि म्हणूनच प्राणिमात्रांत आत्मा आहे असें हिन्दु लोक निःशंकपणें सांगतात. ज्याच्यांत भूतदया आहे, ज्याच्यांत त्यागवृत्ति आहे, ज्याच्यांत कृतज्ञता व निष्ठा आहे आणि इतरांना लुबाडून खाण्यापेक्षां–भीक मागून किंवा फसवून खाण्यापेक्षां मेहनत-मजुरी करून पोट भरण्यावर ज्याचा विश्वास आहे अशा माणसाला आपण कधींहि पापी, पतित, भ्रष्ट किंवा चांडाळ समजूं शकणार नाहीं. जो आपल्या मेहनतीचें फळ खातो त्याला चांडाळ समजणें हें धर्मशास्त्रालाच उलटें टांगण्यासारखें आहे.

प्राणिमात्राविषयीं आपल्या मनांत जी शुभ वृत्ति जागृत होते तो आत्म्याचा गुण आहे, आणि म्हणूनच अत्यंत प्रतिकूल परिस्थितींतहि हा गुण पुष्कळ वेळां आपला उत्कर्ष दाखवितो.

या भूतदयेशिवाय समाज एक क्षणभरहि टिकणार नाहीं. प्रत्येक मनुष्य क्षणोक्षणीं कांहीं ना कांहीं अडी-अडचणींत सांपडतोच. त्याच्यांत जर भूतदया नसेल तर मनुष्य वाटेल तें पाप करून आपली अडचण टाळल्याशिवाय राहणार नाहीं. पण 'मला जर इतकें दुःख होतें तर दुसऱ्याची काय स्थिति होत असेल' अशा प्रकारचा विचार आत्मौपम्य बुद्धीनें माणसाच्या मनांत येतोच, व हेंच भूतदयेचें भांडवल होय. दारुण भुकेनें व्याकुळ झालेली आई दुष्काळांत देखील आपल्या पोटास चिमटा घेऊन आपल्याला मिळालेला महाग घांस जेव्हां आपल्या मुलाला भरविते तेव्हां मुलाला जो आहार मिळतो त्याहून श्रेष्ठ प्रतीचा आहार आईच्या हृदयाला मिळतो.

जिला आपण सज्जनता असें म्हणतों तिच्या मुळांत भूतदयाच असते. ती आहे म्हणूनच जगाचा व्यवहार चालतो. जगामध्यें स्वार्थ, लुच्चेपणा, हेवादावा आणि द्रोह पाहून आपण गोंधळून जातों. पण आज दिसत आहेत त्यांहून हे दोष जास्त नांहींत याचें कारण जगांतील राज्यतंत्राची हुशारी हें नसून हृदया-हृदयांमध्यें भूतदया या नांवानें ओळखला जाणारा आत्मगुण असतो हेंच होय. माणसाचा माणसांवरील विश्वास उडून गेलेला नाहीं, सामान्य व्यवहार चालतो, पतिपत्नी सबंध जन्मभर एकत्र नांदतात, गरीब लोक दुःख सहन करूनहि संतुष्ट राहतात, स्त्रिया मुलांना वाढवितात, आणि म्हाताऱ्या ढोरांना आपण मारून न खातां शेवटपर्यंत पाळतों, या सर्वांच्या मुळाशीं सार्वभौम भूतदयाच आहे.

क्षमा :

श्रेष्ठ कोण ? व्यक्ति कीं समाज ? या गोष्टींची चर्चा युरोपांत खूप चालली. व्यक्तींचें व्यक्तित्व पवित्र आहे, त्यांचें स्वातंत्र्य आणि त्यांचा विकास हा समाजरचनेचा अंतिम हेतु असला पाहिजे, असें म्हणणारा एक पक्ष आणि एक काळ होऊन गेला. त्यानंतर या विचारांस कंटाळून लोकांनीं दुसरें टोंक गांठलें. व्यक्ति समाजासाठीं आहे, व्यक्तीनें समाज-हितासाठीं जगलें पाहिजे. समाजजीवनांतच व्यक्तीचें जीवन कृतार्थ होतें. यामुळें व्यक्तीनें समाजाचा अंकुश स्वीकारला पाहिजे. व्यक्तीचें जीवन कसें असावें, हें नक्की करण्याचा अधिकार समाजालाच असला पाहिजे, अशा प्रकारचें तत्त्वज्ञान आज प्रामुख्यानें वावरत आहे. पण कोणी असा विचारच करीत नाहीं कीं, व्यक्ति आणि समाज यांच्यामध्यें मुळीं विरोधच कां असावा ? व्यक्ति आणि समाज हे एकमेकांचे विरोधी किंवा शत्रू नाहींत. व्यक्ति, समाजाविषयींचीं आपलीं सर्व कर्तव्यें स्वेच्छेनें आणि प्रसन्नपणें बजावून आपल्या मुख्य स्वातंत्र्याचें रक्षण अवश्य करूं शकते; व व्यक्तींच्या सर्व अधिकारांचें नि हक्कांचें रक्षण करून समाज

समष्टींचें हित अधिकाधिक साधूं शकतो. व्यक्ति आणि समाज हे योग्य प्रकारें संस्कारित असतील, सामाजिक सद्‌गुणांचा विकास झाला असेल आणि संस्कारांच्या द्वारें हे सद्‌गुण दृढ झाले असतील तर समाज आणि व्यक्ति हे कोणत्याहि प्रकारचा विरोध मनांत न आणतां उत्तम प्रकारें चालूं शकतात; आणि एकासाठीं दुसऱ्याची अवगणना करण्याचेंहि कारण उरत नाहीं.

न्याय तोलण्याच्या वेळीं प्रत्येक पक्ष आपल्याच फायद्याची गोष्ट पुढें करतो. प्रत्येक पक्ष आपलाच स्वार्थ ताणून धरतो. यामुळें न्यायाधीशाला तराजूचा न्याय तोलावा लागतो. अर्थात् त्यांत उदारता, बंधुता वगैरे आर्यभावनांना फार थोडा अवकाश राहावयाचा. मग तो विग्रह कोर्टांत चालो, राज्यव्यवस्थेंत चालो, किंवा आंतरराष्ट्रीय स्वरूप धारण करो. त्यामुळें मनुष्यजातीची कांहीं उन्नति होणार नाहीं.

ज्यानें गुन्हा केला आहे, त्याला शिक्षा ही झालीच पाहिजे, असा आग्रह जर आपण राखला तर शिक्षेंतून किती लोक वांचूं शकतील? आणि मनुष्यव्यवहार कसा चालेल? प्रत्येकजण जर आपलाच स्वार्थ पाहील आणि दुसऱ्याचा विचार करणार नाहीं तर समाज टिकणार नाहीं; म्हणून न्यायखातें, बेलीफ, फंड, तुरुंग, हद्दपारी, फांशी—ही सर्व व्यवस्था असूनहि तिला गौणपद देऊन भूतदया आणि क्षमा यांना प्राधान्य दिलें गेलें आहे. इस्लामी धर्मांत स्पष्टपणें सांगितलें आहे कीं, 'गुन्हेगाराला शिक्षा करणें हा तुमचा हक्क आहे, पण जर तुम्ही सोशीकपणें त्याला क्षमा कराल तर तें परमात्म्याला ज़ास्त आवडेल.'

भूतदया आणि क्षमा हे दोन सामाजिक सद्‌गुण समाजांत व्यापक प्रमाणांत स्वाभाविक झाले पाहिजेत. ज्यांच्याशीं आपला संबंध येतो त्यांच्याविषयीं सहानुभूति बाळगणें यांत कांहीं विशेष मोठेपणा नाहीं. व्यापारी लोक आपल्या मोठमोठ्या गिऱ्हाइकांचा मानसन्मान कांहीं कमी ठेवीत नाहींत. डॉक्टर व वकील आजाऱ्यांची व अशीलांची कांहीं

कमी खुशामत करीत नाहींत. सासूसासरे आपल्या जांवयांची पूजा कांहीं थोडीथोडकी करीत नाहींत. पण या सर्व आतिथ्यांना कोणी सद्‌गुण म्हटलेलें नाहीं. ज्यांच्याजवळून कोणत्याहि प्रकारच्या लाभाची किंवा स्वार्थाची अपेक्षा नाहीं, अशांच्याविषयीं जर आपण आपलेपणा दाखविला, त्यांच्याविषयीं जर हृदयांमध्यें अनुकंपा बाळगली तरच तिला भूतदया असें म्हणतां येईल.

भूतदयेची अपेक्षा अशी असते कीं, जे लोक आपला द्वेष करतात, ज्यांनीं आपलें नुकसान केलें आहे असे लोकदेखील जर संकटांत सांपडले असतील तर आपण त्यांचें निरपेक्षपणें रक्षण केलें पाहिजे.

आतां येथें एक महत्त्वाचा प्रश्न उत्पन्न होतो. आजकाल कांहीं लोक जोर देऊन असें सांगतात कीं, 'शत्रूला आसरा देणें, त्याच्यावर दया करून त्याला जीवदान देणें ही दयेची आत्यंतिकता आहे. कांहीं सद्‌गुण देखील जेव्हां मर्यादा ओलांडतात तेव्हां ते दुर्गुण बनतात. पृथ्वीराजानें जर आपल्या शत्रुला चार चार वेळां सोडून दिलें नसतें तर त्या आर्यत्व-वेड्या राजावर त्याच शत्रूच्या हातून मरण्याची पाळी आली नसती. 'पयःपानं भुजंगानां केवलं विषवर्धनम्।' 'सापाला दूध जरी पाजलें तरी त्यापासून विषच निर्माण व्हावयाचें.' शत्रूविषयीं उदारता बाळगणें यांत खरोखर दोषास्पद असें कांहीं नाहीं; पण एकदां उदारता दाखविली कीं, मग तो शत्रुत्व करावयाचा नाहीं, आतां तो मित्र होऊन चुकलाच आहे, कारण तो असें म्हणत आहे कीं, 'मी वैर सोडिलें आहे,' आतां आपण बेसावधपणें राहूं शकतों, असें जे मानतात आणि बोलतात ते जर पुन्हां अडचणींत सांपडले तर त्याचा दोष त्यांच्या उदारतेवर न येतां गाफिलपणावर व बावळटपणावर येतो. सापाला दूध पाजल्यानंतरहि तो आपल्याला चावणार नाहीं अशा परिस्थितींत आपण त्याला व आपल्या-लाहि ठेवूं तरच–व मगच–आपल्या उदारतेचा परिणाम हळू हळू होऊं लागतो. भूतदयेबरोबर अबुद्धि आणि गफलत यांची भेसळ करावयास

तर कोणी सांगत नाहीं ना ? समर्थो धर्ममाचरेत्। आपलें सामर्थ्य–खरें आध्यात्मिक सामर्थ्य–जपून ठेवावें, त्याचबरोबर उदार धर्माचरणहि करावें. असहाय होऊन दाखविलेली उदारताहि खरोखर उदारताच नसते. खऱ्या उदारतेंत देखील जिथें फळाचा लोभ बाळगावयाचा नसतो तेथें लाचारीच्या उदारतेचें फळ प्राप्त करण्याचा लोभ आपल्याला कितीसा पचणार ?

जी गोष्ट भूतदयेची, तीच क्षमेची ! ज्यानें आपला अपराध केला आहे, नुकसान केलें आहे त्याचे पाय चाटीत बसणें, त्याची खुशामत करणें हा निव्वळ हीनपणाच होय. त्या मार्गानें आपला उद्धार होणार नाहीं. अन्यायाचा प्रतिकार करण्याची शक्ति आपल्याजवळ असलीच पाहिजे. पण ती शक्ति नेहमींच वापरण्याची आवश्यकता नसते. शक्ति ही वापरली कीं तितक्या प्रमाणांत उधळली गेली. यापेक्षां समर्थ बनून विरोध्याला क्षमा करावयाची आणि विरोधी व्यक्ति पुनः आपलें नुकसान करूं शकेल अशा अवस्थेंत राहावयाचें नाहीं यांतच आर्यत्व आहे. विरोधी व्यक्ति आपल्याला हजार वेळां दगा देवो, प्रत्येक वेळीं आपण जागृत असूं तर क्षमेनें आपली शक्ति वाढेल, आणि विरोध्याचें तेज फिक्कें पडेल, त्याचा आत्मसन्मान नष्ट होईल आणि मग त्याची सामाजिक प्रतिष्ठाहि नाहींशी होईल. इतकें होऊनहि जर आपण आपली नीति कायम ठेविली तर विरोधी व्यक्तीचें हृदय आपल्या सामर्थ्ययुक्त क्षमेच्या योगें विरघळल्यावांचून राहणार नाहीं आणि मग तो आपला विरोधी न राहतां मित्र बनून जाईल. आर्य पुरुष जर आपल्या शत्रूच्याहि हृदयांत आर्यत्वाचा उदय करूं शकणार नाहीं तर त्याच्या आर्यत्वाचा मोठेपणा तो कसचा ?

अशा तऱ्हेची क्षमा आणि दया यांच्यावांचून समाज चालावयाचा नाहीं. हीन वृत्तीच्या लोकांना, गुन्हेगारांना आणि विरोधकांना जर आपण शिक्षाच करीत जाऊं तर ते दबून जातील. पण त्यांच्या हृदयांत विरोध आणि हीनता हे दुर्गुण तर कायमचेच राहतील व ते

आपल्या वृत्तींना विजय मिळवून देण्याची खटपट करीतच राहतील. या पद्धतीनें समाजाची उन्नति व्हावयाची नाहीं. आज मनुष्यजातींत जे कांहीं सद्‌गुण पसरलेले दिसतात ते सर्व दया आणि क्षमा यांच्यामुळेंच आहेत.

दया आणि क्षमा यांचें वातावरण प्रस्थापित झाल्यानंतर व्यक्ति आणि समाज यांच्यांतील झगडा सहज मिटवितां येईल.

अनसूया :

सामाजिक जीवन आणि सार्वजनिक जीवन हीं जर कोणत्या खास दुर्गुणांमुळें कुजून जात असतील तर ते म्हणजे मत्सर व असूया हे होत. मोठमोठ्या पराक्रमी लोकांमध्येंहि पुष्कळ वेळां हा दोष दिसून येतो हें खरें; तरी पण हा दोष नामर्दपणाचाच आहे. पराक्रमी लोकांमध्यें अमर्षाची किंवा स्पर्धेची वृत्ति पुष्कळ वेळां असते. ही वृत्ति त्याज्य आहे असें म्हणतां यावयाचें नाहीं. तुमचा प्रतिस्पर्धी खूप पुरुषार्थ करीत असेल तर तुम्ही त्याच्या दसपट पुरुषार्थ करा आणि प्राधान्य मिळवा. याला कोणीहि अडकाठी करीत नाहीं. पण दुसऱ्याचा उत्कर्ष पाहून जळफळणें, त्याचें अहित चिंतणें, त्याचे पाय ओढण्याचा प्रयत्न करणें, यासारखी समाजद्रोही प्रवृत्ति दुसरी कोणतीहि नाहीं.

विरोधी पक्षांमध्यें जेव्हां समोरासमोर झगडा होऊं लागतो तेव्हां सरळ सरळ चढाईचाच प्रश्न उपस्थित होतो. पण जेव्हां एकाच पक्षाच्या लोकांमध्यें आपापसांत ईर्ष्या उत्पन्न होते तेव्हां मत्सर आणि असूया यांचें विष पसरतें, आणि मग आपल्याच लोकांची शक्ति खर्ची करण्याचे विचार आपल्या डोक्यांत घोळूं लागतात. आपल्या पक्षांत आपलें कांहीं चाललें नाहीं असें पाहून मनुष्य चिडून विरुद्ध पक्षास मिळाल्याचीं उदाहरणें आपल्या जुन्या व चालू इतिहासांत पुष्कळच आढळतात. यावरूनच हें सिद्ध होतें कीं, आपलें सामाजिक आरोग्य अजून सुधारलेलें नाहीं. श्रेष्ठतेच्या अहंश्रेयसी(स्पर्धे)मध्यें

पराभव पावलेल्या लोकांतच मत्सर किंवा असूया निर्माण होते असें नाहीं, तर विजयी लोकहि जर संकुचित मनोवृत्तीचे किंवा हीन वृत्तीचे असतील तर प्रत्येकाची शक्ति ओळखून तिचा सदुपयोग करणें, त्यांचें सहकार्य प्राप्त करणें, त्यांचा विश्वास संपादन करून त्यांना आपलेंसें करून घेणें यांतच मोठेपणा आहे हें त्यांना समजत नाहीं. ते चढाओढीमध्यें किंवा अहंश्रेयसीमध्यें पहिले येऊन देखील आपली शक्ति वाढवीत नाहींत, तर सर्वांच्या ईर्ष्येचें लक्ष्य होण्यांतच धन्यता मानून आकाशांत उंच उंच उडणाऱ्या शोभेच्या दारूच्या बाणाप्रमाणें क्षणभर चकाकून विझून जातात. असूया व मत्सर हे सामाजिक कार्याची तर राखरांगोळी करतातच, पण ज्यांच्या अंगीं हे दोष असतील त्यांना ते सर्वांत आधीं सर्वांत अधिक जाळून टाकतात.

अशा मत्सराला काय औषध ? मत्सरासमोर अनसूयतेची, अमात्सर्याची ढाल धरणें हा एकच इलाज आहे. मोठेपणाचा धडा आणि उदारतेचा बोध, उपदेशानें, प्रवचनानें किंवा टीकेनें दिला जात नाहीं. तो उदारतेच्या–मोठ्या मनाच्या, आर्यत्वाच्या प्रत्यक्ष आचरणानें–वस्तुपाठानेंच दिला जाऊं शकतो. म्हणूनच समाजहितैषी पूर्वजांनीं सांगितलें आहे कीं, लोभी माणसाविरुद्ध उदारता दाखवा, क्रोधी माणसाविरुद्ध नम्रता दाखवा, मूर्ख माणसाविरुद्ध अनाग्रह बाळगा आणि स्वच्छ माणसाला निखालसपणें जिंका.

आत्म्याच्या आठ गुणांत निर्मत्सरता किंवा अनसूयेचें महत्त्व अतिशय आहे. अनसूयेमधूनच सेवाधर्म जन्म घेतो, विकास पावतो आणि कृतार्थ होतो.

स्वच्छता :

सामाजिक किंवा वैयक्तिक जीवनांत जोंपर्यंत माणसांमधील स्वमान जागृत झालेला नाहीं तोंपर्यंत त्याच्यापासून कसलीच अपेक्षा राखतां

यावयाची नाहीं. स्वमान हा सर्व सामाजिक सद्गुणांचा पाया आहे. आणि हा स्वमान बाणविण्याचें प्रथम साधन म्हणजे आन्तर्बाह्य स्वच्छता होय. यालाच संस्कृतांत 'शौच' असें म्हणतात. शौच म्हणजे शुचिता.

जर एक मनुष्य स्वच्छ नसेल तर साऱ्या समाजाला त्याच्या गफलतीस बळी पडावें लागतें. एखाद्या गल्लींतील इतर सर्व घरें स्वच्छ असतील आणि जर एकच मनुष्य आपलें घर घाणेरडें ठेवीत असेल तर त्याची घाण सर्व गल्लीमध्यें पसरावयाचीच. जर एकाच्या घरीं महामारी सुरू झाली तर बिचारे दुसरे लोक स्वच्छ राहत असूनहि कमीअधिक प्रमाणांत महामारीला बळी हे पडावयाचेच. म्हणूनच प्रत्येक नागरिकाकडून कमींत कमी अमुक इतकी स्वच्छता पाळविण्याची सत्ता प्रत्येक नगरपालिकेला दिलेली असते. समूहामध्यें राहावयाचें असेल तर समूहाच्या अत्यंत आवश्यक अशा स्वच्छतेच्या कायद्यांचें पालन हें केलेंच पाहिजे. आपल्या येथें शिक्षणाचा श्रीगणेशाच शौचाचार शिकविण्यापासून होत असे. इतकें त्या गोष्टीचें महत्त्व आपल्या लोकांनीं मान्य केलें होतें.

तरीहि या बाबतींतील आपली व्यवस्था संपूर्ण किंवा निर्दोष होती असें आपण म्हणूं शकणार नाहीं. प्रत्येक जातीचा शौचाचार वेगवेगळा राहणें अपरिहार्य आहे; पण त्यांत कोणालाहि अमुक मर्यादेहून खालीं उतरूंच द्यावयाचें नाहीं असा नियम करावयास हवा होता. पण आपण तसें केलें नाहीं. उलट हीन समजल्या जाणाऱ्या जातींतलि लोकांनीं जर घाणेरडे कपडे वापरावयाचें सोडून स्वच्छ व टापटिपीचा पोषाख करण्यास सुरुवात केली तर त्यांचें स्वागत करण्याऐवजीं आपले लोक त्यांना दंडिण्यास सुरुवात करीत ! अमुक लोकांना उष्टें खाण्यास देण्यास हरकत नाहीं अशी समजूत रूढ करून आपण शौचाचाराच्या भावनेस बोथट करून टाकलें; व मनुष्यजातीचा अपमान केला. मागासलेल्या जाती या 'बालक-समाज' आहेत. त्यांच्या आचार-अनाचाराची जबाबदारी

आपल्यावर आहे; त्यांना घाणेरडें राहूं देऊन आपण संकटांत तर येऊन पडलोंच, पण त्याचबरोबर आपण आपली माणुसकीहि घालवून बसलों.

ज्यांना आगगाडीचा प्रवास करावयाचा असतो त्यांना हा शौचाचार साधारण जनतेंत पसरविण्याची किती आवश्यकता आहे याची कल्पना येऊं शकेल. माणूस जेव्हां बसण्याच्या जागींच थुंकतो, बिडी-काडी आंतच टाकतो, उष्टी, पुरी, भाजी, मिठाई किंवा चणेमुरमुरे आंत सांडतो, केळीं, संत्रीं वगैरे फळांच्या साली आंतच फेंकतो, आणि बघतां बघतां सबंध डबा 'अगोचर' करून टाकतो तेव्हां कांहींहि कारण नसतां नरक तयार करून त्यांत राहणाऱ्या समाजाविषयीं मनांत कोणता विचार येतो? मोठमोठ्या स्टेशनांवर रेल्वेच्या तर्फे झाडूवाल्याची व्यवस्था केलेली असते. त्यांना बोलावून डबा साफ करून घेण्याचा प्रत्येक उतारूला हक्क असतो. डबा स्वच्छ नसेल तर रेल्वेवाल्यांकडे तक्रार करण्याचा आपल्याला अधिकार आहे. (मला खूप प्रवास करावा लागतो. मोठ्या स्टेशनावर झाडूवाल्याला बोलाविलें आणि तो मिळाला नाहीं किंवा आला नाहीं असें क्वचित्च होतें. थोडीशी तसदी घेऊन त्याला शोधावें लागतें हें मात्र खरें!) जर रेल्वेकडून अशी सोय करण्यांत येईल कीं ज्याप्रमाणें पाणीवाला 'पाणी, पाणी' म्हणून ओरडत एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत जातो त्याप्रमाणें झाडूवाल्यानेंहि 'झाडू, झाडू' म्हणून ओरडत प्लॅटफॉर्मवर फेऱ्या माराव्यात, तर लोक त्याचा जास्त फायदा घेतील आणि लोकांना एक मौल्यवान् शिक्षण दिल्याचें श्रेय रेल्वेवाल्यांना मिळेल.

सार्वजनिक शौचकूप, सार्वजनिक विहिरी आणि सार्वजनिक उकिरडे यांच्यावर खास देखरेख ठेवणारे लोक हे हवेतच. तळ्याच्या कांठीं किंवा नदीच्या किनाऱ्यावर लोक शौचास बसतात, हें बंद झालेंच पाहिजे. त्यासाठीं खास माणसें ठेवण्याची आवश्यकता आहे. तळ्यांतील

घाणेरडें पाणी पिण्यानें नारूसारखे जे भयंकर रोग होतात त्यांना आपण प्रतिबंध करूं शकतों. गुजराथेंत गांवोगांवीं जीं तळीं आहेत त्यांची स्थिति सुधारण्याचा विडा आमच्या स्वयंसेवकांनीं उचलला पाहिजे. गांवोगांवीं गोधड्या आणि पासोड्या धुण्याची सोय, वाफेच्या भट्ट्यांवर कां करतां येऊं नये ? तसेंच शहरांमध्यें जिकडे तिकडे उष्टें फेंकण्याचा जो रिवाज आहे त्याचा बंदोबस्त शक्य तितक्या लवकर केला पाहिजे.

आपल्या शास्त्रकारांनीं शौचाचे दोन विभाग केले आहेत : बाहेरील स्वच्छता आणि आंतील स्वच्छता. ज्याप्रमाणें पाण्याची स्वच्छता ठेवली पाहिजे त्याप्रमाणें वाणीचीहि स्वच्छता बाळगिणें हें समाज-स्वास्थ्याच्या दृष्टीनें महत्त्वाचें आहे. घाणेरड्या भाषेचा शौक जगांत सगळीकडे आहे. अमुक मर्यादेच्या खालीं उतरून पहा म्हणजे तुम्हांला घाणेरडे शब्द, अश्लील म्हणी, अचकटविचकट शिव्या व घाणेरडीं वर्णनें निःसंकोचपणें वापरलीं जात असलेलीं दिसून येतील. कांहीं प्रांतांत हा दोष जास्त आहे. आपल्या बऱ्याचशा समाजसेवकांनीं जेलचा अनुभव घेतलेला आहे. तेथें, कैदी, त्यांच्यावर देखरेख ठेवणारे पोलीस व पुष्कळ वेळां जेलचे अधिकारी लोक जी भाषा निःसंकोचपणें वापरतात ती ऐकून माणसाच्या अंगावर शहारे येतात. माणसाचा स्वमान मोडून काढण्याचा इलाज म्हणून गलिच्छ शिव्यांचें वातावरण निर्माण करणें खूप परिणामकारक असतें असें म्हणतां येईल. मनुष्य जेव्हां तोंडांतून शिवी काढतो तेव्हां ज्याला ती शिवी दिली गेलेली असते त्याचा तर तो अपमान करतोच पण शिवाय जितक्या लोकांच्या देखत तो ती शिवी देतो त्या सर्वांचाहि तो अपमान करीत असतो, या गोष्टीकडे आपलें ध्यान गेलें पाहिजे. शाळेंत किंवा गल्लीमध्यें जेव्हां मुलें शिव्या उच्चारितात तेव्हां वडीलधाऱ्या माणसांनीं जर त्यांना घाणेरडें तोंड धुऊन येण्यास किंवा चूळ भरून येण्यास सांगितलें तर त्याचा चांगला परिणाम होतो असा अनुभव आहे.

शौचाचाराच्या पालनासाठीं मनांतील घाणहि काढून टाकणें जरूरीचें आहे. मनांतील घाणीमुळें सामाजिक जीवन किती संकुचित, विषम आणि विषमय होतें याचा भरपूर अनुभव येत असूनहि मनुष्य त्याविरुद्ध कांहीं करूं शकत नाहीं ही किती लाचारीची स्थिति आहे बरें !

माणसांमाणसांमधील वर्तन कठोर किंवा असंस्कारी असूं नये हें खरें, पण केवळ औपचारिकता राखण्यासाठीं जर आपण मनमोकळेपणा घालवून बसूं तर तो एक मोठा सामाजिक अधःपात होईल. शिष्टाचार, औपचारिकता वगैरे गोष्टी मनमोकळेपणाच्या पडद्यावरील वेलबुट्टी म्हणूनच शोभतात.

आपल्याकडील शिष्टाचारांचे किंवा सामाजिक औपचारिकतेचे जे नियम बनविले गेले होते त्या वेळची परिस्थिति सध्यां राहिलेली नाहीं. यामुळें आज हे नियम पुष्कळदां किळसच उत्पन्न करतात. जसजसा काळ बदलत जातो तसतसे शिष्टाचाराचे नियमहि बदलले पाहिजेत.

आंतर्बाह्य स्वच्छता, मनमोकळेपणा आणि सत्याचार हीं शौचाचीं प्रमुख लक्षणें आहेत. त्यांच्या आधारेंच आपलें सामाजिक जीवन स्वच्छ वाहणार आहे.

अनायास :

व्यक्तीच्या दृष्टीनें पाहिल्यास समाज हें तिचें ब्रह्म होय. सामाजिक सद्‌गुण बाणविल्यानें व्यक्ति आपल्या समाजब्रह्माशीं सायुज्य अनुभविते, असें आपल्या धर्मकारांनीं सांगितलें आहे. ज्या व्यक्तीवर सर्व प्रकारचे सामाजिक संस्कार झाले आहेत आणि जिनें सर्व आत्मगुण आत्मसात् केले आहेत ती व्यक्ति सामाजिक ब्रह्माशीं सायुज्य प्राप्त करते. (यस्य ते चत्वारिंशत् संस्काराः अष्टौ आत्मगुणाश्च स ब्रह्मणः सायुज्यं आप्नोति।)

आपल्या सामाजिक जीवनाविषयींचें हें सूत्र येथें अशासाठीं पुनः उद्धृत केलें आहे कीं, तें ध्यानांत ठेवल्याशिवाय अनायास या सामाजिक सद्‌गुणाची महत्ता ध्यानांत यावयाची नाहीं.

ब्रह्म शब्द बृहत् (= मोठें) या शब्दावरून आलेला आहे. व्यक्ती-पेक्षां कुटुंब मोठें; व्यक्तींचें ब्रह्म हें कुटुंब होय. कुटुंबांहून जात मोठी; जात हें कुटुंबांचें ब्रह्म होय. जातीच्या तत्त्वापेक्षां वर्णाचें तत्त्व अधिक व्यापक आहे. आणि वर्ण विराट् पुरुषाचें अंग आहे. म्हणून हें सर्व उत्तरोत्तर ब्रह्म आणि परब्रह्म होतात. घराहून गांव मोठें, गांवाहून प्रांत मोठा, प्रांताहून देश मोठा, देशाहून पृथ्वी मोठी व पृथ्वीहून विश्व मोठें. याप्रमाणें विभूती या उत्तरोत्तर वाढत जातात. या विभूतींत तन्मय किंवा तल्लीन होऊन जाणें, एकरूप होऊन जाणें हेंच सायुज्य होय. हें सायुज्य साधल्यानंतर 'स्वार्थ कीं परार्थ' असा झगडा मनांत राहत नाहीं. कारण परमार्थामध्यें या दोहोंमधील विरोध विरघळून जातो. (आपल्या लोकांनीं परमार्थ म्हणजे परलोकप्राप्तीसाठीं द्यावयाचें दान, किंवा करावयाचें पुण्य, असा विनाकारण संकुचित अर्थ केला आहे. परमार्थ म्हणजे ज्यांत सर्वांचें कल्याण होतें असा सर्वार्थ.)

आतां आपण अनायास म्हणजे काय हें पाहूं. आयास म्हणजे श्रम, कष्ट; धांवपळ. हें न करणें तो अनायास. पुष्कळांना वाटेल कीं, जेव्हां आपण आपल्या समाजांत घर करून बसलेल्या आळसाला व जडतेला मुळासकट काढून टाकूं इच्छीत आहोंत, जेथें तेथें उद्योगाचें वातावरण निर्माण करूं इच्छीत आहोंत अशा वेळीं अनायासाची शिफारस सामाजिक सद्गुण म्हणून कशी बरें करण्यांत येत आहे ? ज्या काळीं 'फार आयास-मेहनत करूं नका, अनायास हा आत्म्याचा गुण आहे', असें सांगण्याची जरूर भासली असेल असा तो कसला काळ असेल बरें ?

आयास म्हणजे उद्योगिता नव्हे, तर अस्वस्थ चित्तानें केली जाणारी व्यर्थ धांवपळ होय. आपण नेहमीं पाहतों कीं, घरीं अचानक पाहुणे आले असले कीं कांहीं बायकांची किती धांदल उडते ! त्या असें एक वातावरण निर्माण करून टाकतात कीं जणूं काय फार मोठें काम शिरावर येऊन पडलें आहे आणि आकाशपाताळ एक करून

टाकल्याशिवाय तें पुरेंच होणार नाहीं ! याच्या उलट दुसऱ्या कांहीं संस्कारी व हुशार बायका इतक्या कांहीं व्यवस्थित असतात कीं जणूं काय आपण विशेष कांहींच करीत नाहीं अशा प्रकारें शांत चित्तानें एकीकडे बोलतहि असतात आणि दुसरीकडे मनांत योजिलेल्या पद्धती-प्रमाणें भराभर कामेंहि उरकीत असतात. व सगळें काम आवरून जणूं काय पुष्कळ वेळ वांचला असावा अशा प्रकारें नव्या योजना बनवितात किंवा पाहुण्यांना गप्पागोष्टींत गुंतवून प्रसन्न ठेवतात. आयासामध्यें एक प्रकारचा माथेफिरूपणा असतो. इंग्रजीमध्यें ज्याला 'फसिनेस' असें म्हणतात तो आयास होय. अनायासासाठीं इंग्रजीमधील 'ईज' किंवा 'रिपोझ' हे शब्द वापरतां येतील.

ज्याच्यापाशीं साऱ्या समाजाचा विचार आहे, समाजव्यवस्था काय आहे, समाजव्यापार कसा चालतो, समाजहिताच्या दृष्टीनें कोणतें महत्त्वाचें व कोणतें व्यर्थ आहे याची कल्पना ज्याच्याजवळ आहे, तात्कालिक दृष्टीनें महत्त्वाच्या वाटणाऱ्या कित्येक गोष्टी तो काळ निघून जातांच अगदीं क्षुद्र बनून जातात हें सर्व जो ओळखतो, उत्तेजनाच्या कैफांत जो आपलें स्थैर्य घालवून बसत नाहीं त्याच्या हातून समाजाचें कल्याण होतें. अशा माणसाला कोणी 'हसल' (डावलणें) करूं शकणार नाहीं. अनायास हें सत्त्वगुणाचें लक्षण आहे. सत्त्वगुणी मनुष्य अखंड, अविरत उद्योगांत मग्न असूनहि आपली शांति गमावीत नाहीं. नदीच्या शांत वेगाप्रमाणें त्याची प्रगति चालूच राहते. नदी खालीं जात असते; सत्त्वगुणी मनुष्य वर चढत असतो. (उर्ध्वं गच्छन्ति सत्त्वस्थाः।) रजोगुणी मनुष्य पुष्कळ धांवपळ करून स्वतः अस्वस्थ होतो, दुसऱ्यांना अस्वस्थ करून सोडतो, भाराभर मेहनत करतो आणि तरीहि शेवटीं जेथल्या तेथेंच राहतो. (मध्ये तिष्ठन्ति राजसाः।)

इंद्रियांच्या प्रेरणेनें जें प्रेरिलें जातें त्यांत आयासाचें तत्त्व वाढतच असतें. असे लोक परस्परविरोधी अशा असंख्य प्रवृत्ती करितात.

ते आज जें रचतात तें त्यांना उद्यां मोडावें लागतें, आज उपाय म्हणून ज्याचा अवलंब करितात तोच अपाय आहे असें उद्यां अनुभवास आलें कीं मग ते गोंधळांत पडतात, रोगासाठीं म्हणून ते जें औषध घेतात त्या औषधाचा वाईट परिणाम काढून टाकतांच ते गडबडतात. जे आत्म्याच्या प्रेरणेनें प्रेरिलेले असतात, सर्वोदयाचा विचार करितात ते शुष्क विग्रहापासून दूर राहतात, विनाकारण तंटे उपस्थित करीत नाहींत; सर्वांचें भलें इच्छून शांत प्रगति साधतात; कारण त्यांची प्रवृत्ति आंधळी, एकांगी, संकुचित किंवा परस्पर-विनाशक नसते. पोहावयास शिकणारा नवा मनुष्य पाण्याचा स्वभाव न जाणल्यामुळें पाण्यांत हात मारून मारून थकून जातो. तो असें समजतो कीं, पाण्याशीं महायुद्ध करावयाचें आहे. परंतु ज्याला पोहावयास येतें असा मनुष्य पाण्याचा आणि आपला स्वभाव ओळखून कमींत कमी दमून जास्तींत जास्त पोहण्याचा आनंद अनुभवितो आणि जरूर पडल्यास दुसऱ्यांनाहि तारतो. अनायास ही ज्ञान व कर्म यांची परिपक्वता आहे. ज्या माणसाचा स्वार्थ नाहींसा झाला आहे, सर्वार्थासाठींच जो जगत असतो अशा समाजपुरुषाच्या जीवनांत अनायासाची शांति, संतोष आणि सार्थकता हीं आपोआपच प्रगट होतात.

अस्पृहा :

दुसऱ्याच्या वस्तूचा लोभ न धरणें ही अस्पृहा होय. कोणाला असें वाटेल कीं, 'जो लोभी आणि चोर असेल तोच दुसऱ्याच्या वस्तूकडे वाईट नजरेनें पाहील. जो माणूस सर्वसामान्य पतवाला आहे, सज्जन आहे, इमानी आहे, तो दुसऱ्याच्या वस्तूला शिवत देखील नाहीं. तर मग अस्पृहेला सामाजिक सद्गुणांत किंवा आत्म्याच्या गुणांत इतकें अगत्याचें स्थान कशासाठीं दिलें असावें ? समाजामध्यें चोर आणि ठक लोकांची संख्या जास्त असत नाहीं म्हणून समाज टिकला आहे व चालला आहे.'

समाज टिकला आहे यांत कांहीं शंका नाहीं. पण तो 'चालला' आहे असें जर आपण मानीत असूं तर ती आपली भूल आहे. समाज चालत आहे असें आपण तेव्हांच म्हणूं शकूं कीं जेव्हां समाजांत मिसळलेल्या सर्व वर्गांचें हित बरोबर रक्षिलें जात असेल, कोणी कोणावर अन्याय करीत नसेल, कोणी कोणाच्या डोक्यावर चढून बसत नसेल, सर्वच लोक एकमेकांना आपापली उन्नति करण्यास मदत करीत असतील. परंतु जेव्हां समाजाचा अमुक भाग इतर सर्वांना आपल्या ताब्यांत ठेवतो, किंवा युक्तिप्रयुक्तीनें त्यांच्यावर वर्चस्व गाजवितो व त्यांच्या मेहनतीचें फळ स्वतःच उपभोगितो तेव्हां अशा जुलमी लोकांचें तर व्यवस्थित चालतें पण सगळ्या समाजाचें व्यवस्थित चाल्ह आहे असें मात्र मुळींच म्हणतां यावयाचें नाहीं. माणसानें जर आपले हातपाय तोडून खाल्ले तर थोड्या वेळापुरतें त्याचें पोट भरेल याविषयीं मुळींच शंका नाहीं. पण तसें केल्यानें शरीर 'चाललें' असें कांहीं म्हणतां येणार नाहीं.

कायद्यानें अमुक एका प्रकारच्या व्यवहाराला चोरी म्हणावयाचें असें नक्की ठरविलें आहे. तशा प्रकारचा व्यवहार करणाऱ्याला कायदा शासन करतो व समाज त्याचा तिरस्कार करतो. परंतु आजच्या सामाजिक व्यवस्थेच्या मुळाशींच जो अन्याय राहिलेला आहे त्याला समाजांतील शक्तिशाली लोकांचा पाठिंबा आहे व त्यांच्याच हातांत कायदे पास करण्याची सत्ता असल्यामुळें या अन्यायाला कायद्याचाहि टेकू मिळतो. जे लोक असें मानतात कीं, समाजाचें सारें तंत्र कायद्यावर अवलंबून असतें ते या खटपटींत असतात कीं, कायदा बनविण्याची सत्ता बहुजन-समाजाच्या हातीं यावी आणि जगांतील सगळी संपत्ति व्यक्तीच्या हातीं न राहतां समाजाच्या हातीं राहावी.

दुसरा एक वर्ग असा आहे कीं जो, सामाजिक अन्यायाचें मूळ शोधीत शोधीत कायद्यापर्यंतच जाऊन थांबत नाहीं. तो म्हणतो कीं,

जोंपर्यंत माणसामध्यें परक्याची वस्तु आपली करण्याची दानत आहे, दुसऱ्यांच्या परिश्रमाचा गैरफायदा घेण्याची धूर्तता आहे, तोंपर्यंत असे लोक वाटेल तो कायदा आणि वाटेल ती समाजव्यवस्था गिळंकृत करावयाचे. म्हणून माणसांमध्यें—सर्व समाजामध्यें—पसरलेला स्पृहेचा रोग आधीं नाहींसा केला पाहिजे. कायदे सुधारले, समाजव्यवस्थेची पुनर्घटना केली तर त्यास त्याची हरकत नाहीं; पण तेवढ्यानें समाज सुखी होईल किंवा 'चालेल' असें समजण्याची चूक लोकांनीं करूं नये, असें तो सांगत असतो.

कित्येक खादाड लोक शरीर जितकें पचवूं शकेल त्याहून जास्त खातात. ते दुसऱ्याच्या वांटणींचें खातात हा दोष तर आहेच; पण ते दुसऱ्यावर जितका अन्याय करतात त्याहून स्वतः आपल्यावर कांहीं कमी अन्याय करीत नाहींत. खादाड माणसाच्या एकलपोटेपणामुळें एकीकडे त्याचा भाऊ उपाशी राहील तर दुसरीकडे स्वतः त्या खादाडाला नाना प्रकारच्या रोगांना बळी पडावें लागेल. समाजामध्यें जे वर्ग वरील खादाड माणसाप्रमाणें आपल्या जवळची संपत्ति वाढवीतच जातात ते समाजाला शापरूप होतातच, पण स्वतःहि रोगी बनतात. आरोग्याची शक्ति, आरोग्याचा संतोष आणि आरोग्यामधून मिळणारें दीर्घायुष्य या तीन लाभांपासून ते वंचित राहतात. पचेल तेवढें अन्न, बाकीचें सगळें विष, हें जसें माणसाला समजतें त्याचप्रमाणें माणसाला जेव्हां हें समजूं लागेल कीं, जास्त मेहनतीनें मिळविलेली संपत्ति हीच तेवढी जिवंत संपत्ति व बाकीची मुरदाड संपत्ति होय आणि ज्या संपत्तीचा सदुपयोग समाजासाठीं होतो तेवढीच पौष्टिक व बाकीची विषारी संपत्ति होय, त्याच दिवशीं समाजाची स्थिति सुधारेल. यासाठीं लोकांची जीवनाविषयींची कल्पना सुधारली पाहिजे. सुख, दुःख, लाभ, हानि, यांविषयींची आपली कल्पनाच विकृत आहे; आणि म्हणून न्याय-अन्यायाविषयींची आपली भावना बोथट झाली आहे. देशांतील खासगी मिळकतीस

सामाजिक बनविण्यापूर्वी लोकांचीं हृदयें आणि त्यांच्या भावना सामाजिक बनविल्या पाहिजेत. म्हणूनच स्मृतिकार गौतमानें आत्म्याच्या आठ गुणांना आवश्यक गणलें आहे आणि त्यांत अस्पृहेला स्थान दिलें आहे.

जातपात मानणारे लोक दुसऱ्याच्या हातचें न खाण्याचा आग्रह कसोशीनें पाळीत असतात. जर सगळे लोक दुसऱ्याच्या कष्टाचें–फुकटचें–न खाण्याचा धर्म इतक्याच कसोशीनें पाळतील तर जगांतील पुष्कळसे तंटे मिटतील. 'आहार शुद्ध असेल तर चारित्र्यशुद्धि राखतां येईल,' हें वचन पावलोपावलीं उद्धृत करणारे लोक जर इतकें समजतील कीं, प्रामाणिक भाजी-भाकरी हाच अत्यंत शुद्ध आहार आहे, तर मेहनतमजुरी करणाऱ्या ईश्वराच्या लेकरांच्या घरीं दररोज एकादशी व महाशिवरात्र करण्याची पाळी येणार नाहीं.

जर नुसती एकटी स्पृहा नाहींशी होईल तर सत्ययुग येण्यास फार वेळ लागावयाचा नाहीं. कारण मग फारसे कायदेहि करावे लागणार नाहींत; आणि जनतेकडून सक्तीनें असे कायदे पाळविण्याचीहि जरूरी उरणार नाहीं. आणि कायदे करावयाचेच असतील तर ज्यांनीं अंगीं अस्पृहा बाणविली असेल असे लोक कधींहि अशा कायद्यांना विरोध करणार नाहींत. जेव्हां लोकमताला वळण लावलें जाईल तेव्हांच खरे कायदे करतां येतील.

आणि जेव्हां समाजांतून गलिच्छ स्पृहा निघून जाईल तेव्हां धनाचा संग्रह करण्याची किंवा तें पुरून ठेवण्याची वृत्तिहि कमी होईल. एक सद्गुण आत्मसात् केला कीं, त्याच्याबरोबर दुसरे सद्गुण हे यावयाचेच आणि त्याचें पालनहि सुलभ व्हावयाचें.

अकार्पण्य :

कृपण म्हणजे कंजूष, संकुचित मनाचा, कृपेस पात्र. उपनिषदामध्यें एके ठिकाणीं सर्व मानवजातीचे दोन विभाग कल्पिले आहेत : कृपण

आणि ब्राह्मण. जो ब्रह्मपरायण आहे तो ब्राह्मण; ब्रह्म शब्द बृहत्वरून आला आहे. बृहत् म्हणजे मोठें, विशाळ, सर्वव्यापी, आपल्या पोटांत सर्व विश्वाचा समास (समावेश) करणारें. उपनिषद्कारांनीं हें पाहिलें होतें कीं, जगामध्यें जे उदार आहेत, दिलदार आहेत, मोठ्या मनाचे आहेत, प्रेमानें सगळ्या विश्वाला आपलें समजणारे आहेत, त्यांचें जीवन एक प्रकारचें असतें. आणि जे संकुचित मनाचे आहेत, आपल्याच शरीराची काळजी घेणारे आहेत, आपली गरज–व तीहि चालू क्षणापुरतीच– पाहणारे आहेत, ते समाजावर भाररूप होतात. 'कोणी तरी मनामध्यें दया आणून आमचें ओझें उचलील का ?' याचीच ते वाट पाहत बसलेले असतात. असे जे कृपेचे याचक ते कृपण. त्यांचा जीवनक्रम समाजाला फायदेशीर होत नाहीं. म्हणूनच कृपणतेच्या अभावास सामाजिक गुणांमध्यें दाखल केलें आहे.

कृपण माणसांचीं लक्षणें दोन. जेथें आपलें ओझें स्वतः उचलण्या-सारखें असेल, तेथेंसुद्धां दुसऱ्याच्या मदतीची अपेक्षा बाळगणें किंवा सगळें काम दुसऱ्यांनींच करून द्यावें अशी इच्छा करणें; आणि दुसऱ्या बाजूस जेव्हां दुसऱ्याला मदत करण्याचा प्रसंग येतो, 'देशे, काले व पात्रे' चांगल्या कामासाठीं दान द्यावयाचा प्रश्न निघतो तेव्हां मन संकुचित करून हात पुढेंच न करणें. समाजामध्यें या दोन्ही वृत्ति अशुभ आहेत, सामाजिक जीवनाला सुकविणाऱ्या आहेत. कंजूष मनुष्य कृतघ्न हा असावयाचाच. आणि समाजामध्यें एकदां कंजूषपणाचें वातावरण पसरलें कीं उदार हृदयाचीं माणसेंहि हळू हळू निरुत्साही होतात व सगळीकडे संकुचित मनच पसरतें. संकुचित मन असलेल्या समाजांत प्रत्येक व्यक्ति हुषार आणि उद्योगी असली तरीहि सबंध समाजाचा उत्कर्ष होत नाहीं हें आपल्याला माहीत आहे.

ज्या घराचा पाया घराच्या शिखराइतकाच रुंद असतो तें घर वाटेल तेवढें भक्कम बांधविलें असलें तरी तें कोसळण्याचा खूपच संभव असतो.

शिखरापेक्षां घर रुंद असलें पाहिजे, घरापेक्षां त्याचा ओटा रुंद असलाच पाहिजे. व पाया तर त्याहूनहि रुंद असला पाहिजे. कपडा शिवण्याच्या वेळीं आपण अगदीं कांठावर शिवत नाहीं, थोडीशी 'माया' ठेवणें जरूरीचें असतें. शिवावयाच्या वेळीं 'माया' ठेवूनच टीप मारावी लागते. जीवनांतहि प्रत्येक व्यवहारांत अशी माया ठेवावीच लागते. जर ही माया नसेल आणि मनुष्य अगदीं कंजूष होईल तर समाज चालणारच नाहीं. प्रत्येक व्यवहाराचा पाया हिशेबाहून थोडासा जास्त रुंद ठेवणें हेंच अकार्पण्य होय.

जर प्रत्येकजण तराजू घेऊनच बसेल तर पावलोपावलीं कोर्टांत जावें लागेल. आणि समाजाचा सगळा व्यवहार कोर्टामार्फतच करावयाची पाळी येईल. जर असें झालें तर समाजाची काय स्थिति होईल याची कल्पना करणें कांहीं कठीण नाहीं.

मांगल्य :

सर्व सामाजिक सद्गुणांमध्यें अनुस्यूत (गुंफिलेला) असा आर्य आत्मगुण म्हणजे मांगल्य होय. मांगल्याची व्याख्या करणें अवघड आहे. मांगल्य कोठें आहे आणि कोठें नाहीं हें सांगणें कठिण आहे. मांगल्याचा सुवास कोणत्याहि एका खास क्रियेंत प्रत्ययास येत नाहीं, तर तो सगळ्या वातावरणांत दरवळत असतो. मांगल्य आणि आस्तिक्य ही एकच गोष्ट आहे. आत्मा आहे या जाणिवेनें ज्याप्रमाणें सारें जीवन उद्दीपित होतें, ईश्वर आहे या श्रद्धेनें ज्याप्रमाणें विश्वसंस्था यथायोग्य बनते त्याचप्रमाणें मांगल्य-वृत्तीनें जीवन सार्थ व समाधानरूप होतें. आत्मा आहे याचा अर्थ तो सर्वव्यापी आहे, सर्वांच्या अंतःकरणांत स्फुरत असतो, आत्मा प्रेमस्वरूप आहे यामुळें शेवटीं जगांतील विग्रह नाहींसाच होणार आहे; दुष्टांत दुष्ट मनुष्य देखील शेवटीं सज्जन होणार आहे; जग हें दररोज जास्त जास्त बिघडत जात असलें तरी अंतीं

अथवा अनंतीं तें सर्व साफ-स्वच्छ व्हावयाचें आहे आणि शांति, समता, परस्पर प्रेम आणि विश्वात्मैक्यभाव हीं सर्वत्र प्रस्थापित व्हावयाचींच आहेत. अनंत विविधता असूनहि विश्वव्यापी ऐक्य कोठेंहि खंडित होत नाहीं-अशा प्रकारच्या श्रद्धेलाच आपण मांगल्य असें म्हणतों. ज्याप्रमाणें आपलीं आर्य नाटकें शेवटीं सुखपरिणामीच होतात आणि भरत वाक्यामध्यें विश्वकल्याणाची भावनाच गर्जना करते, त्याप्रमाणें हें विश्वलीलेचें नाटकहि सर्व कल्याणाच्या दिशेनेंच वाहत असतें, अशा प्रकारची जी श्रद्धा तें मांगल्य होय. पाप उद्भवतें तें त्याचें निर्मूलन होण्यासाठीं; गैरसमज होतात ते दिलसफाईच्या आनंदासाठीं; उन्हाळ्यामध्यें धरती तापते ती आकाशांतील पाऊस खेंचून घेऊन वनस्पतिसृष्टीला उगविण्यासाठीं; मनुष्य स्वार्थी बनतो तो तशा प्रकारच्या जीवनाच्या वैफल्याची खातरी करून घेण्यासाठीं; परमात्मा अनेक रूपांनीं प्रगट होतो तो आपल्या अखंड एकतेचा अनुभव घेण्यासाठीं हें ज्याच्या मनावर पूर्णपणें बिंबलें आहे त्याच्या हृदयाच्या शांतीचा भंग कोण करूं शकेल? समुद्र आटेल, पर्वतांचा चुराडा होऊन जाईल, ध्रुवहि आपल्या स्थानापासून ढळेल, पण मांगल्यावर श्रद्धा असलेल्याची शांति ढळणार नाहीं. याचेंच नांव आस्तिकता. अशा तऱ्हेची जिवंत आस्तिकता जर एकाहि माणसानें अंगीं बाणविली तर तितक्या अंशीं समाज एकदम वर चढतो. आत्मनिष्ठा, मांगल्यावरील निष्ठा हें सामाजिक कल्याणाचें मोठ्यांत मोठें भांडवल होय. आज समाज जो इतका पीडिला जात आहे त्याचें कारणच हें कीं, माणसाच्या हृदयामधून जिवंत आत्मनिष्ठा जवळ जवळ लुप्त झालेली आहे. समाजाचा उद्धार करण्यासाठीं, समाजाचें स्वास्थ्य पुनरपि प्रस्थापित करण्यासाठीं, उठल्याबसल्या समाजरचना बदलून टाकण्याऐवजीं, क्षमा, दया, अनसूया, अकार्पण्य, दान, शौच, अस्पृहा इत्यादि आर्य सद्गुण मांगल्यावरील श्रद्धेनें अंगीं बाणविल्यास मनुष्यजात सुखी होईल, तिच्या सर्व

शक्ती हां हां म्हणतां विकसित होतील आणि मग वाटेल ती रचना असली तरी ती सोयीस्कर व समाधानकारक वाटूं लागेल.

आपल्या देशांत एके काळीं गोत्रें लढलीं, वंश लढले, त्यानंतर धर्म आणि पंथ लढले, मग पाळी आली जातींची. जेव्हां राष्ट्रसभेची स्थापना झाली तेव्हांपासून पक्ष पडले व त्यांच्यांत झगडे चालू झाले. आणि आतां तर आर्थिक हितसंबंधांप्रमाणें समाजाचे वर्ग पाडून विग्रह चालविण्याच्या सूचना होत आहेत. 'जुनीं भांडणें खालच्या दर्जाचीं व अशास्त्रीय होतीं. आमचा लढा उच्च भूमिकेवरील नि सशास्त्र आहे.' असें सर्वच नवे लढवैय्ये सांगत असतात. पण जर आपण भांडणतंटे सोडून सर्वसमन्वयाची प्रवृत्ति अंगीकारूं तर सर्वच शास्त्रें कृतार्थ होतील. अन्यायाविरुद्ध नेहमींच लढावयाचें असतें. उपासमार, रोग, अज्ञान, लोकभ्रम, हुकूमशाही वगैरे प्रत्येक शत्रूच्या विरुद्ध लढावयाचें असतेंच, पण या लढ्यासाठीं कोणत्या प्रकारच्या वृत्ती आपण बाणवूं यावरच सर्व आधार असतो. माणसाची जर मांगल्यावर निष्ठा असेल, तर आपण ज्याचा विरोध करीत आहोंत त्याचें देखील कल्याणच व्हावें अशा प्रकारें मनुष्य लढेल आणि लढ्याच्या शेवटीं दोघांना संतोष होऊन त्यांच्यामध्यें कौटुंबिक भावना प्रस्थापित होईल. विग्रहाच्या अखेरीस या किंवा त्या पक्षाचा नाश करण्याऐवजीं जर आपण विग्रहाच्या तत्त्वांचाच नाश करूं शकूं तर लढणें सार्थकीं लागलें असें समजतां येईल. ज्यामुळें पुनःपुनः लढावें लागेल अशा लढ्याचें काय फळ ?

अलंकारिक भाषेंत बोलावयाचें म्हणजे गरीब गाय आणि तिला मारून खाणारा क्रूर वाघ या दोहोंत एकच आत्मतत्त्व आहे आणि दोघेंहि विकासाकडेच प्रयाण करीत असतात. वाघाच्या स्वभावांत फेरफार होण्याची जितकी आवश्यकता आहे तेवढीच गाईच्या स्वभावांतहि परिवर्तन करण्याची जरूर आहे. असें परिवर्तन होणें शक्य आहे आणि

हें झाल्यानंतर गाईचें जीवन आणि वाघाचें जीवन हीं परस्परानुकूल होतील अशा प्रकारचा विश्वास हीच मांगल्यावरील श्रद्धा.

ज्याप्रमाणें अंतिम साध्याविषयींची अचल श्रद्धा हा मांगल्याचा स्वभाव आहे, त्याप्रमाणें साधनांविषयींची अशीच दृढ श्रद्धा मांगल्य-वृत्तीमधून उत्पन्न होते. आत्मगुण अंगीं बाणविल्यानंतर या गुणांना अनुरूप अशींच साधनें आपण वापरूं शकूं. हीं साधनें पाशवी किंवा स्थूल नसल्यामुळें त्यांच्या योग्यतेविषयीं आणि परिणामकारकपणाविषयीं सामान्य मनुष्य पुष्कळ वेळां साशंक असतो. ज्याची मांगल्यावर श्रद्धा आहे असा मनुष्य साधनांविषयीं साशंक राहावयाचा नाहीं. आणि थोड्याशा प्रतिकूल अनुभवांवरून निराश होऊन तो त्यांचा त्याग करणार नाहीं.

आतां ही मांगल्यवृत्ति कशी बाणवावयाची ? तिच्यासाठीं एखादी साधना नाहीं कीं एखादा अभ्यासक्रम नाहीं. मांगल्यवृत्तीचाच शेवटीं विजय आहे, हें शाबित करण्याइतका पुरावा मनुष्यजातीजवळ अजून जमाहि झालेला नसेल. मांगल्यावरील श्रद्धा ही ईश्वराची एक देणगी आहें. जर एका माणसांत ही श्रद्धा खरोखरीच जागृत झाली, जिवंत झाली, तर कधीं कधीं ती सहवासानें संसर्गाप्रमाणें दुसऱ्या माणसांत संक्रांत झालेली पाहण्यांत येते. कधीं कधीं ती सखोल चिंतनामधून माणसाला अचानक स्फुरते. अरणीचीं दोन लांकडें एकमेकांवर घांसलीं असतां त्यांच्यांतून ज्याप्रमाणें एकाएकीं धूर व अग्नि हीं उत्पन्न होतात त्याप्रमाणेंच सात्त्विक वृत्तीच्या माणसाच्या मनोमंथनामधून हीं जिवंत श्रद्धा उफाळून वर येते. आणि मग जेव्हां समाजाचा उद्धार व्हावयाचा असतो तेव्हां दावानलाप्रमाणें ती दोही दिशांना पसरते. तसेंच सामाजिक दोषांचीं व नास्तिकतेचीं सर्व जंगलें ती जाळून टाकते. मग मनुष्यजात आपल्या नेहमींच्या स्वभावाहून उच्च भूमिकेवर जाऊन लोकोत्तर पराक्रम करून दाखविते आणि मग नव्या युगास सुरुवात होते.

आत्मगुणांचा समाजव्यापी विकास हेंच सामाजिक उद्धाराचें अमोघ साधन होय. त्या विकासामधूनच त्या त्या काळासाठीं अनुकूल अशी समाजरचना माणसाला सांपडते. समाजरचनेंत फेरफार करण्यानें व सत्तेची विभागणी पुनःपुनः नव्यानें केल्यानें उत्साह टिकेल, नवे नवे अनुभव मिळतील, पण मांगल्याकडे प्रगति मात्र होणार नाहीं.



संयमामध्यें संस्कृति : : : २

संयम हें संस्कृतीचें मूळ आहे. दुर्बलतेच्या, विलासितेच्या किंवा अनुकरणाच्या वातावरणांत कधींहि संस्कृतीचा उदयहि होत नाहीं व विकासहि होत नाहीं. पंचवीस वर्षेपर्यंत ब्रह्मचर्य पाळणाऱ्याची संतति ज्याप्रमाणें सुदृढ असते त्याप्रमाणें संयमानें निर्माण झालेली संस्कृति प्रभावशाली व दीर्घजीवी असते.

ऋषींनीं तप आणि ब्रह्मचर्य यांच्या द्वारें मृत्यूवर विजय मिळवून एका अमर संस्कृतीला जन्म दिला. बुद्धकालीन भिक्षू आणि भिक्षुणी यांच्या तपश्चर्येच्या योगें अशोकाच्या साम्राज्याचा व आर्य संस्कृतीचा विस्तार होऊं शकला. शंकराचार्यांच्या तपश्चर्येनें हिंदुधर्माचें संस्करण झालें. महावीर स्वामींच्या तपामुळेंच अहिंसाधर्म पसरला, साधें आणि

संयमी जीवन ठेवूनच शीख गुरूंनीं पंजाबांत जागृति केली. त्यागाच्या झेंड्याखालींच साध्यासुध्या मराठ्यांनीं स्वराज्य स्थापिलें. बंगालचे चैतन्यमहाप्रभु मुखशुद्धीसाठीं अधिक हिरडेसुद्धां ठेवीत नसत. यामधूनच बंगालची वैष्णव संस्कृति विकसित झाली. संयमामध्येंच नव्या नव्या संस्कृती उत्पन्न करण्याचें सामर्थ्य असतें. साहित्य, स्थापत्य, संगीतकला आणि विविध धर्मविधि या संयमामागोमागच येतात. संयम हा प्रथम प्रथम कर्कश व नीरस वाटतो; पण त्यामधूनच आपल्याला संस्कृतीचीं मधुर फळें चाखावयास मिळतात.

जे लोक कलेचा पक्ष घेऊन संयमाची हेटाळणी करतात ते कलेला भ्रष्ट करतात नि संस्कृतीच्या मुळावर घाव घालतात.

पंचमहापातक : : : ३

शास्त्रामध्यें अनेक प्रकारचीं पापें वर्णिलीं आहेत. खोटें बोलणें, हिंसा करणें, चोरी करणें, वगैरे कित्येक पापें तर आहेतच. पण पापांचा दुसरा एक प्रकार असा आहे कीं ज्याचा नामोच्चार व निषेध होणें जरूर आहे. सामान्य पापांपेक्षां हीं पापें कमी भयंकर नसतात. भयभीत दशेंत राहणें, अन्याय सहन करणें, शेजाऱ्यांवर होणारा अन्याय निमूटपणें पाहत राहणें, आळसांत आयुष्य घालविणें आणि अज्ञानदशा दूर करण्याचा प्रयत्न न करणें हींपण पंचमहापातकें आहेत. यांत आपल्याच आत्म्याशीं द्रोह होतो. जगांत जेथें जेथें अन्याय होत असतो तेथें तेथें जुल्म करणारा स्वतः तर पापी असतोच; पण जुल्म सहन करणाराहि कांहीं कमी पाप करीत नसतो. जो मनुष्य

स्वतः दुर्बल किंवा घाबरट बनून दुसऱ्यांना आपल्यावर जुल्म करण्याच्या मोहांत पाडतो तो समाजाचा कांहीं कमी द्रोह करीत नाहीं. यात्रेकरूंच्या संघांत जे लोक सर्वांत हळूहळू चालत असतात त्यांच्या वेगानेंच संघाला चालावें लागतें. दुर्बल लोक संघाचा वेग कमी करतात. याचप्रमाणें जे लोक मानवांच्या जीवनयात्रेंत ढिसूळ आणि भित्रे असतात ते देखील मानवाची प्रगति कुंठित करतात. ज्याप्रमाणें आपण कमजोर लोकांची संगत पसंत करीत नाहीं त्याप्रमाणें उन्नतीच्या मार्गावरून चालणाऱ्या जाती दुर्बल नि अन्यायसहिष्णु लोकांना पसंत करीत नाहींत.

पण मानवी संघामध्यें पसंत करणें न करणें कोणाच्याच हातीं नसतें. ईश्वरानेंच हा संघ तयार केला आहे; व तो स्वतःच त्याचा संघनायक आहे. तेव्हां या संघामध्यें आपण जितक्या अंशीं मागें राहतों तितक्या अंशीं त्या संघनायकाचा द्रोह करीत असतों.

अज्ञानी राहणें हेंदेखील एक महापाप आहे. जितकें ज्ञान आपल्या आकलनशक्तींत येऊं शकेल अथवा जितकें ज्ञान जीवनयात्रेसाठीं आवश्यक असतें तेवढें न मिळविणें याला संघद्रोह किंवा समाजद्रोह असेंच म्हणावें लागेल. विशेषतः ज्यांच्यावर अनेक लोकांचें मार्गदर्शन करण्याची जबाबदारी येऊन पडली आहे, जे समाजाचे पुढारी किंवा नेते समजले जातात ते जर जगाची स्थिति, वर्तमान सामाजिक आदर्श आणि जगापुढील महान् प्रश्न यांच्याशीं परिचित राहणार नाहींत तर त्यांना समाजघात केल्याचें पाप लागेल. हिंदु समाजामध्यें राजा आणि साधु हे दोन्ही वर्ग समाजाचें पुढारीपण करीत आले आहेत. यांपैकीं एक श्रीमंत असतो तर दुसरा अकिंचन असतो. एकाचा परिवार खूप मोठा असतो तर दुसरा परिवाराशिवायच असतो. एक सत्तेच्या द्वारें काम करतो तर दुसरा सत्याच्या द्वारें ! एकांत असतें प्रभुत्व; तर दुसऱ्यांत असतें वैराग्य. अशा परस्पर-भिन्न जीवनबाल्या व परस्पर-भिन्न आदर्श-

वाल्या वर्गांच्या हातीं समाजाचें पुढारीपण सोंपवून प्राचीन काळच्या समाजव्यवस्थापकांनीं सामाजिक उन्नतीचा रस्ता सुरक्षित केला होता. पण दुर्दैवानें या दोन्ही वर्गांना आपल्या संपूर्णतेचा भ्रम नडला. दोन्ही वर्गांनीं अज्ञानी राहण्याचें पाप केलें आणि म्हणून त्यांच्या शिरावर समाजद्रोहाचें ओझें येऊन पडलें. साधू लोक षड्दर्शनप्रवीण असोत, त्यांनीं दशग्रंथ पाठ केलेले असोत, पण जोंपर्यंत त्यांना जगाची परिस्थिति समजणार नाहीं, समाजाची नाडी ते ओळखणार नाहींत. आणि उन्नतीचा मार्ग कोणत्या दिशेस आहे तें समाजाच्या भाषेंत समाजाला सांगूं शकणार नाहींत तोंपर्यंत ते अज्ञानीच आहेत. स्वामी विवेकानंद किंवा स्वामी रामतीर्थ यांच्यासारख्या साधूंची जी इतकी कदर झाली, तिचें कारण हें कीं, ते आपलें सामाजिक कर्तव्य ओळखीत होते.

* * *

राजांचें देखील असेंच आहे. पुरुषार्थामागें लक्ष्मी येत असते, हें विसरून जाऊन लक्ष्मी सांभाळण्यामागें ते आपला पुरुषार्थ गमावून बसले आहेत. समाजाचें मार्गदर्शन करण्याऐवजीं समाजाला दाबून टाकण्यांतच त्यांनीं आपली शक्ति उधळून टाकिली आहे. श्री. गोपाळदास भाईसारख्या दरबारांची (संस्थानिकांची) जी कदर होते तिचें कारण हें कीं, ते आपला सामाजिक दर्जा समजूं शकले आहेत आणि समाजाच्या कल्याणांतच आपलें कल्याण पाहत आहेत.

ठाणे. स्थळाक.
दि: .....
दि: .....

निश्चिंतता आणि ऐषाराम : : : ४

"काव्य किंवा उच्च कलाकृति हवी असेल तर कवीला अथवा कलावंताला निश्चिंत स्थितींत ठेवलें पाहिजे. त्यांच्या खाण्यापिण्याची योग्य सोय असेल, 'उद्यां माझें काय होणार?' ही चिन्ता त्याच्या मनाला पोखरीत नसेल, त्याच्या भोंवतालचें वातावरण प्रसन्न असेल तरच त्याच्याकडून हवी तशी किंबहुना आपल्याला कल्पनाहि येणार नाहीं इतकी अप्रतिम सुंदर कृति आपल्याला मिळेल." असें म्हणणारे कित्येक लोक आज आढळतात. कलावंतांची कदर करणाऱ्या लोकांनीं जर असें म्हटलें तर तें ध्यानांत येण्यासारखें आहे. या म्हणण्यामागें सत्य असो वा नसो, पण सज्जनता आणि गुणग्राहकता मात्र अवश्य आहे. पण जेव्हां कवी, कलाकार आणि पंडित हे स्वतःच आपली

६२३० ६१७०

कदर करून वर सांगितल्याप्रमाणें बोलूं लागतात तेव्हां त्यांचा तो पक्ष कितपत खरा आहे हें तपासण्याची इच्छा होते.

एवढें मात्र खरें कीं, 'सुस्थे चित्ते बुद्धयः संभवन्ति ।'–चित्त ठिकाणावर असेल, त्यानें हाय खाल्ली नसेल, तरच शहाणपण सुचतें. पण यावरून उच्च कृतींच्या निर्मितीसाठीं ऐषाराम किंवा निश्चितता यांची जरूर आहे अशा प्रकारचा कांहीं निर्णय निघत असेल असें वाटत नाहीं. उत्तम गवई, उत्तम कवि किंवा उत्तम शिल्पकार यांना पहिल्यापासूनच महदाश्रय मिळाला होता किंवा सर्व प्रकारची साधनसंपत्ति त्यांना अनुकूल होती असें दिसत नाहीं; किंवा ऐषारामांत राहण्याची संधि मिळाल्यानंतर त्या लोकांच्या कलाकृती सुधारल्या आहेत असाहि अनुभव नाहीं. अत्यंत परिश्रम केल्याशिवाय ज्याप्रमाणें बाह्य कार्य होत नाहीं त्याप्रमाणें प्रेरणाशक्ति देखील परिश्रमाशिवाय तीक्ष्ण होत नाहीं असाच सार्वत्रिक अनुभव आहे.

उन्हाला कां घाबरतां ? उन्हामध्येंच वसंताची वनश्री विकास पावते. उन्हाळा सुरू झाल्यानंतरच पालवी फुटूं लागते. कडक उन्हांतच फुलें उमलतात आणि सुगंध पसरवितात.

आणि आकाशांत भराऱ्या मारणारे ते पक्षी जेव्हां गाणीं गातात तेव्हां त्यांना कोणत्या मंडळानें निश्चितता दिलेली असते ? त्यांच्या आयुष्याचा विमा उतरणारी कोणती कंपनी स्थापन झाली आहे ? कोणतें लष्कर त्यांच्या राष्ट्राचें रक्षण करतें ? कोणते पोलीस त्यांच्या शहरांत गस्त घालतात ? कोणतीं कब्याकुलपें त्यांच्या घरट्यांना सुरक्षित ठेवतात ? कोणते कायदे आणि कोणतीं कोर्टें त्यांच्या प्राणांचें, धनांचें, नि अब्रूचें रक्षण करीत असतात ? सदा-सर्वकाळ त्यांना संकटांत जगावयाचें असतें. एक क्षणभरहि त्यांना आपले डोळे स्थिर ठेवतां येत नाहींत. दाही दिशांना भिरीभिरी नजर फिरवून त्यांना पाहावें लागतें कीं कांहीं संकट तर येत नाहीं ना ? आणि संकट तरी

कसलें ? जें संकट यावयाचें तें प्राण हरण करूनच जावयाचें ! तरीहि हे पक्षी नाना प्रकारें गातात, किलबिलाट करतात, आणि जीवनाचा रस लुटतात.

आणि जंगलांतील पशूंकडे पहा. त्यांना दिवसाचे चोवीसहि तास हुशार राहावेंच लागतें. पमादो मच्चुनो पदम् । (प्रमाद घडला कीं मृत्यु दत्त म्हणून उभा राहावयाचा) हा सिद्धांत बुद्ध भगवानांच्या तोंडून ऐकण्याची त्यांना जरूर नसते. जन्मावरोबरच त्यांना तें शिक्षण मिळालेलें असतें. तें ज्ञान—तो वेद—त्यांच्या दृष्टीनें अपौरुषेय असतें. तें त्यांना मिळालेलें ईश्वराचें निश्वसित असतें; आणि तरीहि त्यांनीं जीवनाचा त्याग केलेला नाहीं, किंवा सुतकी पोशाख घातलेला नाहीं. ते जर अनिश्चिततेनें आणि जीवाच्या भीतीनें अभिभूत (पराजित) झाले असते तर त्यांचा एकहि दिवस सुखांत गेला नसता. काळजीनें त्यांचीं हाडिंच उरलीं असतीं. महायुद्धाची अनिश्चितता आणि भयत्रस्त दशा यांच्यामुळें कांहीं लोकांच्या नर्व्हज् (नाड्या) बधिर झाल्या, कांहीं कायमचे वेडे झाले आणि पुष्कळशा लोकांच्या चित्तवृत्तींत लहानमोठ्या अनेक विकृती उत्पन्न झाल्या. पशुपक्ष्यांमध्यें अशा तऱ्हेचें भय नेहमीं असतें. सध्यां तह आहे, युद्ध नाहीं, म्हणून मांजरांना भिण्याचें कारण नाहीं असें पक्ष्यांना कधींकाळीं वाटलें आहे काय ? लीग ऑफ नेशन्स स्थापन झाली आहे तेव्हां आतां बहिरी ससाणा शेजारीं येऊन बसला तरी आपला नित्य जप बंद करण्याची जरूर नाहीं अशी खात्री कबुतरांना कधीं तरी वाटली आहे काय ?

अनिश्चितता, सतत संकट हें तर प्रौढ जीवनाचें व्याकरण ! त्याच्याशिवाय गंमत वाटावयाचीच नाहीं. तुम्ही आपलीं काव्यें वाटेल तेव्हां रचा, तुमच्या मूर्ती वाटेल तेव्हां घडवा, पण त्या काव्यांतील भाव, ललित अनुभव, त्या मूर्तीचा साक्षात्कार हें सर्व तेव्हांच अनुभवास येतें जेव्हां आपण जीवनाला संकटाच्या सहाणेवर घांसून तीक्ष्ण करीत

असतों. जर ऐषआरामांत ही शक्ति असती तर राजशालक, श्रीमंतांचे आश्रित आणि अनेक विद्याकलांचा दावा करणाऱ्या गणिका प्रतिभेच्या शिखरावर बसल्या असत्या.

छेः ! ऐषआराम हा जीवनाचा गंज आहे, प्रतिभेचें मरण आहे, सर्व शक्तींचा ऱ्हास आहे.

पुनर्घटना : : : ५

– १ –

प्रलयानंतर नवी सृष्टि हा तर विश्वाचा नियमच आहे. महाप्रलयानंतरहि विश्व थांबलें आहे असें कधीं घडलेलें नाहीं, तर मग पांच दिवसांच्या प्रलयाची काय कथा?* तसें पाहिलें तर प्रलय नेहमीं चालतच असतात. औषधांचे नवेनवे शास्त्रीय शोध लावून डॉक्टर लोक जेव्हां शरिरांतील कोट्यवधि जंतूंचा नाश करतात तेव्हां जंतूंच्या सृष्टींत तो एक महाप्रलयच असतो असें म्हणतां येईल. अत्तरें तयार करण्यासाठीं जेव्हां आपण लाखों फुलांचा काढा करतों

* गुजरातेंत पुराच्या संकटामुळें जी परिस्थिति निर्माण झाली होती तिच्या अनुषंगानें हे लेख लिहिले गेले होते.

तेव्हां तो असह्य संस्कार कशासाठीं होत असतो हें बिचाऱ्या फुलांना कोठें माहित असतें ? दर उन्हाळ्यांत जेव्हां गवत आणि झाडें-झुडपें वाळून खाक होतात तेव्हां निसर्गामध्यें अशा प्रकारचें थोडें देखील चिन्ह दिसून येत नाहीं कीं या विनाशामधून किंवा विनशना-मधून थोड्याच दिवसांत हिरवीगार सृष्टि निर्माण व्हावयाची आहे ! माणसांचेंहि असेंच असतें. सस्यमिव मर्त्यः पच्यते सस्यमिवा जायते पुनः । बारा बारा वर्षांच्या दुष्काळांनीं सबंध मुलुख वैराण व बेचिराख झाल्यानंतरहि माणसानें नवीन वस्ती वसविली आहे आणि पुन्हां आबादीआबाद झालें आहे. माणसाची जगण्याची शक्ति ही निसर्गाच्या संहारशक्तीहून अधिक प्रबळ आहे.

आपल्याला जी घटना न भूतो न भविष्यति अशी वाटली तीच ईजिप्त देशाला दरवर्षी अनुभवावी लागते. नाइल नदीला पूर आला नाहीं आणि सारा देश जलमय झाला नाहीं, तरच तेथील लोकांना चुकल्या चुकल्यासारखें व्हावयाचें. संकट जर एकदां आलें तर मनुष्य दीन बनून जातो; जर अनेक वेळां आलें तर त्याचें निवारण करण्याचा उपाय तो शोधून काढतो आणि जर तें नेहमींचेंच होऊन बसलें तर त्याला जीवनाचा नियम समजून आपल्या राहणींतच तो कायमचा फेरफार करून घेतो; आणि मग संकट हें संकट न राहतां जीवन-विकासाचें साधन बनतें.

विकासप्रधान मनुष्यजातीचा हा सर्वसामान्य नियम झाला. प्रत्येक हिवाळ्यांत वानरें थंडीनें कुडकुडतात आणि घर बांधण्याचा निश्चय करून सबंध रात्रभर योजना आंखीत असतात. सकाळीं उन्ह पडलें आणि थंडी उडाली कीं लागलींच रात्रीचें दुःख विसरून पोटांत पेटलेल्या जठराग्नीला तृप्त करण्यासाठीं नेहमींप्रमाणें एका झाडावरून दुसऱ्या झाडावर उड्या मारीत फिरत असतात. यामुळें नेहमीं त्रास सोसावा लागत असूनहि वानरांनीं अजून घर बांधण्याइतकी किंवा

आपलीं गांवें वसविण्याइतकी प्रगति केलेली नाहीं. संकट कमी झालें कीं विचारहि ढिला होणें आणि आलेला अनुभव विसरून स्वाभाविक वृत्तींच्या अधीन होणें हें जडतेचें लक्षण आहे. मनुष्यत्वाचें लक्षण याहून वेगळें आहे.

आजचा मुख्य प्रश्न पुढील सालासाठीं धान्य कसें उत्पन्न करावयाचें आणि मुलांबाळांच्या शिरावर सावली कशी करावयाची हाच आहे. गुरेंढोरें वाहून गेलीं, शेतीचीं अवजारें वाहून गेलीं. या सर्वांची पुनः जुळवाजुळव करावयाची आहे. पण या सर्वांचा मुख्य पाया म्हणजे राहण्याची जमीन होय. तिचा आधीं विचार झाला पाहिजे.

गुजरातेंतील बहुतेक गांवांमध्यें वस्तीच्या प्रमाणांत गांवठाणाची जमीन कमी आहे. याचीं कारणें अनेक असूं शकतील. मूळ गांव लहान असेल आणि मग तें वाढलें असेल तर गांवाची सीमा वाढविण्याऐवजीं दाटीदाटीनें पण गांवाच्या हद्दींतच राहावयाचें हा लोकांचा स्वभाव आहे. या कारणानें दिवसेंदिवस गांवची वस्ती कोंदाटलेली होत आहे. दुसरें एक कारण असें कीं, गांवाची रचनाच अशी असते कीं, तिच्यांत विकासाला वावच नसतो. ब्राह्मण, वाणी, पाटील इत्यादि प्रतिष्ठित जातींनीं आपलें स्थान नक्की करून सीमा बांधली यामुळें समाजसेवेमध्यें ज्यांची जरूर जास्तींत जास्त आहे परंतु तरीहि समाजव्यवस्थेमध्यें ज्यांना विशेष प्रतिष्ठा नाहीं अशा जाती गांवाच्या हद्दीबाहेर आपल्या झोंपड्या उभारून मूळ वस्तीला एक प्रकारें वेढा घालतात. समाजाच्या किनाऱ्यावर राहणाऱ्या या जातींना हा प्रकार सोयीस्करहि वाटतो. त्यांचें काम अधिकांशानें शिवारांत व जंगलांत असल्यामुळें ते गांवाबाहेर राहणेंच जास्त पसंत करणार. अशी व्यवस्था झाली कीं, मग प्रतिष्ठित वस्तीच्या विकासाला वावच मिळत नाहीं. गांवांतील वस्तीच्या शेजारीं राहणें त्यांना परवडावयाचें नाहीं आणि खूप दूर शेतांत राहणें हें सुरक्षित म्हणतां येणार नाहीं.

यामुळें वस्तीची दाटी सहन करून, घरें बेढबपणें उंच करूनहि निभावून नेल्याशिवाय गत्यंतर नसतें. वस्तीला गर्दीत ठेवण्यास राज्यव्यवस्थाहि कारणीभूत होत असते. जेथें लुटारूंचा त्रास होत असेल तेथें लोक मोकळ्या जागेंत दूर दूर घरें बांधून स्वतंत्रपणें राहण्याची हिम्मतच करणार नाहींत. राज्यव्यवस्थेची नीति लुटारूंच्या नीतिहून जोंपर्यंत उच्च असणार नाहीं तोंपर्यंत लुटारूंचा उपद्रव थांबणार नाहीं, असा सार्वत्रिक अनुभव आहे. राजानें जर लुटारुंचा बंदोबस्त केला तर प्रजा लहानसहान आपत्ती आपल्या बहादुरीनें अवश्य दूर करूं शकेल, आणि प्रत्येक मोठा शेतकरी आपल्या शेतांतच आपला महाल किंवा किल्ला बांधून सुखानें राहूं शकेल. जेव्हां राज्यव्यवस्था ढिली किंवा बेजबाबदार असते तेव्हां जनतेला आत्मरक्षणासाठीं तट बांधून आणि त्या तटाच्या आंतहि गल्ल्या बनवून कसेंबसें राहावें लागतें. अशा परिस्थितींतहि अस्पृश्यांसारख्या जातींना तटाबाहेरच राहावें लागतें. प्रतिष्ठित व श्रीमंत जाती मात्र तटांच्या आंतच राहावयाच्या.

हत्यारबंदीचा कायदा अविश्वासाच्या पायावर रचून अत्यंत कडकपणें अमलांत आणला गेला. यामुळेंहि लोक कोंडवाड्यांतील मेंढरांच्या कळपाप्रमाणें गर्दी करून राहूं लागले; व निर्भय उदारता विसरून जाऊन कोटींतील कोत्या मनाचीं भांडणें लढूं लागले. या कारणानेंहि जमिनीच्या लहान लहान तुकड्यांवर तांबुतांप्रमाणें घरें बांधलीं गेलीं. अशीं घरें निसर्गाच्या कोपापुढें कशीं टिकूं शकणार?

जगण्यासाठीं शुद्ध व पौष्टिक आहार, स्वच्छ व यथेच्छ पाणी, मोकळी हवा, व भरपूर प्रकाश आणि पुरेसा शारीरिक व्यायाम यांची आवश्यकता आहे, हा प्राथमिक सिद्धांत अंमलांत आणण्याइतकें शिक्षण किंवा चिकाटी जनतेंत नाहीं. यामुळें वर सांगितलेल्या कारणांनीं कोंदट जागेंत राहिल्यानें जनता आपल्या स्वतःच्या हातांनीं

स्वतःला किती निःसत्त्व बनविते याची कल्पना तिला कोठून येणार ? सुधारलेल्या सरकारनें जनतेला विस्तृत जीवनाकडे घेऊन जावयास हवें होतें. पण जमीनमहसुलाच्या लोभांत सांपडलेल्या सरकारनेंहि ग्रामवस्तीला वेढा घातला.

शरीराच्या सुखाला ज्याप्रमाणें विस्तृत जागा हवी असते त्याप्रमाणें मानसिक स्वास्थ्यासाठींहि विशाल अवकाशाची आवश्यकता असते. मुंबईच्या चाळींतून कबुतरांप्रमाणें राहणाऱ्या वस्तीची मनोभूमिकाहि तशीच व्हावयाची. तेथें व्यास-वाल्मीकिसारखा एखाद्या महाकाव्याचा प्रणेता निर्माणच व्हावयाचा नाहीं. कोंदाटलेल्या जागेंत दृष्टि संकुचित होते असें नेत्रवैद्यहि सांगतात आणि समाजशास्त्रज्ञहि सांगतात.

आज पुनर्रचना करावयाची असेल तर तिचा पायाहि विशाळ असला पाहिजे. जेथें थोडींच घरें पडलीं आहेत व जेथें फारसा फेरफार होणें शक्य नाहीं तेथील गोष्ट सोडून देऊं; पण जेथील बहुतेक घरें पडलीं आहेत किंवा पाडण्यालायक झालीं आहेत तेथें सरकारनें लोकांना कमींत कमी मूळ गांवाच्या क्षेत्रफळाच्या तिप्पट जमीन दिली पाहिजे. प्रत्येक घराच्या मालकाजवळ मूळ जमीन केवढी होती याचा हिशोब करून तिच्या तिप्पट जमीन सरकारनें त्याला फुकट द्यावी. त्याचबरोबर पुनर्रचनेच्या अमुक नियमांचें पालन करण्याची जबाबदारी त्याच्यावर टाकण्यांत यावी. असें केल्यानें जनतेचा पुनरुद्धार होईल व सरकारला निरोगी, उद्यमी, उदार मनाची व सुधारलेली प्रजा मिळेल. सबंध प्रांतांत हा फेरफार होऊं शकला नाहीं, तरी हरकत नाहीं. पण जेथें जेथें शक्य असेल तेथें तेथें ही सुधारणा लवकर अंमलांत आणलीच पाहिजे. सरकारनें आपल्या अधिकाऱ्यांना हें सांगितलें पाहिजे कीं, 'असें करण्यांत सरकारनें आपलें हितच पाहिलें आहे आणि म्हणून अधिकाऱ्यांनीं उत्साहपूर्वक ही पद्धत अंमलांत आणावयाची आहे.' अधिकाऱ्यांना जर असें दिसून आलें कीं जनतेचें दडपण कमी व्हावें

एवढ्यासाठींच सरकारनें होकार दिला आहे; परंतु नेहमींच्या कंजूषपणाच्या धोरणालाच चिकटून राहावयाचें आहे, तर सरकार एक कृपण असेल तर हे 'इमानी' अधिकारी दहा कृपण बनतात. सिमल्यास, थंड हवेच्या ठिकाणीं, लष्करी छावण्यांमध्यें, कोलारसारख्या सोन्याच्या खाणींमध्यें गोरे लोक जो मोकळेपणा उपभोगितात त्याच्या प्रमाणांत गरीब जनतेला थोडीशी तरी मोकळीक मिळाली पाहिजे.

जनता वैभवांत न कां राहीना पण ईश्वरानें दिलेली जमीन, हवा नि प्रकाश यांचे बाबतींत तरी मुळींच उपासमार होतां कामा नये.

— २ —

शरीर आणि मन यांचा जसा परस्पर संबंध असतो तसाच संबंध लोकवस्ती व लोकस्वभाव यांच्यामध्यें असतो. जसे पूर्वजन्मींचे संस्कार अथवा जसे आनुवंशिक संस्कार असतील तसें शरीर मनुष्य प्राप्त करतो. पण एकदां शरीर धारण केल्यानंतर त्या शरीराचा मनावर परिणाम होतच असतो. तेव्हां असें सहज म्हणतां येईल कीं, जशी लोकांची नगररचना तशी समाजाची मनोरचना. समाजशास्त्रज्ञ संस्कृतीचें अध्ययन करते वेळीं कोणत्याहि प्राचीन शहराची रचना पाहून तें शहर ज्या वेळीं रचलें गेलें त्या वेळची लोकस्थिति व लोकस्वभाव यांच्याविषयीं अचूक अनुमान काढतात. काशीचे चक्रव्यूहासारखे अरुंद बोळ आणि समोरच्या घरांतील माणसाला बोलाविण्यासाठीं जोरानें ओरडावें लागेल असे कांचीचे विशाल राजमार्ग हे परस्पर-भिन्न संस्कृतींचे सूचक आहेत. नर्मदेच्या कांठीं पगडीप्रमाणें भडोच आणि मंदगति झेलमच्या शाखाप्रशाखांच्या कांठीं पसरलेलें श्रीनगर हीं जितकीं निसर्गाची हुकूमशाही सूचित करतात तितकींच मनुष्याच्या स्वभावाचीं निदर्शकहि झालीं असल्यास आश्चर्य नाहीं. जयपूर आणि अलमोडा यांच्यामध्येंहि असाच भेद दिसून येईल.

जुना अनुभव आणि जुना इतिहास यांच्यावरून गुजरातेंतील शहरें आणि खेडीं यांनीं एक विशिष्ट रूप धारण केलें. आज नव्या अनुभवावरून व नव्या परिस्थितीनें आपल्याला कांहीं नवीन सुचतें कीं नाहीं, हा मुख्य प्रश्न आहे. राजाला विष्णूचा अवतार समजून त्याच्या छत्राखालीं वैयक्तिक किंवा जातीय उन्नति साधण्याचा प्रयत्न करणारी प्रजा एका प्रकारें नगररचना करील, तर लोकशाहीवर विश्वास असणारी व राष्ट्रीयतेचा विचार करणारी पंचरंगी जनता दुसऱ्याच प्रकारें आपल्या नगरांची व ग्रामांची रचना करील. सुखसोयींचीं साधनेंहि रचनेमध्यें आवश्यक फेरफार करतात. पाण्याचे नळ दिसावयास खूप साधे दिसतात, पण नळांची एक वेगळीच संस्कृति असते. शहरांतील नळांना शरीरांतील रक्तवाहिन्यांची उपमा देतां येईल. जेथें नळ पोहोंचले तेथील किरकोळ स्वावलंबन नाहींसें झालें आणि परस्परावलंबी नागरिक-जीवन सुरू झालें.

गुजरातेंत पुनर्घटनेचें युग सुरू करावयाचें असेल तर गुजरातच्या हृदयांत पुनर्रचनेनें स्मृतींच्या नियमाप्रमाणें निश्चित रूप धारण केलें पाहिजे. आतांपर्यंत आपण अनेक प्रकारच्या अडचणी अपरिहार्य समजून सोशीत आलों. त्या अडचणींविरुद्ध वाटेल तितकी चर्चा केली असली तरीहि त्यांना अपरिहार्य समजून चालवून घ्यावेंच लागलें होतें. आतां निसर्गाच्या अगाजकानें आपल्याला स्वतंत्रता अनुभविण्याची संधि दिली आहे. अशा वेळीं त्यापासून किती फायदा घेण्याची आपल्यामध्यें हिम्मत आहे हें तपासावयाचें आहे.

उदाहरणार्थ, दोनतीन प्रश्न आपल्यासमोर स्पष्टपणें उभे आहेत. जात आणि धंदा हे जेव्हां जवळ जवळ समान होते त्या काळीं शहरें आणि गांवें हीं जातपरत्वें वेगवेगळ्या गल्ल्या, पेठा आणि हिस्से यांत विभागलीं गेलीं होतीं. बदललेल्या परिस्थितींत जातींची हीच ऊब जर पुरुषार्थाला मारणारी आणि भांडणें वाढविणारी होणार असेल तर आतां

विद्या
1937

समान राहणी, समान धंदा व समान शील यांचाच विचार करून लोकवस्तीचे नवे घटक बांधावयाचे किंवा कसें हा एक प्रश्न आहे. एकाच जातीच्या मुलांना एकत्र ठेवणाऱ्या वसतिगृहाची पद्धति ज्याप्रमाणें आपल्याला सर्वस्वी इष्ट वाटत नाहीं त्याप्रमाणें वस्तीच्या विकासांत अथवा पुनर्घटनेंत जातवार गल्ल्या बांधणें इष्ट आहे किंवा नाहीं याचा आधीं विचार झाला पाहिजे. देशसेवेमध्यें किंवा सामाजिक पुरुषार्थांत ज्यांचें जीवन परस्पर-सहकार्यानें गुंतलेलें असतें असे लोक जातपातीचा विचार न करितां शेजारीं शेजारीं राहणें पसंत करतील तर तें स्वाभाविक आणि अपरिहार्य आहे. जेथें गिरणी आहे तेथें जवळच उत्तम हवेशीर जागा पाहून गिरणीवर जगणारे मजूर व अंमलदार यांनीं तेथें राहावें; हें जर आपल्याला इष्ट वाटत असेल तर त्यांच्या बाबतींत जातवार विभाग पाडतांच येणार नाहींत. फार फार तर मांसाहारी व फक्त शाकाहारी अशा वेगवेगळ्या वाड्या करण्याची जरूर राहील. इतर क्षुद्र भेद मात्र नष्ट केलेच पाहिजेत.

शहरांच्या पुनर्रचनेचा विचार आपल्यासमोर नाहीं असें म्हटलें तरी चालेल. खेड्यांचा आणि खेड्यांहून मोठ्या परन्तु शेतीशीं विशेष संबंध असणाऱ्या कसब्यांचा विचार आज प्रस्तुत आहे. कारण जास्त नुकसान तेथेंच झालें आहे. ज्या वस्तीचा अधिकांशानें शेतीशींच प्रत्यक्ष संबंध असतो तिला जर आपण खेडें असें संबोधूं तर या व्याख्येप्रमाणें आज ज्या लोकवस्त्या लहान शहरांत मोडतात त्यादेखील अधिकांशानें खेड्यांतच येतील. अशा वस्त्यांची पुनर्घटना आज इष्टहि आहे नि शक्यहि आहे. जनतेमधील घाबरटपणा जर निघून जाईल तर शेताच्या मालकानें आपल्या शेतांतच घर बांधून राहावें व शेतकाम करावें ही स्वाभाविक परिस्थिति जनतेला सहज पसंत पडेल. चोराचिलटांच्या भीतीनें व जातींतील कांहीं रिवाजांमुळें गांवामध्यें दाटीदाटीनें राहावयाची आपल्याला संवय पडली आहे. एका ओळींत एकमेकांस चिकटून घरें

बांधण्याची व्यवस्था करून आपण घर बांधण्याचा खर्च पुष्कळच कमी केला. एकमेकांच्या आधारानें घरें वाटेल तितकीं उंच बनविणें सोपें झालें. शेजाऱ्यांच्या जीवनांत ओतप्रोत होऊन जाण्याचीहि सोय झाली. प्रत्येकाच्या खासगी जीवनाचा मोठा हिस्सा शेजाऱ्याच्या नजरेसमोर उघडा राहिल्यानें सामाजिक पहाराहि अनायासें निर्माण झाला. अशा तऱ्हेचे बरेच फायदे झाले खरे, पण यांपैकीं प्रत्येक फायद्याला दुसरी बाजू ही आहेच. स्वतंत्रता, हिम्मत, पौरुष, कल्पकता आणि आरोग्य प्राप्त करण्यासाठीं ज्या मानसिक मोकळेपणाची जरूर असते ती या गर्दीगर्दीनें बांधलेल्या घरांमुळें मिळत नाहीं. कोंदट वस्तींत राहून आपण एक प्रकारें आत्मरक्षण साधलें खरें, पण सुरक्षितता ही पुरुषार्थाला मारून टाकणारी वस्तु आहे. मनुष्य सुरक्षितता शोधूं लागला कीं त्याच्या मौल्यवान् वृत्ती आणि शक्ती मारल्या जातात नि जीव धोक्यांत घालण्याची बहादुरी नाहींशी होऊं लागते. कोंदट वस्तींत राहिल्यानें भांडणतंटे वाढतात, स्वतंत्र विकासास वाव राहत नाहीं व मेंढरी वृत्तीपासून स्वतःला दूर ठेवणें कठीण होतें; आपल्या पद्धतीनें आपलें जीवन विकसविण्याची वृत्तिच मारली जाते आणि ही वृत्ति जागृत राहिली तरीहि त्याप्रमाणें वागण्याची अनुकूलता उरत नाहीं.

याऐवजीं जर प्रत्येक मनुष्य आपल्याच शेतांत घर बांधून राहील तर घराच्या आसपासच्या मोकळ्या जमिनीमुळें शारीरिक व सामाजिक दोन्ही प्रकारचें आरोग्य राहील, भांडणें कमी होतील, स्वाभिमान व परस्पर आदर यांच्या परिपोषास वाव राहील; आणि सर्वांत मोठा लाभ म्हणजे कुटुंबांतील प्रत्येक माणसाला आपल्या फुरसतीच्या लहान लहान तुकड्यांचाहि सदुपयोग करण्याची संधि मिळेल. घराच्या सभोंवतीं बाग असावी; तुळशीचे वाफे असावेत; भाजी, कोथिंबीर उगवलेली असावी; देवकापूस किंवा हीरवणीचीं पांचसहा झाडें असावींत; गाय, किंवा शेळी बांधलेली असावी. जर असें होईल तर कुटुंबाला सहजासहजीं

अनेक प्रकारें उद्यमी जीवन कंठिण्याची संधि मिळेल व घरांतील लोकांना अत्यंत आवश्यक असें निरक्षर शिक्षण मिळेल. साक्षर शिक्षणाची कृत्रिमता कमी करण्याचा याहून जास्त चांगला असा कोणता बरें उपाय असूं शकेल ?

आणि मग आपण घरांच्या लांबच लांब रांगा तयार करावयाच्या कीं घरांच्या भोंवतीं बागा लावावयाच्या, हा प्रश्न आतांच सुटूं शकेल. खेड्यांत व लहान लहान शहरांत फक्त बाजारांतील दुकानें ओळीनें व खेटून बांधलीं असतील तर तेवढें पुरेसें आहे. नेहमीं राहावयाचीं घरें दूर दूर असतील तरच दिवसेंदिवस वाढत जाणाऱ्या रोगराईंतून व समाजाचा नाश करणाऱ्या भांडणतंटयांतून आपली सुटका होऊं शकेल.

जमीनमहसुलाच्या चालू कायद्याप्रमाणें देखील प्रत्येक खऱ्या शेतकऱ्याला आपल्या जमिनीवर आपल्या गरजेपुरतें पक्कें घर बांधून राहण्याची मोकळीक आहे. असें घर बांधण्यानें त्याला जास्त कर द्यावा लागत नाहीं. परंतु या नियमाचा फायदा घेण्याइतकें ज्ञान किंवा हिम्मत हीं आतांपर्यंत जनतेंत आलीं नव्हतीं. लोकजागृतीच्या या युगांत जर जनतेनें मनांत आणलें तर हे दोन्ही गुण तिला आपल्या अंगीं आणतां येतील. थोडेसे हिम्मतवान् व लायक शेतकरी मनांत आणतील तर ते अशा प्रकारचें आदर्श खेडें वसवूं शकतील. एकाला साधलें कीं–त्याच्या भोंवतीं दुसरींहि अशींच खेडीं निर्माण होतील. खेड्यांच्या व्यापक आवश्यकता पूर्ण करण्याच्या मुळाशीं शहराची उत्पत्ति आहे. अमुक प्रदेशांत अशा आदर्श नि बहादुर खेड्यांचा समूह निर्माण झाला कीं त्यांच्यामध्यें आपोआपच एखादें शहर तयार होण्याचा संभव असतो. किंवा असें अनुकूल शहर जवळ असेल तर त्या शहरावर अशा गांवांचा प्रभाव पडेल. पण ही भविष्यांतील गोष्ट आहे.

वाटेल तेवढी लहान वस्ती नव्यानें वसवावयाची असली तरी स्टेशनावरील रेल्वेच्या रुळांप्रमाणें घरांच्या रांगा बनविल्यास तें चालणार

नाहीं. कांहीं वस्त्या मध्यभागीं एक मोठा तलाव राखून त्याच्यासभोंवतीं रचलेल्या असतात. कांहीं वस्त्या एखाद्या टेकडीला किंवा किल्ल्याला वेढा घालून त्यांच्या आधारानें राहतात. जेथून मी हें लिहीत आहें त्या मदुरे-मध्यें मीनाक्षीचें मंदिर मध्यभागीं ठेवून त्याच्यासभोंवतीं सगळें शहर चौरस पसरलेलें आहे. मीनाक्षीचा मोठा, उंच नि रुंद रथ उत्सवाच्या प्रसंगीं सबंध शहरांत फिरावयाचा असतो. यामुळें रस्ते पुरेसे रुंद आहेत आणि चौकाच्या प्रत्येक कोपऱ्यावर रथ पोहोंचावयाचा असेल तर रथ ओढणाऱ्या शेंकडों लोकांसाठीं पुरेशी जागा राखली पाहिजे; म्हणून प्रत्येक रस्त्याचें टोंक एका मोठ्या मैदानासारखें ठेवण्यांत आलें आहे. अशी ही मूळ रचना होती. इंग्रजी राज्य आल्यानंतर आपल्या सामाजिक जीवनाचा चुथडा झाला व तें बेजबाबदार झालें. त्यानंतर ही व्यवस्था खूपच बिघडविण्यांत आली आहे. आपण जर पुनः ग्रामरचनेचा किंवा नगररचनेचा विचार करणार असूं तर आपल्या नवीन राहणीला अनुकूल अशी रचना करूं शकूं. वस्तीच्या प्रत्येक विभागांत एक मोठें मैदान राखण्यांत आलें असेल तर तें वस्तीचें फुप्फुस बनेल. मुलें नि मुली सकाळ-संध्याकाळ तेथें खेळतील, सामाजिक उत्सवप्रसंगीं किंवा सभेसाठीं लोक तेथें गोळा होतील, ज्ञातिभोजनासाठीं आज जसें रस्त्यावर शौचकूपांच्या घाणींतच नाक आणि मन घट्ट करून बसावें लागतें तसें नंतर–ज्ञातिभोजनें चालू ठेवावयाचींच असतील तर–करावें लागणार नाहीं. दररोज किंवा ठराविक वारीं सर्व लोकांनीं या जागीं गोळा झालेंच पाहिजे असा नियम जर करतां येईल तर आपलें सामाजिक जीवन खूप सुसंस्कृत होईल. मात्र आपली जबाबदारी समजणाऱ्यांनीं लोकांचें मार्गदर्शन करण्याचें काम केलें असेल तरच हें होऊं शकेल. असें स्थान मंदिराइतकें पवित्र ठेवलें पाहिजे असें म्हणतांना आपण आपलीं मंदिरें कशीं ठेवीत असतों याचा विचार मनांत आल्याशिवाय राहत नाहीं. नवीं मंदिरें बांधावयाचींच असतील तर मंदिरांच्या सभोंवार देखील

पुरेशी मोकळी जागा असली पाहिजे. पण मंदिरांचा विचार स्वतंत्रपणें करावा लागेल.

तिसरा प्रश्न आपल्या शौचकूपांचा. समाजाच्या शिक्षणाचा प्रारंभ शौचाचारानें करावा, असें आपल्या स्मृतिकारांनीं सांगितलें आहे. स्वच्छतेच्या आग्रहामुळें उच्चनीच भावनेलाहि आपल्या समाजानें स्थान दिलें. तरीहि सामाजिक अबुद्धीनें शौचाचा प्रश्न अजून न सोडवितांच ठेवला आहे. घाणेरड्या शौचकूपांत अर्धा अर्धा तास बसण्यास व तेथें विड्या फुंकण्यास लोकांना लाज वाटत नाहीं, परंतु शौचाच्या प्रश्नाची चर्चा मात्र किळस उत्पन्न करते! या शिष्टाचाराला काय म्हणावें? जुनीं किंवा नवीं घरें पहा, शौचकूपांची व मुताऱ्यांची उत्तम व्यवस्था कोणती नि ती कशी राखावयाची या गोष्टींचा बरोबर विचार झाला असल्याचें येथें क्वचितच दिसून येतें. हरलेल्या माणसाप्रमाणें याविषयीं लोक नेहमीं मौनच बाळगितात. माती, पाणी, उन्ह, हवा आणि मोकळेपणा या पंचमहाभूतांमध्यें प्रत्येक द्रव्याला शुद्ध करण्याची अमर्याद शक्ति असते. त्यांचा उपयोग करण्यास पैशापेक्षां कौशल्याचीच जास्त जरूर असते. हें कौशल्य लोकशिक्षणाशिवाय यावयाचें नाहीं. समाजसेवकांनीं धैर्यानें या सर्व बाबींचें ज्ञान लोकांना पुनः पुनः दिलें पाहिजे.

लोकशिक्षणाशिवाय लोकांची मनोरचना बदलणार नाहीं. समाज-सेवकांनीं खूप विचार व चर्चा करून पुनर्घटनेनंतरचें सुधारलेलें जीवन कसें असावें हें नक्की करावें, समाजांत त्याचा प्रचार करावा. व त्याचबरोबर त्यासाठीं अनुकूल अशा निवासस्थानांची रचना करावी हा सफळतेचा एकमात्र उपाय होय.

MAHABODHI ROAD. BOMBAY.

मत्सर : : : ६

कांहीं मुलांमध्यें मत्सर किंवा हेवा विशेष प्रमाणांत दिसून येतो. ज्या मुलांचे मर्यादेबाहेर लाड करण्यांत येतात किंवा ज्यांच्याशीं अत्यंत तिरस्काराचें वर्तन ठेवलें जातें त्यांच्यांत नेहमीं स्वार्थवृत्ति आणि हेवादावा हे दुर्गुण येतातच. लाड हें एक अतिशय कृत्रिम जीवन आहे. त्यामुळें लाडास बळी पडलेल्या व्यक्तींच्या मनांत – मग तें मूल असो कीं स्त्री असो – जगाविषयीं खोट्या कल्पना निर्माण होतात. सारें जग आपल्याभोंवतीं फिरत राहिलेंच पाहिजे, अशा तऱ्हेचा आग्रह त्यांच्यांत उत्पन्न होतो; व प्रत्येक वर्तुळाचें केंद्र तर एकच असूं शकतें, यामुळें आपली जागा दुसरा कोणी पटकावील कीं काय या भीतीनें हेवा किंवा मत्सर उत्पन्न होतो. लाडामुळें मिळालेलें स्थान स्वाभाविक किंवा

योग्यतेनुरूप असत नाहीं. लाड केली जाणारी प्रत्येक व्यक्ति अस्पष्टपणें ही वस्तुस्थिति ओळखून असतेच, आणि म्हणूनच तिला नेहमीं 'यांत कोणी प्रतिस्पर्धी तर नाहीं ना ?' अशी शंका उरांत बाळगून चोहोंकडे पाहावें लागतें.

माणसाची खरी योग्यता जसजशी वाढत जाते आणि जसजसें त्याला आपल्यायोग्य क्षेत्र मिळत जातें तसतसा त्याच्यांतील हेवादावा कमी होत जातो. त्याच्यांत स्वाभाविकपणा येत जातो.

Jealousy(मत्सरा)च्या मागें self-love(अहंप्रेमा)चा दोष हा असतोच. अहंप्रेम ही माणसाला प्राकृत बनविणारी असामाजिक वृत्ति आहे.

आजच्या काळीं सामाजिक समानतेचा पुरस्कार करणारे लोक मनुष्यजातीनें आजपर्यंत स्त्रियांच्या बाबतींत जो अन्याय केला आहे तो ध्यानांत ठेवून स्त्रियांशीं विशेष कोमलपणानें वागतात. हें वाटेल तितकें न्याय्य असलें तरी स्त्रियांच्या दृष्टीनें तें स्वाभाविक किंवा लाभदायक नाहीं. कारण त्यामुळें स्त्रियांच्या स्वभावांत विकृति येते. कोणत्याहि बाबतींत त्या प्रमाण राखूं शकत नाहींत. त्यांच्या वासना आणि आकांक्षा वाढतच जातात, व वाटेल तितकें अनुकूल वातावरण मिळालें तरी दिवसेंदिवस त्या स्वतःहि दुःखी होतात नि जवळच्या लोकांनाहि दुःखी करतात. स्त्रियांचा जन्म हा अहंप्रेमासाठीं नाहींच मुळीं. तरी देखील आजकाल स्त्रियांमध्यें हा दोष फार व्यापक प्रमाणांत दिसून येतो. आणि आश्चर्य हें कीं, हा दोष इतका व्यापक असूनहि तो त्यांना अजून जुळलाहि नाहीं किंवा त्यांनीं तो जिरविलाहि नाहीं.

अहंप्रेमाची विकृति त्यांना अस्वस्थ करते. इतकी कीं तिचा त्यांच्या प्रकृतीवरहि परिणाम होतो. पुरुषांना त्यांच्यावरील जबाबदारीमुळें कांहीं ना कांहीं व्यवसायांत पडावेंच लागतें. स्त्रियांसाठीं आतांपर्यंत गृहव्यवसाय हीच प्रवृत्ति लिहिलेली आहे. तिच्यांत किंवा दुसऱ्या

कोणत्याहि नव्या प्रवृत्तींत जर त्या गुंतून राहिल्या तर त्यांचें जीवन निरोगी आणि सुखी राहतें. रिकामटेकड्या जीवनाच्या पोकळींत अहंप्रेम आलें कीं सारें जीवन मातीमोल झालेंच म्हणून समजावें. 'अंकल टॉम्स केबिन'मधील अंकल टॉमचा प्रेमळ शेठ जो सेंट क्लेर त्याच्या स्त्रीचें चित्र अहंप्रेमाचा खूप ठळक नमुना आहे. हें चित्र एका स्त्रीनेंच रंगविलें आहे हें एक त्याचें वैशिष्ट्य आहे.

प्रत्येक धार्मिक संघांत गुरुभक्तीला स्थान हें असतेंच. त्यामधून एक विचित्र परिस्थिति निर्माण होते. प्रत्येक शिष्याला वाटतें कीं, मीच गुरूच्या सान्निध्यांत राहावें व गुरूची जास्तींत जास्त सेवा करावी, यांत गुरुभक्तीचा उत्कर्ष किंवा उद्रेक दिसून येतो. पण त्यामागेंहि कांहीं अंशीं अहंप्रेम हें असतेंच. (बायबलावरून असें समजतें कीं, पीटर आणि पॉल हे अखेर आपापसांत लढले.) श्री. किशोरलाल मश्रूवाला यांनीं एके ठिकाणीं असें सुचविलें आहे कीं, गुरुभक्ति जर खरी असेल तर ती गुरुबन्धूवरील प्रेमांत आणि उदारतेंत व्यक्त झाली पाहिजे. ज्या संघांत परस्पर प्रेम आणि मुदिता असेल त्याच संघाचा उत्कर्ष होतो. जर तसें नसेल तर संघ वाढण्याऐवजीं छिन्नभिन्न होऊन जातो.

सुधारणेची खरी दिशा : : : ७

मनुष्याच्या स्वाभाविक वृत्ती आणि त्याची सद्‌बुद्धि या जेव्हां एकमेकांला अनुकूल (समरस) होणार असतील तेव्हां होवोत, पण आज मात्र वस्तुस्थिति मुळींच तशी नाहीं. आज या दोहोंत विरोध आहे. आज जें मधुर वाटतें तें पथ्यकर नसतें, जें सुखकारक भासतें तें कल्याणकारक असत नाहीं; जें प्रेय असतें तें श्रेय असत नाहीं; कर्तव्याचा मार्ग दुःखद वाटतो आणि सुखाचा मार्ग हितकारक नसतो. आपल्या स्वाभाविक वासना आपल्याला आपोआपच पशुजीवनाकडे ओढून नेत असतात. ईश्वरानें माणसाला पशूंपेक्षां विशेष अशी विवेकबुद्धि दिलेली आहे. पशूंच्या ठिकाणीं कार्याकार्यविचार नसतो. माणसाला हा विचार करावा लागतो. पण आपल्या वासना पुष्कळ वेळां

इतक्या प्रबळ होतात कीं, विवेकबुद्धीला दाबून टाकून त्या तर्कशक्तीला आपल्या ताब्यांत ठेवतात. नंतर ही तर्कशक्ति न्यायअन्यायाचा कसलाहि विचार न करणाऱ्या पोटभरू वाकिलाप्रमाणें वासनांचा पक्ष घेते. जें सुखकारक असेल तेंच कल्याणकारक आहे, प्रेय असेल तेंच श्रेय आहे असें शाबित करण्यांत तर्कशक्ति खर्चिली जाते; त्यागांत असलेला आनंद विसरून भोगाची लालसा वृद्धिंगत होते; आणि तर्कशक्ति मधुर वाणीनें सांगते कीं, 'मनुष्यजन्म भोगासाठींच आहे; भोग भोगण्याचा मनुष्याला हक्क आहे, हा हक्क त्यानें उपभोगिला पाहिजे. भोगांतच मानवजीवनाचें साफल्य आहे. भोगक्षमता हीच संस्कृति आहे, हीच सुधारणा आहे.' अशा प्रकारें जो अधर्म असेल तोच धर्म आहे असें वाटूं लागल्यानें आत्मवंचना होते.

अशा प्रकारें पुष्कळसे लोक वासनेच्या आधीन झाले आहेत. 'सु' कशाला म्हणावें आणि 'कु' कशाला म्हणावें हें सुचत नाहींसें झालें आहे. उच्छृंखल मनाला तर्कशक्तीचा टेकू मिळाला कीं मग अनर्थ-परंपरेला कोण अडवूं शकणार? "ज्याच्यानें आत्मसंयम होऊं शकत नाहीं त्याला मनुष्यजात किती उंच चढूं शकते याची कल्पना कशी येऊं शकेल? असे लोक मानवजातीचें ध्येय कसें नक्की करूं शकतील? मानवजातीचें श्रेय कशांत आहे? कोणत्या वृत्तींना उच्च समजावयाचें? आर्यजीवन कसें असावें? अर्हत्-पदाचा मार्ग कोणता? समाजाचें अंतिम ध्येय कोणतें?" या बाबींचा निर्णय असे अनधिकारी लोक करूं शकत नाहींत. धनलोभामुळें हृदयशून्य झालेल्या कृपणाला विचाराल तर तो म्हणेल, 'पैसा! पैसा हेंच मानवजातीचें ध्येय आहे. अर्थो हि नः केवलम्।' शृंगाररसपूर्ण कथा-कादंबऱ्या वाचून बहकलेल्या स्त्रीलंपटाला विचाराल तर तो लागलीच 'रम्या रामा मृदुतनुलता'च्या गोष्टी करूं लागेल. तसेंच क्रिकेट व टेनिस खेळणारे लोक म्हणतील कीं, 'आमच्या खेळांनींच मनुष्याची उन्नति व्हावयाची आहे.'

गाणेंबजावणें, पत्ते, सोंगट्या, किंवा बुद्धिबळें खेळणें, शर्यती लावणें, पक्षी पाळणें वगैरे छंदांत तल्लीन झालेल्या लोकांना विचारावें कीं, 'बाबांनो! मानवजातीचें अंतिम ध्येय काय?' आणि मग एकेकाचीं उत्तरें ऐकून घ्यावींत.

ज्यानें आपल्या पशुवृत्तींवर विजय मिळविला आहे, ज्याचें मन क्षुद्र स्वार्थाच्या आधीन झालेलें नाहीं असा अनासक्त साम्यस्थित मनाचा महात्माच मनुष्याचें श्रेय कशांत आहे हें बरोबर ओळखूं शकेल. भांडणामध्यें न्याय कोणता आहे हें ज्याप्रमाणें पक्षकार पाहूं शकत नाहींत, तर निष्पक्षपाती पंचच तें जाणूं शकतात; त्याप्रमाणें मानवजातीचें ध्येय काय आहे, हें निरपेक्ष नि धर्मज्ञ असे स्मृतिकार समाजव्यवस्थापकच सांगूं शकतात. आपल्या पशुवृत्तीवर जय मिळवून मनुष्यप्राणी किती उंच चढूं शकतो हें बुद्ध, ख्रिस्त, तुकाराम वगैरे कित्येक महात्म्यांनीं प्रत्यक्ष उदाहरणांनीं दाखवून दिलें आहे. पृथ्वीच्या पाठीवर सर्व देशांत, सर्व जातींत, सर्व धर्मांत आणि सर्व युगांत अशीं देवमाणसें उत्पन्न झालीं आहेत. यावरून हें निर्विवाद सिद्ध होतें कीं, जर कोणताहि मनुष्य प्रयत्न करील तर तो त्या स्थानाप्रत पोहोंचूं शकतो.

मनुष्यप्राणी आपल्या पुरुषार्थानें काय काय करूं शकतो, कुठवर आपली उन्नति करूं शकतो, याचा पदार्थपाठ देण्यासाठीं, मनुष्यप्राण्याला त्याचें ध्येय किंवा श्रेय नक्की करून देण्यासाठींच परमेश्वर अवतार घेऊन, मानवदेह धारण करून मानवी कृति करतो, असें जें सांगण्यांत येतें त्याचें रहस्य देखील हेंच आहे. ध्येय ही मानवजातीच्या उन्नतीची परिसीमा आहे. ध्येय हें विशिष्ट काळ, विशिष्ट व्यक्ती आणि त्या व्यक्तींची शक्ति यांच्याप्रमाणें बदलावयाचें नसतें. जर एकाहि माणसानें हें ध्येय प्राप्त करून दाखविलें असेल तर तें शक्य कोटींतीलच समजलें पाहिजे.

या दृष्टीनें पाहिल्यास मनुष्याच्या जीवनक्रमाचीं दोन टोकें नक्की होतात. एका टोंकास विषयलोलुपता, आहारनिद्राभयादि पशुव्यवहार-परायणता, स्वार्थ नि हक्क हीं असतात. दुसऱ्या टोंकास निर्विषयता, निर्भयता, इंद्रियदमन, परोपकारपरायणता आणि कर्तव्य इतक्या वस्तु असतात. प्रत्येकानें आपली शक्ति आणि परिस्थिति यांच्याप्रमाणें हें उच्च ध्येय कृतींत उतरविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. पण आपल्या मागें राहिलेल्यांना जंगली किंवा पापी म्हणून आपण त्यांना हंसतां कामा नये. तसेंच आपल्याहून अधिक हिम्मत असलेल्यांना पागल म्हणूनहि चालणार नाहीं. आणि कांहीं झालें तरी उच्चतम ध्येयाला कधींहि अशक्य अप्राप्य ठरविणें हें चुकीचेंच होय. कारण जर आपण ध्येयाला एकदां का त्याच्या उच्च आसनावरून खालीं ओढूं तर त्याचा विनिपात शतमुखच नव्हे तर अनंतमुख होईल. जें स्थिर नाहीं तें ध्येय कसलें ? आणि त्याच्यासाठीं मनुष्यानें स्नेह, दया, सुख नि जीवन या सर्वांवर तिलांजलि देण्यास तयार व्हावें इतकी निष्ठाहि कशी उत्पन्न होणार ? म्हणून ध्येयाला त्याच्या स्थानापासून च्युत होऊं देतां कामा नये. आराध्य-देवतेप्रमाणें सदासर्वकाळ त्याची उपासना झाली पाहिजे; आणि ध्येयाबरोबर उत्तरोत्तर सालोक्य, सान्निध्य, सारूप्य व सायुज्य मिळविण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. जे मागें राहिले असतील त्यांना पुढें घेऊन गेलें पाहिजे; जे पुढें गेले असतील त्यांनीं त्याहूनहि पुढें गेलें पाहिजे. ध्येय गांठेपर्यंत कोणीहि थांबतां कामा नये.

सगळ्या सामाजिक सुधारणा या उच्च ध्येयाच्या, कर्तव्याच्या, इंद्रिय-निग्रहाच्या आणि संयमाच्या दिशेनें झाल्या पाहिजेत. जे खालीं असतील त्यांना वर आणलें पाहिजे. जे उंचावर असतील त्यांना खालीं आणणें, पवित्र ध्येय सोडून सुखसोय पाहून किंवा मानून अवर (कनिष्ठ) ध्येयावर येणें ही कुधारणा आहे, अधःपात आहे.

आजकाल सर्वांनाच सुधारणा हवी आहे. पण 'सु' आणि 'कु' यांमधील भेद मात्र कोणी पाहत नाहीं. 'पिनल कोडानें ज्याला गुन्हा म्हटलेलें नाहीं, काल पास होऊन आज रुबाब दाखविणाऱ्या डॉक्टरांनीं ज्याला निषिद्ध ठरविलेलें नाहीं तें सर्व करण्याचा आम्हांला हक्क आहे, आम्ही तें करणारच. पूर्वपरंपरा, उच्च मनोवृत्ति, आजपर्यंत वाढविलेली पावित्र्याची भावना, शास्त्रें (रूढींची तर गोष्टच काढावयास नको!) हें सर्व आम्ही झुगारून देणार.' आजच्या आमच्या सुधारकांची मनोवृत्ति ही अशी आहे. त्यांच्या कार्यक्रमांतील सर्व बाबी त्याज्य आहेत असें मला म्हणावयाचें नाहीं; पण या सर्वांच्या मुळाशीं असलेल्या वरील वृत्तीला मात्र माझी हरकत आहे खरी. आपल्या सर्व सामाजिक व्यवहारांत न्याय आणि उदारता हीं असलीं पाहिजेत. कोणावरहि टीका करतांना मनुष्यप्राणी हा स्खलनशील आहे, इंद्रियग्राम बलवान आहे, परिस्थिती-समोर मनाचा निश्चय टिकणें कठीण आहे, या सर्व गोष्टी ध्यानांत घेऊन चूक झाली असल्यास त्याबद्दल क्रोध किंवा तिरस्कार न करतां दया, अनुकंपा आणि सहानुभूति बाळगणेंच उचित होय. सामाजिक अन्याय होत असतील तेथें अनाथांचें रक्षण आणि पालन करणें हें देखील आपलें कर्तव्य आहे. सामाजिक आदर्शास खालीं ओढणें हें केव्हांहि योग्य म्हणतां येणार नाहीं. आणि ज्या सुधारणा करावयाच्या त्या अशाच केल्या पाहिजेत कीं, ज्यामुळें सामाजिक न्याय, पावित्र्य आणि सामर्थ्य हीं वाढतील.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना.
क्रमांक ..... दि: .....
अनुक्रमांक ..... दि: .....

अशान्तीची भीति ? : : : ८

समाज म्हणजेच शांति. शांतीशिवाय समाज असणेंच शक्य नाहीं. शांति ही समाजाच्या हाडींमाशीं खिळलेली असते.

निसर्गामध्यें आपल्याला असें दिसतें कीं, सर्वत्र शांतताच आहे. अधूनमधून वावटळें उठतात खरीं, पण तीं सर्व शांत होतात. जेव्हां निसर्ग रुद्रावतार धारण करतो, आकाशांत मेघगर्जना होते, वीज कडाडून आकाशाला भेदते, पृथ्वी थरथरा कांपते, मुसळधार पाऊस मोठमोठे प्रदेश धुवून काढतो, चीनसारखे विस्तृत देश जलमय होऊन जातात, डोंगरपर्वत भग्न होतात, भूकंपामुळें मोठमोठीं शहरें पृथ्वीच्या उदरांत लुप्त होऊन जातात आणि सागरामध्यें गगनचुंबी लाटा उसळतात,—जणूं काय विश्वाला चाटणाऱ्या मृत्यूच्या जिभाच !—तेव्हां आपल्याला

वाटतें कीं, 'हेंच निसर्गाचें खरें स्वरूप आहे. दररोजची शांतता विदेशी सरकारच्या सौम्यतेसारखीच भ्रामक वस्तु आहे. निसर्गाच्या पोटांत तर विनाशच आहे. सृष्टि उत्पन्न केली जाते ती सर्वच्या सर्व सृष्टीचा एकदम प्रळयकाळ घडवून आणण्याचा आनंद उपभोगण्यासाठींच एकेका पावलाखालीं एकेका विश्वाचा चुराडा करणाऱ्या महाकालाचें भैरव तांडवनृत्य हेंच सृष्टीचें अंतिम सत्य आहे.' याविषयीं मनांत थोडीदेखील शंका उरत नाहीं. वादळ जेव्हां प्रत्यक्ष होतें तेव्हां त्याची सत्यता व महत्ता हीं वास्तविक स्थितीपेक्षांहि आपल्याला जास्त वाटतात. अखेर अशा वावटळाचा देखील शेवट होतो, आणि शांत प्रकृति हळूहळू आपलें साम्राज्य सर्वत्र पसरविते. विश्वसाक्षी तारे आनंदानें तें पाहतात; प्रकृतीची प्रकृति खरोखर शांतिमयच असते. अशांति ही शांतीला जास्त स्पष्ट, समर्थ आणि सुदृढ करण्यासाठींच असते.

आपल्या शरीरांत पहा जोंपर्यंत आपला आहारविहार नियमित चालत असतो, आपला उद्योग आणि विश्रांति हीं प्रमाणबद्ध असतात तोंपर्यंत शरीर कसें निमूटपणें चालत असतें! आपण देहधारी आहोंत ही गोष्टच आपण विसरून जात असतो. दांत जेव्हां दुखूं लागतो तेव्हांच जाणीव होते कीं तोंडांत दांत आहेत. जर शरीरांत कांहीं विकृति उत्पन्न झाली, रोगाचे जंतु घुसले, आपल्या विहारांत अव्यवस्था झाली तर लागलीच ताप येतो, उलटी होते, डोकें दुखतें व अनेक विकार उत्पन्न होतात. एवढ्यावरून कोणी असें म्हणत नाहीं कीं, ताप, उलटी किंवा डोकेदुखी हीं माणसाची प्रकृति आहे. निसर्ग स्वभावतः आपल्याला शांतीकडे घेऊन जातो. वर्षानुवर्षे श्वासोच्छ्वासाचा भाता चालविणारें शरीरहि खरें पाहिल्यास आपल्याला आरोग्याकडे घेऊन जाण्याचाच प्रयत्न करीत असतें.

आणि राष्ट्राच्या इतिहासांत तरी आपण काय पाहतों? अद्भुत रसाचे रसिक इतिहासकार युद्धें, बंडें, क्रांत्या आणि असलेच दुसरे

उत्पात फुगवून लिहितात. तरीहि जर आपण कालगणना करावयास लागलों तर राष्ट्राच्या जीवनांत बंडें, युद्धें आणि क्रान्त्या या आजारा-इतकाच काळ व्यापतात असें दिसून येईल. खून, कत्तल, अत्याचार हे वाटेल तितके वाढले तरीहि शेवटीं शांत होतात आणि पुन्हां पहिल्यासारखा लोकव्यवहार चालू होतो. पुन्हां बैल डोळे मिटून नांगर ओढतो, शेतकरी भूमातेला सुजला, सुफला आणि शस्यश्यामला पाहतो, ब्राह्मण वार्षिक बेडकांप्रमाणें वेदघोष करतात. पंडित ज्ञानाचें क्षेत्र नांगरतात, कारागीर माणसाचें कौशल्य विकसित करतात, आणि पौष्टिक परिश्रमानंतर मजूर लोकगीतें ललकारतात; माता आपल्या मुलांना वाढवितात आणि मुलें शाळा चुकवून खेळत राहतात. जगाचा शांत व्यवहार खंडित किंवा अखंडपणें नेहमीं चालूच असतो. शांति हाच निसर्गाचा स्वभाव आहे. वादळ, विग्रह, विनाश हे देखील बिघडलेल्या शांतीला, गंजलेल्या शांतीला पुन्हां ताजी करण्यासाठीं, प्रयत्न करीत असतात.

गांधीजींनीं एके ठिकाणीं असें म्हटलें आहे कीं, ' चोहोंकडे मृत्यूचें निरपवाद साम्राज्य पसरलेलें असूनहि शेवटीं जीवनाचाच विजय होतो. जीवन टिकलें आहे यावरूनच हें सिद्ध होतें कीं, हिंसेपेक्षां अहिंसा ही श्रेष्ठ आहे. अहिंसा हेंच जीवनाचें खरें रहस्य होय.'

शरीरामध्यें जितकी शक्ति उत्पन्न होते तिच्यापेक्षां शक्ति कमी होण्याचें प्रमाण जर वाढलें तर तें शरीर क्षीण होऊन गळून पडतें. ज्या दुकानांत प्राप्तीपेक्षां खर्च जास्त होतो तें अखंड चालूं शकत नाहीं; तें बंद झालेंच पाहिजे; त्याचें दिवाळें निघालेंच पाहिजे. मृत्यूचें सामर्थ्य जीवनापेक्षां मोठें असतें तर जगामध्यें नुसता विनाशच पसरला असता, तो पाहण्यास, अनुभवण्यास किंवा स्वीकारण्यासहि कोणी हजर राहिलें नसतें. पण आपला असा अनुभव आहे कीं, जीवन सर्वत्र असतें,

तें यशस्वी होतें आणि मृत्यु हा जणूं काय जीवनाचा विजय पुनः पुनः सिद्ध करण्यासाठींच बंदीजनाप्रमाणें ठेवला असावा असें आपण स्पष्ट पाहूं शकतों.

जगांतील सरकारें आपल्याला नेहमीं असें बजावीत असतात कीं, 'आम्ही आहोंत म्हणूनच समाजांत शांति आहे; आम्ही नसतों तर लुटारूंनीं दिवसाढवळ्या तुम्हांला लुटलें असतें.' पण वस्तुस्थिति अशी आहे कीं, लोकस्वभावांत सज्जनता आहे, भलाई आहे, शांति आहे, म्हणूनच मनुष्यसमाज सुखी आहे. जर सगळ्या जनतेंत बंडखोर वृत्ति जागृत होईल तर जगांतील कोणतेंहि सरकार तिला अडवूं शकणार नाहीं. लहानमोठ्या फौजांना पराजित करतां येईल, परंतु एखाद्या सरकारच्या हातून सारें राष्ट्र पराजित झाल्याचें उदाहरणच सांपडत नाहीं. लोकांमध्यें शांत वृत्ति स्वाभाविक आहे म्हणूनच सरकारें हीं टिकलीं आहेत. सरकारें नसतीं तर जग कांहीं संकटांत सांपडलें नसतें. उलट असें म्हणतां येईल कीं, शांत वृत्तीच्या मनुष्यस्वभावानें बंडखोर वृत्तीच्या जोरदार लोकांना–अन्यायाची चटक लागलेल्या धूर्त लोकांना–लांच देऊन संघटित केलें आहे आणि त्या संघटनेलाच सरकार बनवून प्रतिष्ठा दिली आहे. अशा प्रकारें त्या टोळक्यांत कांहीं सज्जनता आली तर यावयाची. खेडेगांवांत चोरालाच कोतवाल बनविण्याची प्रथा अजूनहि आहे. सरकार जर जनतेला संरक्षण देत असेल तर तें संरक्षण त्याविरुद्धच असतें. ज्याप्रमाणें दरवडेखोर असें सांगतात कीं, 'आम्हांला इतके रुपये द्या, नाहींतर आम्ही तुम्हांला त्रास देऊं,' त्याचप्रमाणें सरकारें देखील सांगत असतात कीं, तुमच्या येथें दुष्काळ असो, कीं सुकाळ असो, आम्हांला चैन करावयाची आहे, आम्ही मागूं तेवढा पैसा द्या, नाहींतर तुमच्यावर सरहद्दीवरील गुंड लोकांना आक्रमण करूं देऊं,आंतील गुंडांना उत्तेजन देऊं किंवा शेवटीं आमचेच लोक कायद्याच्या नांवावर कायदेशीरपणें लुटालूट करतील.' चुकीच्या शिक्षणामुळें मनुष्यसमाज

असें मानून बसला आहे कीं, माणसाचा स्वभाव लुटालुटीचा आहे–नि सरकार त्याला अंकुशांत ठेवतें. वस्तुस्थिति मात्र तशी मुळींच नाहीं. मनुष्यजात ही स्वभावतःच शांतिप्रिय आहे. निसर्गहि शांतीलाच अनुकूल आहे, यामुळें जगांत शांति आहे. शांति म्हणजेच समाज !

समाज–जीवनाचा पाया : : : ९

आपल्या वैयक्तिक स्वार्थापायीं किंवा स्वतःच्या कामनापूर्तीसाठीं माणसानें आपलें आयुष्य उधळून टाकूं नये हें खरें आहे; परन्तु ज्या समाजांत तो राहतो त्या समाजाच्या हिताचीं कामें तर त्यानें मुळींच सोडतां कामा नयेत, अशा अर्थाची शिकवण गीतेमध्यें अथपासून इतिपर्यंत आहे. आजकाल आपण जेव्हां समाजाचें नांव घेतों, तेव्हां आपल्या धंद्यांतील, आपल्या जातीचे किंवा आपल्या देशांतील लोकच आपल्या डोळ्यांसमोर उभे राहतात. जेव्हां अत्यंत व्यापक दृष्टीनें विचार करावयाचा असतो तेव्हां सगळ्या मानवजातीचाच एक समाज कल्पिण्यांत येतो. गीतेचा समाज असा संकुचित नाहीं. त्यांत (१) कीट-पतंगादि सूक्ष्म जंतू, (२) पशुपक्ष्यादि आपलीं भोळीं भावंडें, (३) भूत-

प्रेतादि दुर्दैवी योनी, (४) बुद्धिपुरःसर कर्म करण्याचीं अधिकारी अशीं माणसें, (५) आपल्या कृतज्ञतेचे अधिकारी असे आपले पितर, आणि (६) आपले सनातन सहकारी असे देव--या सर्वांचा अन्तर्भाव होतो. आणि या सर्वांत व्यापून राहिलेला, सर्वांना ओळखणारा व सर्वांचें मार्गदर्शन करणारा असा (७) परम अध्यक्ष ईश्वर हा समाजाच्या शिखरावर असतो. या विराट समाजाचें आपण माणसें एक अल्प परंतु अविभाज्य असें अंग आहोंत. या व्यापक समाजासंबंधीं आपलें जें कर्तव्य आहे त्याचा आपण त्याग करूंच शकत नाहीं.

दैवी संपत्तीचें वर्णन करतांना या सामाजिक जीवनाविषयींचें आपलें कर्तव्य स्वीकारून तें बजाविण्यासाठीं आपण कोणकोणते सद्गुण अंगीं बाणविले पाहिजेत तें भगवंतांनीं सांगितलें आहे. त्यांमध्यें मानवजातीच्या सर्वोच्च आदर्शाचें चित्र येतें. अशा प्रकारची गुणसंपत्ति किंवा संस्कृति अंगीं बाणवून जीं सामाजिक कामें करावयाचीं असतात त्यांना गीता, कर्तव्य अथवा 'कार्यकर्म' असें म्हणते. गीतेनें त्याचे तीन विभाग केले आहेत यज्ञ, दान आणि तप ! गीतेच्या परिभाषेमध्यें या तिन्हींचा अर्थ काय होतो हें आपण खूप बारकाईनें तपासलें पाहिजे. यांनाच छांदोग्य उपनिषदांत 'धर्माच्या मोठ्या शाखा' या नांवानें वर्णिलें आहे. तेथें तपाच्या जागीं अध्ययन घातलें आहे, पण अध्ययन हें तपच होय, हें स्पष्ट केलें आहे.

यज्ञ, दान, आणि तप हा आपला सामाजिक धर्म असल्यामुळें प्रत्येकाचा अर्थ आपण नीट तपासला पाहिजे.

— १ —

प्रथम आपण दानाचा विचार करूं. याचक दारावर भीक मागण्यासाठीं आले असतां त्यांना आपण राजीखुशीनें किंवा त्रासून जें कांहीं

देतों त्याला आपण दान असें म्हणतों. गीतेला हा अर्थ मान्य नाहीं. दान ही कांहीं मर्जीची किंवा उदारतेची गोष्ट नव्हे. तें एक कर्तव्यकर्म आहे. जर आपण दान न देऊं तर आपल्या मेहनतचिं फळ उपभोगण्याचा अधिकार देखील धर्म आपल्याला देत नाहीं.

जें कांहीं मिळवाल तें सर्वांत वांटून, हिस्से करून घ्या, उपभोगा! अशी धर्माची खास आज्ञा आहे. 'संविभागश्च सर्वशः' हें धार्मिक जीवनाचें अगत्याचें लक्षण आहे. आपण जो कांहीं लहानमोठा पुरुषार्थ करतों त्यांत सबंध सृष्टीचा वांटा असतो. सर्वांच्या पुरुषार्थाशिवाय फळ उत्पन्नच व्हावयाचें नाहीं. परिश्रमांत जर श्रमविभाग असेल तर फळांत देखील संविभाग असलाच पाहिजे, हा सामाजिक न्याय दुनियेमध्यें अंमलांत येत नसला तरी त्याचा स्वीकार हा केला गेलाच आहे. गेल्या पन्नास वर्षांत सारें जग, आणि विशेषतः पाश्चात्य जग जर कोणत्या एका गोष्टीसाठीं धडपड करीत असेल तर ती म्हणजे संविभागाचें कांहीं ना कांहीं शास्त्र निर्माण करणें, संपत्तीची वांटणी न्याय्य रूपानें करणें, ही होय. यामधूनच भिन्न भिन्न योजना असलेला व अनेक रूपांनीं प्रकट झालेला समाजसत्तावाद जागृत झाला आहे.

एवढयानें जेव्हां संतोष झाला नाहीं तेव्हां मेहनत करणारे आणि मेहनत न करणारे–समाजसेवक आणि समाजद्रोही–अशा भेदाची कल्पना करून लोक अखेर साम्यवादापर्यंत जाऊन पोहोंचले. आणि या कल्पनेस अंमलांत आणण्यासाठीं रशियासारख्या महान् राष्ट्रानें एक जबरदस्त प्रयोग आरंभिला आहे.

या सर्व प्रयोगांना जगांत स्थान आहे. समाजाची रचना अमुक रीतीनेंच व्हावी आणि अमुक रीतीनें होऊं नये असें फर्मान कोण काढूं शकेल? प्रजेला जें रुचलें असेल त्याचा प्रयोग ती करावयाचीच. परंतु अनुभव मात्र असा येत आहे कीं, प्रत्येक व्यवस्थेंत, प्रत्येक

नियंत्रणांत कांहीं ना कांहीं कमतरता ही राहून जातेच. एक उणीव टाळावयास जावें तों दुसरी उणीव दत्त म्हणून उभी राहते. जुन्या उणीवांना कंटाळलेला लोकसमाज त्यांना टाळण्यासाठीं नव्या उणीवा राजीखुशीनें विकत घेतो. नव्या उणीवा वाटेल तितक्या खराब असल्या तरी 'तसा अनुभव नाहीं' एवढें तरी त्यांच्या बाजूनें अवश्य सांगतां येईल.

कोणत्याहि व्यवस्थेंत ज्या उणीवा राहून जातात त्या दूर करण्यासाठीं व्यवस्थेहून निराळा इलाज म्हणजे दान होय. हा इलाज मनुष्याची बुद्धि आणि भावना यांच्यायोगें अंमलांत येतो. आणि प्रत्येक व्यक्तीनें हा स्वेच्छेनें स्वीकारावयाचा असतो. व्यवस्था ही नियमबद्ध असल्यामुळें पुष्कळ वेळां आंधळी असते. तिला अपवादांची पुरेशी जाणीव नसते. व्यवस्था आणि कायदा यांच्या हुकमांत राहूनहि अमुक अन्याय राहूनच जातात ही गोष्ट मनुष्यहृदय ओळखतें. म्हणून त्या हृदयालाच सुसंस्कृत बनवून त्याच्यावरच अशी जबाबदारी सोंपविण्यांत येते कीं, सामाजिक हिताचा विचार करून सर्वांच्या सुखाचा व उत्कर्षाचा आदर्श मनांत बाळगून जें कांहीं करावें लागतें, स्वतःच्या हक्कामधून काढून द्यावें लागतें तें स्वेच्छेनें व स्वतंत्रबुद्धीनें अंमलांत आणावयाचें हा दानधर्म होय. समाजाचें समाधान, संतोष आणि प्रसन्नता हीं याच गोष्टींवर अवलंबून असतात. हें दान प्रेमधर्मामधूनच झिरपत असतें, कौटुंबिक भावनेमधून त्याचें स्फुरण होत असतें, त्याच्यामागें न्यायाच्या विचारापेक्षां सर्वोदयाचा विचार अधिक असतो. म्हणून गीतेनें खास सांगितलें आहे कीं, तिरस्कार करून तें देतां यावयाचें नाहीं; आपला फायदा पाहून तें देतां यावयाचें नाहीं; दानांमध्यें साटेंलोटें करावयाचें नसतें, तर सामाजिक हित ध्यानांत घेऊन देश-काल-पात्र तपासून, प्रत्युपकाराची आशा न बाळगतां—जेथें असा संभव देखील नसेल अशा स्थानीं, केवळ धर्मबुद्धीनें, कर्तव्यबुद्धीनें दान दिलें पाहिजे.

आजच्या जमान्यांत प्रत्येक क्रियेमागें स्पष्ट लाभ पाहिल्याशिवाय लोकांना संतोष होत नाहीं. धर्माच्या कामींसुद्धां मोबदल्याची वृत्ति दिसून येते. 'हरिजनांना जर आपण एवढें दिलें तर त्याच्याऐवजीं आपल्याला काय मिळेल?' या प्रश्नाची चर्चा केल्याशिवाय कोणतीहि सूचना व्यवहार्य समजली जात नाहीं. केवळ धर्माचें पालन हा साधुपुरुषांचा मनोविनोद समजला जातो; तें त्यांचें वैभव गणलें जातें. अशा प्रकारें सामाजिक जीवनाचा सर्वोच्च सद्गुणच मारला जातो. दानाशिवाय समाज चालूंच शकणार नाहीं. आणि तें दान देखील वर सांगितलेल्या शुद्ध सामाजिक दानवृत्तीनेंच झालें पाहिजे.

— २ —

यज्ञ, दान व तप या तीन महान् सामाजिक कर्तव्यांपैकीं आपण दानाचा विचार केला. वाटेल तेवढा प्रयत्न केला तरी समाजांत संपत्तीची अमुक विषमता ही राहावयाचीच. ही विषमता नियमानें किंवा व्यवस्थेनें काढून टाकणें कठिण आहे व ती सहन करणें देखील परवडणार नाहीं. अशी ही विषमता काढून टाकण्यासाठीं धनवान् व्यक्तीनें आपण होऊन स्वेच्छेनें प्रयत्न केला पाहिजे. ज्यांच्याजवळ असेल त्यांनीं, ज्यांच्याजवळ नसेल त्यांना स्वेच्छेनें दिलें पाहिजे, व अशा प्रकारें अन्याय व भेद जितपत शक्य असेल तितपत मिटविले पाहिजेत; याचें नांव दान. हें आपण पाहिलें. आतां तपाचा विचार करूं.

व्यक्तीमध्यें आणि समाजामध्यें प्रत्येक प्रकारची शक्ति निर्माण करण्यासाठीं किंवा वाढविण्यासाठीं जे कांहीं शारीरिक किंवा इतर कष्ट सहन केले जातात तें तप होय. तप हें सर्जनात्मक (उत्पादक) आहे. परमात्म्याच्या तपामधूनच या सृष्टीची उत्पत्ति होते. समाजांत जीं कांहीं नवीं तत्त्वें दाखल झालीं, विचारांचें मंथन झालें, शक्तीचें चयन (संचय)

झालें तें सर्व तपाचेंच फळ होय. जें कांहीं कठिण असेल, अशक्य वाटत असेल तें तपानें जरूर प्राप्त व्हावयाचें. तपासमोर कोठलीच अडचण टिकत नाहीं. जे कांहीं मोठमोठे पराक्रम होतात, शोध लागतात, नव्यानव्या योजना अंमलांत येतात, पुरुषार्थ प्रगट होतात ते तपाचेच वेगवेगळे प्रकार होत. ज्ञानाची वृद्धि झाली ती तपानेंच. हिमालयामधून बंगालच्या उपसागरापर्यंत भगीरथानें जी गंगा आणली ती तीन पिढ्यांच्या तपानेंच. देव तप करतात, दानव तप करतात, माणसें तप करतात आणि राक्षस देखील तप करतात. तपाशिवाय सामर्थ्य नाहीं. निमूटपणें कित्येक वर्षे उन्हांत बसणें हें देखील एक तप आहे. पण तें निरर्थक असूं शकतें. युरोपांतील मोठमोठे प्रवासी आफ्रिकेंतील रणांत आणि जंगलांत शोध लावण्यासाठीं भटक भटक भटकले. हें देखील तपच होय. त्यांतून मोठी शक्ति उत्पन्न झाली. त्या शक्तीचा दुरुपयोग करून बेल्जियमसारख्या देशांनीं आफ्रिकेमध्यें इतका कांहीं जुल्म केला कीं युरोपांतील स्वार्थी जनता देखील हादरून गेली.

गीतेंत सांगितल्याप्रमाणें तप तामसीहि असतें, राजसहि असतें आणि सात्त्विकहि असतें. कांहीं कारण नसतां सबंध जन्मभर उजवा हात डोकीवर ठेवून तो सुकवून टाकणें आणि तो सूर्यनारायणाला अर्पण केला आहे असें मानणें हें तामसी तप होय. कांगोच्या गरीब जनतेला अमानुषपणें छळून जगाला रबर पुरविणें हें भयानक राजसी तप होय. हरतऱ्हेचीं संकटें झेलून व अडचणी सोसून लोकहिताचीं अनेक कामें पार पाडणें हें उत्तम आणि सात्त्विक तप होय.

समाजांतील एखाद्या भ्रामक समजुतीच्या आहारीं जाऊन, लोकभ्रमाचे गुलाम बनून फुकटाफाकटीं अडचणी सोशीतच राहणें हें तामसी तप होय. अशा तपाला धर्माचें विधान समजून चिकटून राहणें आणि

जेव्हां एखादी धर्मज्ञ व्यक्ति तें सोडून देण्याची सूचना करूं लागते तेव्हां धर्माची मर्यादा मोडली जाण्याचें भय बाळगणें ही तामसी जडता होय. अशा हट्टीपणाला गीतेंत 'मूढग्राह' म्हटलें आहे. यांत आपण तर जेरीस येतोंच, शिवाय इतरांनाहि नकोनकोसें होऊन जातें.

सामाजिक अन्याय दूर करणें, सामाजिक गैरसोयी कशा कमी होतील याची काळजी करून नवीन व्यवस्था दाखल करणें, ज्यांमुळें जनतेची शक्ति वाढेल असे शोध लावणें, समाजहितासाठीं कारखाने चालविणें, संस्था उघडणें हें सर्व तपच होय. ज्या समाजांत तप उरलें नसेल त्या समाजावर जरी कोणी बाहेरून आक्रमण केलें नाहीं तरी आपल्या जडतेनेंच तो गतप्राण व्हावयाचा. अज्ञानानें, लाचार होऊन कष्ट करण्यास तयार होणें हें कांहीं तप नव्हे. अशा तऱ्हेचे कष्ट आपल्या देशांतील लोक भोगीत आलेच आहेत. त्याऐवजीं जर समजून-उमजून आणि योजनापूर्वक अशाच तऱ्हेचे कष्ट आपण झेलूं लागूं तर त्यामधून जनतेचें कल्याण होईल, सामाजिक शक्ति वाढेल आणि ते कष्ट तपाच्या पदवीस प्राप्त होतील. ज्या देशांतील लोक उत्साही, उद्योगी आणि करारी असतील, तोच देश तपस्वी आहे असें म्हणतां येईल. तपाच्या मागोमाग प्रत्येक प्रकारची समृद्धि, प्रत्येक प्रकारचें सामर्थ्य आणि या दोहोंमुळें होणारा विकास हीं सर्व यावयाचींच. कोणाहि व्यक्तीला तप हें सोडतां यावयाचें नाहीं. न त्याज्यं कार्यमेव तत्।

— ३ —

सामाजिक पुरुषार्थ वाढविण्यासाठीं तपाची आवश्यकता असते, म्हणजे समाजाची आदर्श रचना नक्की करून, आणि सामाजिक जीवनाचा अंतिम आदर्श पूर्णपणें समजून घेऊन तेथपर्यंत पोहोंचण्या-साठीं कोणकोणत्या शक्ती मिळविल्या पाहिजेत, कसले कसले पर्वत

ओलांडले पाहिजेत वगैरे सर्व गोष्टींचा विचार करणें हें देखील तप आहे. आणि त्याप्रमाणें संकटें सोसून, अंगीं कौशल्य बाणवून पुढें पुढें जात राहणें हें देखील तप आहे. प्रत्येक व्यक्तीचें जीवन समाजहितामध्येंच वावरलें जावें आणि व्यक्तीला त्यांतूनच आनंद मिळावा अशाप्रकारें व्यक्तींना शिक्षण देणें याचें नांव तप. या तपाचा विचार आपण ज्ञानाबरोबर केला. खरें पाहिल्यास प्रथम तप येतें, तपामुळें जी साधनसंपत्ति गोळा होते ती असमान होऊन शापरूप न बनावी यासाठीं दानाच्या द्वारें ती समान करावयाची असते. तप ही शक्तीची उत्पत्ति आहे. दान हा संपत्तीची असमान वांटणी सुधारण्याचा उपाय आहे.

पण संपत्ति–साधनसंपत्ति–ही शेवटीं उपभोगासाठींच असते. उपभोगानें साधनें आणि सामर्थ्य या दोहोंचा नेहमीं नाशच होतो. हें नुकसान भरून काढून समाजाची स्थिति पूर्ववत् समर्थ बनविण्याच्या हेतूनें जी कांहीं प्रवृत्ति केली जाते तिला यज्ञ असें म्हणतां येईल. तपामध्यें वैयक्तिक स्वार्थाला वाव असतो. तप हें कधीं कधीं समाजद्रोही वृत्तीनें देखील आचरिलें जातें. दानामध्यें स्वार्थ, एकांगीपणा, दंभ, पाखंड वगैरे दोष येऊं शकतात. परोपकाराच्या द्वारें आपला व्यापक स्वार्थ साधण्याचा उत्कृष्ट पंथ म्हणजे यज्ञ होय. निसर्गाकडून, किंवा समाजाकडून जितकें मिळविलें किंवा उपभोगिलें असेल त्याचा मोबदला समाजाला आणि सृष्टीला परत देण्यासाठीं निष्कामबुद्धीनें आवश्यक अशीं कर्में करणें हा यज्ञ होय. यज्ञ आहे म्हणूनच समाज व जग हीं टिकून राहिलीं आहेत. यज्ञ हा सामाजिक धर्माचा उत्कर्ष आहे. 'जीवनचक्र' या लेखांत यज्ञाचें स्वरूप मीं विस्तृतपणें समजाविलें आहे म्हणूनच येथें त्याची पुनरुक्ति करण्याची आवश्यकता नाहीं.

तप, दान आणि यज्ञ–यज्ञ, दान आणि तप हीं महान सामाजिक कर्तव्यें जोंपर्यंत चालू असतात तोंपर्यंत मनुष्यसंस्कृति पुढें जात असते,

आणि सर्वत्र सुख-शांति व समृद्धि पसरते. या तिन्ही प्रवृत्ती सर्व भूतांच्या हिताच्या दृष्टीनें करण्यांत येतील तर समाज सुखी होईल आणि तसें करणाऱ्या व्यक्तीचा उद्धार होईल. स्वतः भगवानांनीं आपल्या मुखानें गीतेमध्यें असें सांगितलें आहे कीं, कोणत्याहि निमित्तानें हीं तीन कर्तव्यें सोडतांच यावयाचीं नाहींत.

सुधारणांचें मूळ : : : १०

आगगाडीमध्यें कधीं कधीं गर्दी नसली तरीहि लोक भांडणें करतात. प्रत्येक जण आपल्यापुरती जागा घेऊन बसेल तर सर्वजण व्यवस्थित बसूं शकतात. पण कांहीं लोक विनाकारण स्वार्थी व मनुष्यशत्रु असतात. झगडून जितकी जागा अडवून ठेवतां येईल तेवढी ठेवावयाची असा त्यांचा हट्ट असतो. मग तसें करतांना बसण्याची सोय कांहींहि होत नसली व उलट स्वतःलाच त्रास सोसावा लागत असला तरी हरकत नाहीं. बाकावर जास्त जागा अडविण्यासाठीं ते मांडी घालून बसतात आणि पायाचे सांधे दुखूं लागेपर्यंत मांडी रुंद करतात! जोंपर्यंत आपला पाय दुसऱ्याला लागत नाहीं तोंपर्यंत आपल्या स्वार्थाचें संपूर्ण संरक्षण होतें अशी त्यांच्या मनाची खात्रीच होत नाहीं. असें न

करतां जर प्रत्येक मनुष्य सज्जनपणानें एकमेकांच्या सोयीविषयीं जागृत राहून संतोषवृत्ति बाणवील तर कोणालाहि दुःख होणार नाहीं आणि सर्वजण मजेंत प्रवास करूं शकतील.

शहरामध्यें किंवा खेडेगांवांत लोक जेव्हां घरें बांधतात तेव्हांदेखील शेजाऱ्याशेजाऱ्यांमध्यें भांडणें हीं होतातच. तेथेंदेखील लोक सुखदुःखाचा किंवा सोयी-गैरसोयींचा विचार बाजूला सारून आपल्या स्वार्थधर्माशीं प्रामाणिक राहण्यासाठीं पुष्कळ वेळां झगडत असतात. एक वीत जमीन माझ्या शेजाऱ्याला देण्यानें माझें कांहींच नुकसान होत नसलें आणि माझ्या शेजाऱ्याचा वाटेल तितका फायदा होत असला तरी देखील माझ्यानें तेवढा स्वार्थ सोडवतच नाहीं; माझें मनच धजत नाहीं. आणि जर यदाकदाचित् माझ्यामध्यें एवढी सद्बुद्धि स्फुरली तर माझे नातेवाईक किंवा शेजारीपाजारी मला सांसारिक शहाणपण शिकवावयास यावयाचेच. "वेड कां लागलंय तुला? असा कर्णदानेश्वर बनून परोपकार करूं लागलास तर लोक तुला दिवसाढवळ्या गोसावी बनवितील. मुलांबाळांसाठीं तरी कांहीं ठेवावयाचें आहे कीं नाहीं? त्याचें काम जरा अडून राहिलें आहे तर घे मागून त्याच्याजवळून पांच-सहाशें रुपये. तुझा हक्क आहे तो. सोडतोस काय म्हणून? नसेल देणार तर जाऊं दे त्याला वाटेल तेथें. आपलें काय अडलें आहे? आपली जमीन आपल्याजवळ पडलेली आहेच कीं!" बस्स. स्वार्थधर्माचें हें फर्मान कसें मोडावयाचें? स्वार्थधर्मापुढें शेजारधर्म ढिला पडतो, किंवा मरून जातो. म्हणूनच या युगाचें नांव कलियुग असें पडलें आहे. कलि म्हणजे कलह.

दोन कुटुंबांमध्यें जेव्हां विवाहसंबंध जोडला जातो तेव्हां देखील अशीच दशा असते. जे परके होते ते संबंधी झाले म्हणून त्या ठिकाणीं प्रेमधर्म अंमलांत आला पाहिजे. पण छेः! तेथें देखील व्यवहारी रीतींचे

झगडे उत्पन्न व्हावयाचेच. मानपानाच्या बाबतींतील एकहि अट ढिली करावयास लोक तयार होत नाहींत. आपल्या मालकाकडून शिव्या खाव्या लागत असल्या तरी त्या वेळीं कांहीं हरकत नसते, परन्तु व्याह्यांपासून रीतीप्रमाणें पुरेपूर हें मिळालेंच पाहिजे. नाहींतर नवऱ्यामुलाला घेऊन परत जाण्याची धमकी ! विवाहाचा मंगलाचरणच मुळीं ईर्ष्या आणि हेवादावा यांनीं गायिला जावयाचा ! हीच गोष्ट जातीं-जातींमध्यें. जिकडे पाहावें तिकडे परस्पर अविश्वास आणि स्वार्थ सोडण्यांतील भित्रेपणा हींच पसरलेलीं दिसतात.

घरांत असें, जाती-जमातींत असें तर मग राष्ट्राराष्ट्रांमध्यें तरी दुसरें काय असूं शकणार ? शेजारचें राष्ट्र दुर्बल असेल तर त्याच्यावर प्रत्येक राष्ट्रानें चढाई केलीच पाहिजे. जर तें बलिष्ठ असेल तर नेहमीं मनांत त्याची भीति बाळगली पाहिजे; आणि त्याच्याविरुद्ध दुसऱ्या बलवान् राष्ट्राशीं संगनमत केलें पाहिजे. शेजारी समान शक्तीचे असतील तर ते स्वस्थ बसतील असेंहि नाहीं. कारण माणसाला समानता रुचतेच कोठें मुळीं ? वरिष्ठता मिळविण्याचा प्रयत्न हा चालावयाचाच. म्हणून शेवटीं तेथेंहि अविश्वास आणि विरोध असावयाचा. प्रत्येक पक्ष असेंच म्हणत असतो कीं बचावासाठीं, आत्मरक्षणासाठीं आम्हांला एवढें करावेंच लागतें. दोन प्रबळ राष्ट्रांमध्यें एक छोटेसें राष्ट्र असतें तेव्हां प्रत्येक प्रबळ राष्ट्र असा विचार करतें कीं, ' मी जर याला खाऊन टाकलें नाहीं तर दुसरा याला खाणारच. व त्याला खाऊन बलवान बनलेला असा तो माझ्यावर चढाई करणारच. याऐवजीं जर मींच तो अन्याय केला तर काय वाईट ? ' साम्राज्यें वाढतात तीं या नियमाप्रमाणें !

स्वार्थ आणि अन्याय यांची ही चढाओढ युरोपांत आज सार्वत्रिक झाली आहे. आणि त्याच सिद्धांतांवर त्यांचें राजकारण चालू असतें. म्हणून तोच मनुष्यस्वभाव आहे असें समजणें अत्यंत चुकीचें होईल.

आज युरोप सुव्यवस्थित पाशवी शक्तीला खुशाल सुधारणा समजो, पण खरी सुधारणा ही प्रेमधर्मांतच आहे. हा शेजारधर्म आपण श्रद्धेनें अंगीं बाणविला पाहिजे. जे सज्जनता दाखवितात त्यांच्याशीं मैत्री आणि जे दुर्जन बनले असतील त्यांच्याशीं असहकार हाच प्रेमधर्माचा नियम होय. प्रेमधर्म सहानुभूति देतो, मदत देतो पण दीन बनून मदतीची अपेक्षा मात्र बाळगीत नाहीं. प्रेमधर्म निर्भय असतो आणि म्हणूनच तो अमर्याद असतो. आपण ज्याच्यावर प्रेम करतों त्याची शक्ति वाढल्यास आपल्याला भय वाटावयाचें नाहीं. याच्या उलट ज्याच्याशीं आपली मैत्री आहे, तो जितका दुर्बल असेल तेवढी आपली शक्ति कमी असते.

जेथें अविश्वासाचें वातावरण असेल, तेथें तें दूर करण्यासाठीं प्रेम हें असाधारण धैर्य आणि सहिष्णुता निर्माण करतें, नम्र होऊन वर चढतें, आणि पुष्कळ गोष्टी गमावूनहि विजय प्राप्त करतें. प्रेमधर्मामध्यें गमावणें हें थोड्या दिवसांपुरतेंच असतें. पण त्याचा विजय हा अक्षय असतो. या प्रेमधर्माचा उपयोग कौटुंबिक संबंधापासून आंतरराष्ट्रीय संबंधापर्यंत विस्तृत करणें हेंच सर्व सुधारणांचें मूळ होय, आणि फळ देखील तेंच होय !

जीवन–चक्र : : : ११

तप, भोग आणि यज्ञ—हें एक महान जीवन-चक्र आहे. मनुष्य कामनेनें प्रेरित होऊन संकल्प करतो. तो संकल्प पार पाडण्यासाठीं मनुष्य जी जी प्रवृत्ति आचरितो तें सर्व तप या नांवानें ओळखलें जातें. ही प्रवृत्ति आपोआप किंवा स्वतःच प्रिय असते असें नाहीं. तर संकल्प-सिद्धीच्या आशेमुळेंच मनुष्य तेवढी प्रवृत्ति खुषीनें किंवा उत्साहानें शिरावर घेतो. या तपाच्या शेवटीं फलप्राप्ति होते. फलप्रातीनंतरची क्रिया म्हणजेच भोग होय. फलभोग ही वस्तु आपण समजतों त्याहून जास्त गूढ आहे. फलोपभोगामध्यें फक्त तृप्तिच असती तर त्यांतच माणसाला आत्मसाक्षात्कार झाला असता. पण फलोपभोगाच्या आनंदांतच विषण्णता राहिलेली आहे. प्रत्येक आनंदांत आपण न कळत आत्म्याच्या

प्राप्तीची इच्छा करीत असतों. कामतृप्तीनें मिळालेल्या आनंदानंतर एक क्षणभर मोहाचा संतोष मिळवून अंतर म्हणतें 'मला हवें होतें तें हें नव्हे!' एवढ्यानें मानावर येऊन मनुष्य जर कामनाविमुख होईल तर त्याला आत्मप्राप्तीचा रस्ता मिळेल. पण सत्याचें तोंड सोन्याच्या झांकणानें झांकलेलें असतें. एक संकल्प पूर्ण होतो न होतो तोंच त्यामधूनच दुसरा संकल्प उद्भवतो आणि अशा प्रकारें पुन्हां नव्या तपांत नि नव्या भोगांत मनुष्य वाहवतो.

यांत यज्ञाला स्थान कोठें आहे? प्रत्येक उपभोग व कामनेनें केलेलें प्रत्येक तप हें निसर्गाकडून घेतलेलें ऋण होय. तें फेडूनच मनुष्य ऋणमुक्त होतो. मला अन्न खावयाचें आहे म्हणून मी जमीन नांगरतों, बी पेरतों, कांपणीपर्यंत शेतांत काबाडकष्ट करतों व अशा प्रकारें जमिनींचें सत्त्व काढून त्याचा उपभोग घेतों. जमिनींचें जेवढें सत्त्व मीं घेतलें तेवढें जमिनीला परत देणें, जमिनीला तिची मूळची स्थिति प्राप्त करून देणें हें यज्ञकर्म होय.

प्रवासामध्यें मी एखाद्याच्या घरीं रात्रीपुरतां मुक्काम करतों; मला स्वयंपाक करावयाचा आहे, घरवाल्याकडून मी भांडीं मागून घेतों. त्या भांड्यांत मी जो स्वयंपाक करीन तें माझें तप होय; जेवण करीन तो भोग होय; इतकें केल्यानंतर घरवाल्याचीं भांडीं विसळून पूर्वीसारखीं करून देणें हें माझें यज्ञकर्म आहे.

मला तलावांत किंवा विहिरीवर आंघोळ करावयाची आहे. मी पाणी काढून घेतों, हें माझें तप. आंघोळ करतों, हा माझा भोग. त्यानंतरचा माझा यज्ञ कोणता? पुष्कळ लोक–जवळजवळ सर्वच–असा विचार देखील करीत नाहींत कीं, आतां कांहीं करावयाचें बाकी उरलें असेल. शास्त्रामध्यें लिहिलें आहे, "तलावामध्यें जर तुम्ही स्नान कराल तर त्या तलावामधून तुम्ही शवय तितका गाळ काढून टाका." हें आपलें

यज्ञकर्म. जर आपण विहिरीवर आंघोळ करीत असूं तर त्या विहिरीच्या आसपासची घाण काढून टाकणें हें आपलें आवश्यक यज्ञकर्म होय.

गीता म्हणते, "असें यज्ञकर्म जो करणार नाहीं तो चोर होय. तो पापी नि स्वार्थी मनुष्य आपल्या देहाला त्रास देऊं इच्छीत नाहीं. (अघायुरिन्द्रियारामः), तो समाजाकडून सेवा घेतो पण उसनें घेतलेलें परत देत नाहीं. जो माणूस उपभोग घेतो पण यज्ञ करीत नाहीं त्याचा हा लोक बिघडतोच मग परलोक तरी कोठून असणार?"

हिन्दुस्तानांत अशा यज्ञकर्माचा लोप झाला आहे, म्हणूनच हिन्दुस्तान कंगाल व पामर बनला आहे. आपण स्त्रियांकडून सेवा घेतों पण तिचा मोबदला आपण त्यांना देत नाहीं. शेतकऱ्यांच्या मेहनतीचें फळ आपण उपभोगतों पण ज्यामुळें शेतकऱ्यांचें कल्याण होईल असें यज्ञकर्म करीत नाहीं. आपण अंत्यजांना समाजसेवेचा पाठ शिकवितों, सक्तीनेंहि त्यांच्याकडून सेवा करून घेतों पण त्यांचा उद्धाररूपी यज्ञकर्म न करण्याइतके हाडाचे निमकहराम आपण बनलों आहोंत. आपण सार्वजनिक लाभ मिळविण्यासाठीं नेहमीं पुढें पुढें करीत असतों पण आपलीं सार्वजनिक कर्तव्यें आपण क्वचितच पार पाडतों. यामुळें सगळा समाज दिवाळखोर बनला आहे.

मोक्षशास्त्र सांगतें, "न्यायासाठीं देखील तुम्हांला यज्ञ केला पाहिजे. उपभोगासाठीं केलेलें तप हें अर्धें कर्म व यज्ञकर्म ही त्याची पूर्तता होय. तुम्ही तप करतां आणि यज्ञ करीत नाहीं. म्हणूनच तुमच्या वासना अमर्यादपणें वाहवत असतात. यज्ञ कराल तर उपभोगाची इच्छा मर्यादित राहीलच पण तुमचें जीवनहि निष्पाप होईल."

प्रत्येक मुलानंतर बालसंगोपनासाठीं सात वर्षें पर्यंत ब्रह्मचर्य पाळण्याचा निश्चय जर स्त्रीपुरुष करतील तर दीन, निःसत्व बनून समाजाच्या दयेवर अवलंबून राहण्याचा प्रसंग त्यांच्यावर येणार नाहीं.

यज्ञ केल्यानंतर–ऋण फेडल्यानंतर–मनुष्य जें तप करतो, जो भोग भोगतो, तो त्याच्या हक्काचा असतो. त्यामुळें त्याला किल्मिष प्राप्त होत नाहीं. त्याची प्रवृत्ति निष्पाप आणि उन्नत्तिकारक असते. पण जर मोक्ष मिळवावयाचा असेल तर प्रवृत्ति सोडून दिली पाहिजे. म्हणजे कामना, तिच्यासाठीं करावयाचें तप आणि त्या तपाच्याद्वारें उत्पन्न होणाऱ्या फळाचा उपभोग या तीन्ही गोष्टींचा त्याग केला पाहिजे. पण यज्ञ हा सोडतांच येत नाहीं. निष्काम यज्ञ–ज्ञानपूर्वक यज्ञ–कार्यमेव केलाच पाहिजे. त्यांत जुनें ऋण फिटून जातें, आपल्या नातेवाइकांचें ऋण टळतें, समाजावरील सर्वसामान्य ओझें कमी होतें, पृथ्वीचा भार हलका होतो, श्रीविष्णु संतुष्ट होतात आणि मनुष्य मुक्त होतो.

आपण जगत असतों यांतच असंख्य व्यक्तींपासून ऋण घेत असतों. नैसर्गिक शक्तिचें ऋण तर आहेच, समाजाचें ऋण आहेच, पितरांचें ऋण आहेच, समाजाला सर्व प्रकारें संस्कारी बनविणाऱ्या पूर्वऋषिचें ऋण आहेच, आणि कुलपरंपरेचा वारसा देणाऱ्या आईबापांचेहि ऋण आहेच. पंचमहायज्ञाच्याद्वारें हें सर्व ऋण फेडल्यानंतरच मनुष्य मुक्तीचा किंवा मुक्तीचा विचार करूं शकतो.

या यज्ञकर्मांत पर्याय चालत नाहीं. ज्या जातीचें ऋण असेल त्या जातीचाच यज्ञ झाला पाहिजे. विद्या शिकून गुरूपासून घेतलेलें ऋण गुरूला दाक्षिणा दिल्यानें फिटत नाहीं तर गुरूनें दिलेलें ज्ञान संभाळून वाढवून, उगवत्या पिढीला देणें हेंच खरें यज्ञकर्म होय. सृष्टीमध्यें नवीन असें कांहींच येत नाहीं. आहे तेवढ्यावरच निभावून घेतलें पाहिजे. तेव्हां आपल्या प्रवृत्तीनें आपण जितकी साम्यावस्था बिघडवितों तेवढी फिरून पहिल्यासारखी करून देणें हें आवश्यक यज्ञकर्म होय. आकाश जितकी वाफ घेतें तेवढें पाणी परत देतें. समुद्र जितकें पाणी घेतो तितकीच वाफ परत देतो. म्हणूनच सृष्टीचें महान् चक्र अबाधितपणें

चालत असतें. यज्ञचक्र नियमितपणें चालविणें ही शुद्ध प्रवृत्ति आहे. निष्काम होऊन त्याग-बुद्धीनें आपल्यापुरता या चक्राचा वेग कमी करणें हा निवृत्तिधर्म होय. कांहींच काम न करणें हीं कांहीं निवृत्ति नाहीं. ती तर निव्वळ हरामखोरीच म्हणावयाची.

प्रजा निर्माण करून प्रजापतीनें त्याच वेळीं यज्ञ निर्माण केला. यामुळें प्रजापतीवरील ओझें कमी झालें व यामुळेंच प्रजांना स्वावलंबनाचें स्वातंत्र्य मिळालें; मोक्षाचा संभव निर्माण झाला.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
वि: ...
क्र. ...१६३९... दि: २६.६.५०

समाप्त

मराठी ग्रंथ संग्रहालय
६२०
६३५०

REFBK-0006370

आमचें प्रकाशन

प्रकाशित

नादनिनाद
स्वाति
नवा प्रातःकाल
कलावंतांच्या सहवासांत
चांदण्यांतील सांवल्या
नीलेचा दिलरुबा
भंगलेली मूर्ति
मोगरीचा गजरा
प्रकाशांतील व्यक्ति
घरकूल
बेबीचा भाऊ
मामा
काळी मेहुणी
साडेतीन शहाणे
जीवन-साहित्य
जीवन आणि समाज
शालन

साहित्यिकांची सफर
अत्रे उवाच
टांकीचे घाव
वळणाचें पाणी

★

शालन
श्री. कवठेकर

कथासंग्रह
श्री. खांडेकर

चिमखडे
श्री. बोकील

गोड ललकाऱ्या
जे. एल. रानडे

कादंबरी
श्री. माडखोलकर

गुन्हा
श्री. कवठेकर

वसंत
श्री. बोकील

श्री
श्री. कवठेकर

आगामी

कॉन्टिनेन्टल प्रकाशन